म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
वा. क्र. ३
१८८८ सन

म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक श्री तुकाराम शांताराम | सन |
| --- | --- | --- |
| चरित्र | पुस्तकाचें नांव बापू गोखले यांचे चरित्र २२० | १८८९ |
| संग्रहालय क्रमांक ५२० | | |

५.२५

चरित्र

Borth. 60'62

बापू गोखले.



ग्रंथोत्तेजक मंडळीनें पसंत केलेलें

# बापू गोखले यांचें चरित्र.

जुन्या बखरींचे आधारानें

शंकर तुकाराम शालिग्राम

यांनीं तयार केलें.

श्रीमंत पंत प्रतिनिधी । यांचा किल्ला अजिंक्य वासोटा ॥
तेलिण मारी सोटा । बापु गोखल्या संभाळ कांसोटा ॥ १ ॥

वासुदेव मोरेश्वर पोतदार यांनीं

मुंबईंत 'निर्णयसागर' छापखान्यांत छापिलें.

सुधारलेली आवृत्ति तिसरी.

१८८९

किंमत बारा आणे.

या आवृत्तीचे सर्व हक्क रा० रा० वासुदेव मोरेश्वर पोतदार यांनीं
आपलेकडे ठेविले आहेत.

# उपोद्घात.

आज ही लहानशी प्रस्तावना लिहिण्याचें ज्या अर्थी आम्हीं पत्करलें आहे, त्या अर्थी या पुस्तकांत काय आहे, आणि तें लिहिण्याचें कारण काय, हें ग्रंथारंभीं वाचकांस समजून देणें इष्ट आहे. त्या नेहमींच्या शिष्ट संप्रदायास अनुसरून प्रथमतः त्याविषयीं चार शब्द लिहितों. मुखपृष्ठ पाहतांच यांत कैलासवासी बापू गोखले यांचें चरित्र आहे, हें समजून येईलच; परंतु तें लिहिण्याचें कारण काय, हें येथें जास्त विस्तारानें लिहिणें योग्य आहे; ह्मणून तसें करितों.

फार प्राचीनकाळीं या भरतखंडाची स्थिति फारच उत्कृष्ट होती, ती इतकी कीं, असा संपन्न देशच या जगतीतलावर दुसरा नव्हता; हा लौकिक ऐकून दूरदूरचे राष्ट्रांस याविषयीं मोठा जबर मोह उत्पन्न झाला; त्या मोहाच्या अनिवार सपाट्यांत आपलें राज्य सोडून व देश सोडून पुष्कळ राजे इकडेस स्वाऱ्या करूं लागले. पुढें ईश्वरी संकेतानुसार हा देश दीर्घ काळ मुसलमान लोकांच्या हातीं जाऊन पुष्कळ दिवस त्यांनीं येथील सार्वभौमत्वही भोगिलें होतें. या परकीय राष्ट्रांच्या कचाट्यांत कांहीं काळ शिवाय करून बहुत काळ प्रजेस दुःखें आणि संकटें भोगावीं लागलीं. पुढें आमच्या देशाच्या सुदैवेंकरून, **शिवाजी महाराज** या नामेंकरून एका मराठे कुलांत उत्पन्न झालेल्या अवतारी पुरुषानें त्रासलेल्या व गांजलेल्या येथील प्रजेस मोठ्या वीरश्रीनें स्वराज्याचें सौख्य पुनः मिळवून दिलें; ही त्यांची सुकीर्ति

तर चिरकाळ कायम राहील. त्याच्या उदयापासून तर थेट पेशव्यांचें राज्य नाहींसें होऊन इंग्रेजी मुद्रा या देशांत स्थापन होईपर्यंत, इतक्या अवकाशांत या महाराष्ट्र देशांतील ज्या ज्या शूर आणि राजकारस्थानी पुरुषांनीं आपलें आयुष्य स्वदेशाचे सेवेंत खर्चिलें, त्यांचें चरित्र ऐकून दूरदृष्टी मनुष्याचें अंतःकरण सद्गदित होऊन जातें आणि त्या आनंदलहरींत त्यास एके प्रकारची वीरश्री उत्पन्न होते; आणि परमेश्वरकृपेनें या विपन्न झालेल्या देशास केव्हां तरी ऊर्जित दशा येईल असा भरंवसा वाटून मन स्थिर होतें. वर लिहिलेल्या प्रकारचे तरवारबहादर आणि मुत्सदी पुरुष या देशाचे भाग्यानें कमी होऊन गेले आहेत असें नाहीं; असल्या प्रकारचे शेंकडों पुरुष उपन्न होऊन, त्यांणीं आपला कीर्तिध्वज या लोकीं फडकत ठेवून देह मात्र देवलोकीं नेला. या पुरुषांपैकीं **शिवाजी महाराज** व त्यांचे वंशजांचें वराणें, किंवा पेशवे सरकार व तसेंच त्यांचें वराणें, यांतून कोणाचेंही वर्णन करणें शोभलें तरी असतें, ह्मणजे थोरांचा पवाडा गाऊन जनांस करमणूक किंवा कांहीं माहिती करून देणें, हा योग्य प्रकार खरा; आणि त्या वाचनापासून वाचकांसही आल्हाद उत्पन्न होईल, परंतु या चरित्रापासून तसें कांहीं घडण्याचा संभव आहे काय, हा प्रश्न आह्मास कोणी करतील; त्याचें समाधान, आणि वरील थोर पुरुषाचें चरित्रवाचनापासून तरी उपयोग कोणता, याविषयीं संक्षेपतः थोडेंसें निरूपण करूं.

प्रस्तुतसारख्या पुरुषांचें चरित्रलेखन आमच्या देशास केवळ अत्यंत अपूर्व होय; कारण मराठी भाषेंत हा चरित्रलेखनाचा प्रघात पडावा तितका अद्याप पडला नाहीं. पहा

इंग्रेज सरकारचा अम्मल इकडे सुरू झाल्यापासून लिहिणें-वाचणें आणि साधारण हिशेब करणें इत्यादिपासून तर थेट शास्त्रीयविषयाचे शिक्षणापर्यंत सारखी वृद्धिच होत चालली आहे असें दिसतें; आणि या वरील विद्येबरोबर युरोपीय राष्ट्रांचे चांगले चांगले गुण आणि चांगल्या चांगल्या तऱ्हा आह्मांस प्राप्त होत चालल्या आहेत; असें जरी आहे तरी, हा वरील प्रघातच इकडे सुरू कां झाला नाहीं, कोण जाणें! आमच्या मतें याच्या अभावाचीं कारणें दिसतात तीं लिहून नंतर असा उद्योग आजपर्यंत कितीसा झाला आहे हें पाहूं.

प्रथमतः जेव्हां इंग्रजी विद्येचा व्यासंग इकडे नवाच सुरू झाला, तेव्हां तिचें सौंदर्य व श्रेष्टपणा पाहून इकडील तरुण मंडळी तीस लुब्ध होऊन गेली; आणि तिच्या आंगच्या उद्दामपणामुळें त्यांस एके प्रकारची स्फूर्ति प्राप्त होऊन, त्या आवेशांत त्यांनीं मोठमोठालीं साहसाचीं कामें केलीं; त्यांत पुस्तक लिहिणें हें काम सामान्य प्रयत्नाचें नसून त्यांतही नांवाजण्यासारखे पुरुष त्यावेळीं बरेच उदयास आले. त्यावेळची त्यांची स्थिति, व अनुकूलता मनांत आणून आतांच्या नवीन विद्वानांचा उपहास केल्यावांचून राहवत नाहीं. ह्या नव्या मंडळीच्या हातून देशकल्याणार्थ जे विलक्षण उद्योग चालले आहेत, त्याचें आणि ग्रंथरचनेविषयीं त्यांचें अज्ञानत्व याचें हसूं येतें. असो. त्यांच्या मतें आमच्या सर्व प्रकारच्या सुधारणुकी होण्यास आणि आमच्या विचित्र लीला पूर्ण दशेंत येण्यास सरकारची प्रतिकूलता हीच कायती उणीव आहे, आणि तिजमुळेंच कायतें आमच्या उद्योगास श्रेय येत नाहीं; नाहींतर आह्मांसारखे कार्यसाधु कोणीच नाहींत. सरकाराविषयीं हें जें त्यांचें मत आहे तें पुष्कळ अंशानें खोटें आहे.

शंभर दोडशें वर्षांपूर्वी हल्लीं आह्मांस आहे इतकी देखील स्वतंत्रता इंग्लिश लोकांस नसून तिकडील कार्यसाधु आणि देशहितचिंतक यांनीं त्या काळांत फारच महत्वाचे उद्योग तडीस नेले. त्यांतून ग्रंथकारांनीं तर कमालच करून सोडिली होती. आज जें ग्रेटब्रिटन राष्ट्र सर्व जगांत शहाणपणाचा डौल मारतें आहे त्याचें कारण वरील वेळच्या ग्रंथकारांचा अवाढव्य उद्योग होय! आमचे मतें आतांच्याप्रमाणे आपले विचार प्रकट करण्याचा मोकळेपणा आजपर्यंत आमच्या देशास कधींच मिळाला नसेल. याजबद्दल आह्मी या सरकारचे ऋणी आहोंत. अशा अमोल देणगीस लाथ मारून सुस्त बसावें यांत अपराध कोणाचा?

वरील विचार प्रगट करण्यांत आह्मांस विषय सोडून दुसरीकडे वळावें लागलें; तरी त्यापासून कळविणें इतकेंच कीं, '*कोलंबसाचा वृत्तांत*', '*साक्रेतिसाचें चरित्र*', '*नाना फडणविसाची बखर*', '*मराठ्यांची बखर*', '*अष्टप्रधानांची बखर*' हीं पुस्तकें, इतिहाससंबंधीं व दुसरीं पुस्तकें, 'बाळमित्राचे भाग', 'इसापनीति', 'अथल्लो नाटक', 'आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टीचे भाग' इत्यादि नामी नामी पुस्तकें मराठी भाषेंत कांहीं वर्षांपूर्वी भाषांतररूपानें जशीं प्रसिद्ध होऊन गेलीं, तसें आलीकडील दहावीस वर्षांत नवीन विद्वानांच्या हातून काय झालें बरें? नुकते पांच चार वर्षांत मात्र चरित्रमालिकेंत मोडण्याजोगीं पुस्तकें प्रसिद्धीस आलीं तीं:—'बेंजामिन् फ्रांकलिन् याचें चरित्र', 'जार्ज वाशिंगटनचें चरित्र', 'लार्ड क्लाईव्हचें चरित्र', 'शिकंदरचरित्र', 'पीटर धि ग्रेट याचें चरित्र', 'ड्यूक आफ् वेलिंगटनचें चरित्र' इत्यादि. यांतून वरील तीन तर दक्षिणाप्राईज कमिटीच्या पसंतींतील

असून तिच्या आश्रयानेंच छापलीं गेलीं. बाकीचीं दुसरीं सरकारानें विकत घेऊन छापलीं आहेत. वरील पुस्तकें पुष्कळ प्रकारानें नांवाजण्याजोगीं आहेत, हें येथें नवें सांगणें नको. हीं सर्व पुस्तकें संग्रहीं बाळगण्याविषयीं, निदान वाचण्याविषयीं तरी आमची वाचकांस शिफारस आहे. ह्या पुस्तकांच्या कर्त्यांकडून मराठी भाषेस बरेंच साह्य झालें आहे. असो. वरील पुस्तकांखेरीज ह्मणण्यासारखा चरित्रलेखनाचा प्रकार आमच्या भाषेंत अधिक कांहींच झाला नाहीं.

ही वरील मराठी लिहिण्याविषयीं नवीन विद्वानांची हेळसांडच पुष्कळ अंशीं वरच्या अभावास कारण झाली आहे, ही एक पहिली उणीव; आणि दुसरी, या गोष्टीची अनभिरुचि; ती अशी कीं, वरील विद्वानांस स्वतांच्या विद्वत्तेपुढें थोरांच्या चरित्राचें मनन कांहींच वाटत नाहीं. असो. हें एका वर्गाविषयीं झालें. आतां दुसरा वर्ग साधारण मराठी वाचकांचा. हा वरच्याहून फार मोठा आहे, ह्मणून त्यांच्या अभिरुचीविषयीं प्रस्तुत थोडें लिहूं; कारण या वर्गावर तर बहुतेक मराठी [illegible] आहे, यासाठीं तो प्रकार लिहिला, ह्मणजे हा भाग बहुतेक आटपल्यासारखेंच झालें.

मराठीवाचकांचें बहुतेक लक्ष कादंबऱ्या वाचनाकडे असतें; आणि वाचन काय तें तेंच अशी त्यांची समज आहे. ही समज होण्याचें कारण, आणि कादंबऱ्या वाचनापासून नफानुकसान, हें या ठिकाणीं थोडक्यांत कळवून मग इतिहासाचा उपयोगही थोडा कळवूं. या वाचकांस 'मंजुघोषा' आणि 'नौकानयनाचा इतिहास' हीं पुस्तकें सारख्याच

योग्यतेचीं वाटतात. कोलंबस, साक्रेटिस, फ्रांकलिन्, वाशिंगटन्, इत्यादिकांविषयीं तर काय, पण शिवाजी, थोरले बाजीराव, माधवराव यांचीही योग्यता त्यांस कळणें दुरापास्त! बुद्धीचे कोतेपणामुळें कादंबऱ्यांतून जो विलक्षण शृंगार पसरला असतो, त्यांतच वाचक रंगून जाऊन आपणांस असा सुखसोहळा भोगावयास मिळाला तर बरें, असें त्यांस वाटतें. या कादंबऱ्यांतून सुबोधपर अशा विरळाच. कथानक मनाजोगें जुळण्याकरितां एखादींत गांधर्व विवाह, एखादींत पुनर्विवाह, याची प्रशंसा करून त्यांतील नायकास प्रचुर विलासांत सोडलें असतें. या सर्वांची धाटणी पाहिली तर एक तऱ्हेचीच! अशा वेडगळ मजकुरानें भरलेल्या कादंबऱ्या वाचकांचें मन कुमार्गीं प्रवृत्त होण्यास मात्र कारण होतात. असो. त्यांच्या भजकांस तर असें वाटतें कीं, फारच शृंगार वर्णिला असेल ती कादंबरी सर्वांत उत्तम होय. मग काय! तिच्यांतील नायकानें किंवा उपनायकानें घालून दिलेल्या कित्त्याप्रमाणें राजरोस दुर्वर्तन केलें तरी चिंता नाहीं. याविषयीं विशेष विचार करणें येथें अप्रासंगिक होय. सांगावयाचें इतकेंच कीं, त्या चावट शृंगारापलीकडे त्यांस दुसरें कांहींच दिसत नाहीं. ह्मणूनच मंजुघोषेसारख्या पुस्तकांच्या तीन तीन आवृत्ति छापल्या जाऊन इकडील रजवाडे आणि श्रीमंत लोक यांचे पलंगावर किंवा सुंदर दिवाणखान्यांतील पुस्तकालयांत तिच्या प्रती दृष्टीस पडतात, आणि 'मराठ्यांची बखर' किंवा तिजवर केलेली टीका, तसेंच 'शिंद्यांचें चरित्र' हीं पुस्तकें छापखान्याचे छापखान्यांत लोळत पडून त्यांच्या कर्त्यांची लोकांच्या अनास्थेमुळें नाउमेद व्हावी, हें देशाचें सुचिन्ह काय? याप्रमाणें 'विविधज्ञानविस्तार' नामक पुस्तकांत इकडील जुने

लेख छापण्याची सुदैवेंकरून एका विद्वान् गृहस्थास इच्छा झाली आहे. त्याच उपोद्घातांत तरी असा मजकूर लिहिला आहे कीं, असले लेख एकंदर छापावे तर तो खर्च भागण्यापुरता पैसा मिळण्याची या देशाची स्थिति झाली नाहीं. त्याच उपोद्घातांत आणखीही मार्मिक विचार प्रकट केले आहेत; ते पाहून इकडील स्थिति चांगली लक्षांत येईल. हें पुस्तक चालविणाराचा उद्देश इकडील जुने लेख मिळवून एक साद्यंत इतिहास रचावा असा होता, पण तोही लोकांच्या अनास्थेमुळें आजपर्यंत पार पडला नाहीं. असो. कादंबऱ्या वाचणारी मंडळी तरुण असून त्यांच्या वृत्ति सुशोभित झालेल्या; मग त्यांचें मन अशा पुस्तकांत रमायाचेंच. त्यांतून कादंबऱ्या रचणारही बहुतेक वरील वृत्तीचेच असून रंगेल असणार मग त्यांस साह्य कसें न मिळावें!

वरील शिंद्यांचें चरित्र प्रसिद्ध करणार सरंजामे अशा

---

१ शिंद्यांचे चरित्रांतील प्रस्तावना वाचून पाहिली ह्मणजे आमचें ह्मणणें काय आहे हें समजेल. ज्यांनीं हें पुस्तक प्रसिद्धीस आणिलें त्यांच्या मनांत पुढें इकडील बहुतेक राजकारस्थानी पुरुषांविषयीं थोडेंबहुत लिहावयाचें होतें. आणि त्यासाठीं पुष्कळ प्रकारची माहिती आणि जुने लेख मिळविलेले त्यांजपाशीं आहेत असें ऐकतों, परंतु त्यांचे बेत ठिकाणचे ठिकाणींच मुरल्यासारखे झाले! वरील पुस्तक अलीजाबहादर शिंदे सरकार यांस नजर केलें आहे. हें छापून पांच सहा वर्षे होत आलीं. तरी छापखान्यांतील या पुस्तकांच्या पुडक्यास फारसा धका लागला नाहीं! बहुतेकांस तर तें छापल्याची वार्तासुद्धां माहीत नसेल! अशा गोष्टी इकडे थोड्या घडतात असें नाहीं.

'मुंबईचें वर्णन' या पुस्तकांतील प्रस्तावनेंत इकडील ग्रंथकारांचे स्थितीविषयीं कांहीं लिहिलें आहे तें, व दुसरेही त्यांत कांहीं आणखी नामी नामी विचार सादर केले आहेत ते पाहण्याविषयीं सूचना करितों.

सारख्यांस उत्तेजन मिळावें हें रास्त आहे. कारण यांनं आपल्या देशाचे इतिहासाचें मनन केलेलें असून माहितीहि पुष्कळ मिळविली आहे, पण तसें घडून येण्यास कांहीं अ वधि आहे. खुद्द इंग्लंड देशांतही जे अत्युत्कृष्ट इतिहासका ह्यूम् आणि गिवन् यांनीं देखील आपले अवाढव्य उद्यो पार पाडल्यावर त्यांचा चटका लागण्यास बरींच तपें लोटा वीं लागलीं. तेथें ग्रंथखपाचें मान आतां इतकें वाढलें आ कीं, इकडल्या ग्रंथकारांस जितक्या उत्कृष्ट ग्रंथांच्या प्र छापाव्या लागतात त्याच्या हजारपटीनें तिकडील ग्रंथकारां छापणें लागून त्यादेखील बोलतां बोलतां पार खपून जा तात ! बरें तिकडील लोकसंख्येचें मान पाहिलें तर महा राष्ट्र देशाच्या निम्मे एवढेंही नाहीं ! तेथील शंभर दीडशे वर्षांपूर्वींची ही स्थिति ! मग आमचे येथें नुक्ती कोठें वाच नाची गोडी लागत चालली आहे, आणि त्या मानानेंच ग्रंथकाराची करामत; मग इकडील अशी स्थिति असल्याचें नवल काय ? इकडील ग्रंथकार जे कोणी वर येऊं पाहतात त्यांसही आपल्या श्रमाचें सार्थक झालेंसें वाटत नाहीं; ह्मण जे छापखान्याचा खर्च भागण्यापुरताही पैसा वसूल होण्या [illegible] असा. अशा थोरमनाच्या इतिहासका रांच्या संतोषाकरितां आह्मी आमच्या देशांतील प्राचीन आणि अर्वाचीन कविवृंदांच्या कृतीची आठवण त्यांस करून देतों. अगदीं अलीकडील कविराज जो महिपती याणें 'भक्तिविजय' ग्रंथांत संपूर्ण भगवद्भक्तांच्या व संतांच्या कथा गाइल्या; तसेंच 'संतविजयां'त रामदासाचें चरित्र गाइलें; 'भक्तलीलामृतां'त तुकाराम महाराजांची थोरवी वर्णन केली; त्याबद्दल त्यास कोणी काय इनाम दिलें असेल बरें ! तर प्रथम असलीं कृत्यें

केवळ निरपेक्षबुद्धीनें जरी केलीं तरी मर्मज्ञांचें लक्ष तिकडे जाऊन ग्रंथकाराची चहा झाल्यावांचून राहणार नाहीं. भवभूतिसारखा नाटककार सर्व जगांत सांपडावयाचा नाहीं, असें आतां निर्विवाद ठरलें आहे, तरी त्यास देखील प्रथम आपली कृति लोकमान्य होण्याकरितां पुढील काळावर नजर ठेवणें भाग पडलें.

असो; इतकें वाचून मर्मज्ञ वाचकांच्या ध्यानांत येईल कीं, जोंपर्यंत उपयुक्त पुस्तकांची योग्यता लोकांस कळणार नाहीं तोंपर्यंत चावट व निरर्थक पुस्तकांची चहा होईल. सत्याचा प्रकाश पडल्यावर अज्ञानरूपी अंधःकाराचा जसा लोप होऊन जातो, तसा इतिहासादि ग्रंथांचा आदर होऊन वरील पुस्तकांचा ऱ्हास होईल. आतां असल्या कल्पित कादंबऱ्यांपासून नफातोटा कोणता, हें सांगणें राहिलें आहे तें सांगूं. पोरवयांत मुलें एकप्रकारें आपल्याच भोंवतीं गरगर फिरत असतात[१]. तसें गरगर फिरत असतां आपल्या भोंवतीं सर्व फिरतें आहे, असें मुलांस दिसतें, आणि सर्व कांहीं पदार्थ, जमीन, इत्यादि सुशोभित आणि शृंगारलेली अशी दिसते. त्या अज्ञानपणांत फिरतेवेळीं जसें जमीन, पदार्थ इत्यादि दिसतात तसें नेहमीं असावें असें वाटतें, आणि एवढ्याकरितां मुलें वारंवार तसें करीत असतात. पण मुलांच्या तशा करण्यापासून खरोखर पदार्थ आणि जमीन तशा प्रकारची होण्याचा संभव नसून फिरल्यापासून भोवंड मात्र येते! तीच स्थिति शृंगारपर नाव्हल

१ आगगाडींतून किंवा आगबोटींतून प्रवास करून आलें ह्मणजे घरदार सर्व धांवतें आहे असें दिसतें. त्याचा प्रत्यय त्या दिवशीं निजल्यावर तर खासा येतो.

वाचल्यापासून अज्ञ वाचकांची होते. मुलांस जसें फिरण्यांत खंड पडूं नये असें वाटतें त्याचप्रमाणें या वाचकांस हीं पुस्तकें डोळ्यांपुढून जाऊं नयेत असा चटका लागतो. पण तें फिरणें व त्या वेळचें सृष्टिसौंदर्य दिसणें जसें व्यर्थ, त्याचप्रमाणें नाव्हल वाचून ज्या वृत्ति बदलतात त्या व्यर्थ. दोन्हीपासून अपायच्च होतो. पहिल्या कृतीपासून शरीरास इजा, व दुसरीपासून मन निःसत्व होत जाऊन खऱ्या जगाची नादान स्थिति भासते. पहिल्यांत मूळ खरे दिसतात तसे पदार्थ पहावेसें वाटत नाहीं, तसें दुसऱ्यांत आपल्या मूळ स्थितीचा तिटकारा येतो. सारांश, वरील कादंबऱ्यांच्या भजकांतून कांहीं भ्रमिष्ट होतात. ह्मणजे पूर्वीच्या त्यांच्या स्वच्छ मनास विकृति होऊन तें बिघडून जातें.

आणखी यापासून दुसरे अनर्थ असे आहेत कीं, एकंदर मनाचें क्षीणत्व. ह्मणजे मन दुर्बळ होत जाऊन तो मनुष्य जगांतील व्यवहारास अगदीं निरुपयोगी होतो. कल्पित गोष्टींतील कथा भराभर समजत जाऊन विद्या काय ती हीच असें वाचणारांस वाटूं लागतें, आणि याहून वरचढ जे शास्त्रीय वगैरे ग्रंथ त्यांचा त्यांस त्रास येऊं लागतो. त्या गहन विषयांत त्यांची मति शिरकविण्यास कठीण पडतें. फार तर काय! त्यांच्या मनास कोणतेंच काम झेंपेनासें होतें. आतां कांहीं कादंबऱ्या बोध होण्याजोग्या लिहिलेल्या असतात, त्यांपासून इतके अपाय होण्याचें भय नसतें. त्या सुरेख लिहिल्या असून मांडणी उत्कृष्ट केली असली तर, वाचकांस मराठी भाषेचें अति सुंदर रूप त्यांत दृष्टीस पडतें. त्यांतून मांडणी साधी उत्कृष्ट आणि निर्दोष असली तर कवीची कल्पनाशक्ति किती थोर आहे हें समजून येतें. याहून थोर

लाभ अद्याप सांगणें राहिलाच आहे. तो हा कीं, सृष्टिसौंदर्याचें हुबेहुब चित्र केवळ रेखल्याप्रमाणें त्यांत काढलें असतें, तें पाहून सृष्टिसौंदर्य पाहण्याची हौस वाढत जाऊन सृष्टिजन्य ईश्वरीज्ञानाचा लाभ होतो. उत्कृष्ट देखावे मनांत उभे करण्याची करामत ज्या लेखांत आहे, असे लेख कोणास आवडणार नाहींत? असो. असलीं पुस्तकें एकंदर वाचण्याचा नाद विशेष लावून देण्यास प्रथम भारी उपयोगीं पडतात.

येथपर्यंत वाचनांतील पुस्तकांपैकीं एका भागाविषयीं झालें. आतां दुसऱ्या भागाविषयीं ह्मणजे इतिहासाच्या पुस्तकांविषयीं थोडक्यांत सांगून ही जी पुढील सेवा आह्मी करणार आहोंत तिजविषयीं थोडक्यांत कळवूं. वरच्या लेखावरून इतकें मात्र लक्षांत येऊन चुकलें असेलच कीं, चरित्रलेखनाचे अभावास कारण ह्मटलें तर मराठी वाचकांची अनभिरुचीच होय.

इतिहासाचा मुख्य उपयोग ह्मटला तर राजकारणी पुरुषांस होय. 'पुढच्यास ठेंच मागला शहाणा' या ह्मणीप्रमाणें पूर्वीं होऊन गेलेल्या मनुष्यांचा अनुभव जसा पुढच्यांस उपयोगीं पडतो, त्याचप्रमाणें या पृथ्वीवर आजपर्यंत जीं अनेक राज्यें होऊन गेलीं त्यांचा अनुभव हल्लींच्यांस कामास येतो. राजास हितकर गोष्टी कोणत्या, अपायकारक कोणत्या, त्यांवर अनिष्टें आलीं असतां कोणत्या युक्तिप्रयुक्तीनें त्यांचें निवारण करावें, तंटेबखेडे कशामुळें उत्पन्न होतात, प्रजेस सुखी ठेवण्याचे मार्ग कोणते, कायदेकानू कशाप्रकारचे असावे, वगैरे शेंकडों गोष्टी पूर्वींच्या इतिहासावरून सध्यांच्या राज्यकर्त्यांस समजल्या आहेत.

जुना मंत्री राज्यकारभारांत उत्कृष्ट मानितात, याचें कारण पाहूं गेलें तर वरीलच होय. ह्मणजे त्यास पुष्कळ दिवसांचा अनुभव झाला असतो, मग इतिहासांत तर सर्वकाळाचा सर्व राष्ट्रांचा अनुभव लिहिला असतो मग त्याचे उपयोगाची थोरवी किती सांगावी? नाना फडणवीस यांचे जो लौकिक आजपर्यंत सारखा गाजत राहिला आहे याचें कारण पाहिलें तर हेंच होय कीं, त्यांनीं बहुतां दिवसांची कारकीर्द पाहिली असून, तीन चार पुरुषांचा राज्यकारस्थानाचा अनुभव घेतला होता; नानांनीं राज्यकारभार पाहणें सोडल्यापासून पेशवाईची काय गति झाली, हें माहितच आहे! असो. तर ज्या राजकारणी पुरुषास मागील उलाढाल्या माहित असून पूर्व गोष्टींचें स्मरण चालू राज्यपद्धतींत जो उपयोगांत आणितो तोच उत्कृष्ट मुत्सदी होय. असो. तर इतिहासाची माहिती मुत्सद्यांस अशा प्रकारें उपयोगाची आहे, ही गोष्ट आमच्या देशांतील लोकांस प्राचीन काळापासून पूर्णपणें माहित असून त्या प्रकारची माहिती राहण्याजोगे लेखही लिहून ठेवण्याची चाल पूर्वीपासून चालत आली आहे. पेशवाईंत राजनीतीच्या मोठमोठाल्या उलाढाल्यांच्या माहितीसाठीं बखरी लिहून ठेवण्याची चाल याच उपयोगाकरितां पडून गेली होती.

वर ज्या प्रकारचा उपयोग राज्यकारणी पुरुषांस इतिहासाचा सांगितला, त्याचप्रमाणें प्रत्येक व्यक्तिमात्रास चरित्राचा होय. प्रत्येक पुरुष राजकुलांत उत्पन्न होऊन राजा किंवा प्रधान तर काय, परंतु सरदारही होऊं शकेल असें नाहीं, तर राजादिकांचीं चरित्रें ज्यांत लिहिलीं असतात, अशा इतिहासाचा उपयोग सर्वत्रांस सारखा कोठून होईल? त्यांतील

कांहीं अंश कोणास कांहीं अंश कोणास असा उपयोगीं पडेल, पण चरित्राबद्दल तसें नाहीं. 'साक्रेतिसाचे चरित्रां'-तील प्रस्तावनेंत असें ह्मटलें आहे कीं:—'इतिहासामध्यें ह्मटलें ह्मणजे राजे, मंत्री, सेनापती इत्यादिकांचे गुणदोष व त्यांच्या बऱ्यावाईट आचरणांचे बरेवाईट परिणाम इत्यादि गोष्टींचें वर्णन असतें, परंतु राजांचे वगैरे अधिकार प्राप्त होण्याचा संभव जरी ह्मटला, तरी तो लक्षावधी मनुष्यांत एखादे दुसऱ्यासच असतो. तेव्हां ज्यांच्या हातून जी गोष्ट घडण्याचा मुळींच संभव नाहीं, ती अमुक रीतीनें केली असतां हित होतें, व अमुक रीतीनें केली असतां अनहित होतें, हें समजून मोठासा नफा नाहीं; परंतु चरित्रामध्यें ज्यांचें वर्णन केलेलें असतें ते पुरुष बहुत करून चौघां लोकांसारखे असतात. त्यांस संसारांत ज्या अडचणी व जे प्रसंग आले ह्मणून त्यांच्या चरित्रांत वर्णिलें असतें, त्या अडचणी व ते प्रसंग बहुतांस यावयाजोगे असतात; ह्याकरितां त्या अडचणी व ते प्रसंग अमुक अमुक थोर मनुष्यांनीं अमुक रीतीनें टाळले हें समजलें असतां लोकांस फारच उपयोग आहे. हे चरित्र वाचण्याचे सामान्य लाभ झाले. हे सामान्य लाभ प्रस्तुत चरित्रापासून तर फारच होण्याचा संभव आहे; कारण जो पुरुष लहानपणीं कोंकणांतील एका गांवढे गांवांतील शेतकऱ्याचा मुलगा असून मोठेपणीं आपलेच शौर्येंकरून राजदरबारीं मोठी योग्यता पावला, इतकेंच काय, पण राजाचे मांडीशीं मांडी भिडवून पेशवाई राखण्याविषयीं अंतःकरणपूर्वक झटला; ही गोष्ट सामान्य नसून कल्पित कादंबऱ्यांतील नायकांप्रमाणें घडून आली आहे! **बापू गोखले** यांचे आयुष्यांत येवढ्या मोठ्या वर्णन

करण्याजोग्या गोष्टी कोणत्या घडलेल्या असणार? ते अमके वेळीं जन्मले व अमके लढाईंत मृत्यु पावले, इतकेंच काय तें त्यांत असायाचें कीं नाहीं? मोठमोठ्या राजांच्या वगैरे कथांत मन जसें रमून जातें तसें या चरित्रापासून काय होणार? असा जे आक्षेप घेतील त्यांस आमचें वरील उत्तर बस आहे. साठ वर्षांपूर्वी अष्टयाचे लढाईंत पराक्रम करून ज्या वीरानें आपलें शौर्ययश आमच्या देशांतील लोकांच्याच मनांत तर काय, पण इंग्लिश लोकांचेही मनांत स्थित करून ठेविलें, त्याविषयीं वरील आक्षेप तो काय चालणार! वरील आक्षेपकांस चरित्रांच्या वाचनापासून होणारा वास्तविक लाभ त्यांस कळलाच नाहीं असें ह्मटलें पाहिजे. चरित्रांचा उपयोग असा आहे कीं, त्यांपासून संसारास व जगांतील लोकव्यवहारास उपयोगी असा सदुपदेश प्राप्त व्हावा, किंवा वीरश्री प्राप्त व्हावी, असें जर आहे तर मोठमोठ्या राजांचे व राष्ट्रांचे इतिहास वाचल्यापासून ज्यास्त होईल कीं, सामान्य लोकांस ज्या अडचणी व जे प्रसंग येतात ते त्यांच्या सारख्याच मनुष्यांनीं कसे टाळले किंवा ते कसे उदयास आले हें समजल्यानें ज्यास्त होईल बरें? नुसतें मनोरंजन किंवा चित्तास चमत्कार भासणें याच लाभाची चरित्रवाचनापासून जर कोणास अपेक्षा असेल तर तो हेतु कादंबरीपासून किंवा नाटकापासून त्यांचा सुफलित होईल!

वर जो इतिहासाचा व चरित्राचा लाभ सांगितला त्याखेरीज दुसरे कांहीं लाभ आहेत ते असे:—एक तर सुबोध. अमक्या थोर पुरुषानें असें आचरण केलें ह्मणून त्याचा सुलौकिक झाला, व अमक्यानें वाईट आचरण केलें ह्मणून त्याची धूळधाण होऊन माथीं दुष्कीर्तीचें खापर फुटलें. असें नेहमीं

पहात गेल्यानें व मनन केल्यानें सद्वर्तनाची हौस, व दुर्वर्तनाचा तिटकारा आपोआप मनांत उद्भवतो. 'इतिहास हा प्रत्यक्ष उदाहरणें दाखवून केलेला बोध होय.' तर थोरांचें वर्तन पाहून ज्याप्रमाणें सामान्य लोक वागतात तसेंच आपल्या प्रीतींतील थोरांचें चरित्र लक्षांत ठेवून तसे सुज्ञजन वागतात. उद्योगी असतात ते बेंजामिन् फ्रांकलिन्चें वर्तन ध्यानांत ठेवून आपलें वर्तन सुधारतात; हुशार नावाडी असतात ते कोलंबसाचें चरित्र लक्षांत ठेवून त्याप्रमाणें वागतात; ज्यांस ईश्वरीज्ञान मिळविणें असेल त्यांनीं साधु तुकाराम किंवा साधु एकनाथ यांचे चरित्राचें मनन करीत असावें; कवि होण्याची इच्छा असेल त्यानें कालिदास, भवभूति इत्यादि कवींची विशाल कीर्ति पूर्ण मनन केली पाहिजे; राजकारस्थानी पुरुषांनीं शिवाजीचें व थोरले बाजीराव यांचें चरित्र लक्षपूर्वक अवलोकन केलें पाहिजे; खलाशी लोक ध्रुवाचा तारा लक्षांत ठेवून ज्याप्रमाणें समुद्रांत गलबत हाकारितात त्याचप्रमाणें अशा निवडलेल्या थोर पुरुषांचें चरित्र लक्षांत ठेवून या संसाररूपी समुद्रांत सुज्ञजन आपली आयुष्यरूप नौका लोटतात. आतां याहून अधिक लाभ ह्मटला तर मनाचें पोषण. इतिहासांत सर्व गत गोष्टींचा वृत्तांत असल्यामुळें तो मनांत यथासांग उतरण्यास कल्पनाशक्ति लागते. कसें ह्मणाल तर, ज्या काळाचा व ज्या देशाचा इतिहास असेल त्याची पूर्णस्थिति लक्षांत आणल्यावांचून तो समजायाचा नाहीं. चांगली चलाख बुद्धि असेल तेव्हांच तो समजेल. अशा तऱ्हेनें इतिहास वाचूं लागल्यापासून व मनन केल्यापासून कल्पनाशक्ति वाढते. इतिहासांतील स्थळाकाळाचें व मनुष्याचें स्मरण ठेवण्याची सवय लागून आणि

तसेंच त्यांतील मतलब पूर्ण ध्यानांत ठेवून स्मरणशक्ति दिव- सेंदिवस वृद्धिंगत होते. याचप्रमाणें विचारशक्ति वाढण्यास तर इतिहासाचा उपयोग फारच आहे. तो असा कीं, इति- हासांत तऱ्हेतऱ्हेची माहिती दिली असल्यामुळें मनुष्यास पुष्कळ नवीन गोष्टी कळूं लागतात. त्यांतील पात्रांचे निर- निराळे गुण व दोष तसेच त्यांचे स्वभाव हीं पाहिल्यानें मानवी स्वभावाचीं नानाविध अशीं चित्रविचित्र रूपें वाच- कांस समजतात. निरनिराळे देशांतील लोकस्थिति, राज्यप- द्धति, रीतरिवाज, धर्मसंबंधी मतें समजतात. याप्रमाणें अनेक देशांच्या इतिहासाच्या अभ्यासानें मनुष्याचें मन प्रशस्त होतें. त्याचे ठायीं भ्रांतिमूलक जीं मतें असतात, तीं नाहींशीं होतात. उगाच वरवर एक दोन गोष्टी पाहून तो कोणताही सिद्धांत ठरवीत नाहीं, तर त्याची नजर दूरवर फांकते. आपलें चांगलें कोणतें वाईट कोणतें, आपण कोणत्या गो- ष्टींत इतरांपेक्षां श्रेष्ठ आहोंत हें पक्केपणीं समजूं लागून विचा- रशक्ति वाढते. तर इतिहासवाचनानें व मनन केल्यानें ह्याप्रमाणें मनाच्या निरनिराळ्या शक्ति प्रगल्भदशेस पोंच- तात; हेंच मनाचें पोषण होय.

याशिवाय आणखीही लाभ आहेत; ते असे. मनुष्याचे ठायीं जिज्ञासावृत्ति ही मोठी प्रबळ आहे. तिच्या योगानें आपल्या देशांतील लोक हल्लीं कोणत्या स्थितींत आहेत व ते काय उद्योग करितात, पूर्वीं कशा तऱ्हेचे होते, आतांची स्थिति उत्कृष्ट किंवा पहिली उत्कृष्ट; आपले देशाबाहेरील लोकांची ह्मणजे आशियाखंडांतील चीन, जपान, तुर्कस्थान, इराण, आरबस्थान या देशांची, तसेंच युरोपांतील इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, आस्त्रिया या देशांची स्थिति कोणत्या प्रका-

रची आहे, आपल्यापेक्षां ते लोक कोणत्या गोष्टींत पुढें गेले आहेत, अमेरिकेंतील लोकांपेक्षां आफ्रिकेंतील लोक अडाणी कां राहिले, इत्यादि शेंकडों गोष्टी समजून घेण्यास जिज्ञासा-वृत्ति सारखी धांव घेत असते. बरें, या जगांतील उलाढाल्या समजून घेऊन जिज्ञासावृत्ति तृप्त झाली आहे काय? नाहीं; ती या अंतरालांतील गोलांविषयीं व त्यावरील लोकांविषयीं चौकशी करण्यास तयार आहेच! असो. तर याप्रमाणें जिज्ञासातृप्ति हो-ण्यासाठीं इतिहासाची माहिती करून घ्यावी लागते, व त्यापासू-न मनोरंजनही होतें. आणखी इतिहास हा मनास प्रसन्नताही देणारा आहे. ह्मणजे त्याचे निरंतर वाचनानें व मनन के-ल्यानें चित्त शांत व स्थिर होतें; या देशांत थोर पुरुष कोण कोण होऊन गेले त्यांचे चरित्राचें नेहमीं मनन केल्यानें व त्यांचे चरित्राचाच नेहमीं परिचय ठेवीत गेल्यानें मनुष्याचें मन उल्लासित होतें. ठीक आहे; सत्समागमाचा महिमा अनु-पम आहे, आणि इतिहास तर सर्व सज्जन व थोर पुरुषांचेच चरित्रानें भरलेला असतो. मग मनुष्याची बुद्धि थोर होण्यास काय अवकाश आहे? मनुष्याचा कल अनुकरणाकडे भारी असतो; थोर पुरुषाचें चरित्र वाचून मन प्रसन्न झालें ह्मणजे लागलेंच त्या पुरुषाचें अनुकरण करण्याची बुद्धि होते. मग इतिहास व चरित्र वाचल्यापासून किती फायदा आहे बरें? पण तो इतिहास व तें चरित्र राहण्याचा कांहीं तरी उपाय असला पाहिजे. ह्मणून थोर पुरुषाचें चरित्र बुडूं देऊं नये ह्मणजे झालें. इतिहासापासून असे अनेक लाभ आहेत. ड्रायडन् ह्मणून एक इंग्रेज कवि होऊन गेला, तो ह्मणतो:— 'इतिहासाच्या अभ्यासानें ज्यांनीं आपलीं मनें सुशोभित केलीं आहेत, आपलीं आचरणें सुधारलीं आहेत, आणि आपलीं

कामेंकाजें उत्तम रीतीनें बजावलीं आहेत, ते हें माझें म्हण
कबूल करतील कीं, इतिहास ही एक सर्वोत्कृष्ट ज्ञानशाख
आहे.'

'इतिहास म्हणजे या जगांत जे महापुरुष होऊन गे
त्यांचीं चरित्रें आहे.' इंग्लंड देशाप्रमाणें इकडील देशांत अद्य
पपर्यंत उत्कृष्ट इतिहास तर काय, पण चरित्रलेखनाचा
प्रघात पडला नाहीं, व तो मूळचाच नसल्यामुळें इकडच्या
विख्यात पुरुषांचा जीवनवृत्तांत लिहिण्याचें मूळच खुंटलें, अ
समजून युरोपांतील नामांकित पुरुषांचेंच वृत्त लिहिण्याचा कल
बहुधा दृष्टीस पडतो, पण तिकडची नुसती भूगोलसंबंधी
सुद्धां माहिती इकडील लोकांत चांगलीशी असण्याची मारा
मार; मग तिकडील लोकाचाराविषयीं व ज्याचें नांवही पू
ऐकलें नाहीं अशा प्रसिद्ध पुरुषाचे चरित्राविषयीं त्यांस जि
ज्ञासा उत्पन्न होण्याचा कितीसा संभव आहे? पण इकडील
पुरुषांचें वृत्त लिहिण्याचें कोणाचेच मनांत येत नाहीं! आत
अशा प्रकारचे थोर थोर पुरुष आमच्या देशांत होऊन गेले
आहेत काय कीं, ज्यांच्या चरित्रवाचनापासून वाचकांच्या
मनोवृत्ति थोर होतील, हा दुसरा आक्षेप वरील कांहीं लो
कांचा आहे, पण व्यासवाल्मिकांस देखील वरील विषयाची
कमताई न वाटून अबाढव्य ग्रंथाची रचना करितां करितां
त्यांच्या लेखण्या शिणल्या! तरी थोर पुरुषांचें यश संपलें
नाहीं!! असो, ह्या प्राचीन इतिहासाबद्दल आज बोलणें उ
रलें नाहीं. इकडील अर्वाचीन पुरुषांबद्दल ग्रांट डफ यास काय
वाटलें तें त्यानें मराठ्यांचे बखरींतील प्रस्तावनेंत लिहिलें
आहे. संपूर्ण महाराष्ट्र देशांतील थोर पुरुषांचें चरित्र मनन
केल्यावर तें लिहून त्याची माहिती आपले देशबंधूंस करून

दिल्यावांचून ह्याच्यानें राहवेना. वर नुक्ते सांगितलेले सरंजामे आपल्या पुस्तकांतील प्रस्तावनेंत लिहितात कीं, 'जर कोणी आपल्या आलीकडील राज्यकारस्थानी पूर्वजांचा इतिहास वेळोवेळीं लिहून ठेविला असता तर एक लहानसें भारत झालें असतें.' खरेंच आहे, हिंदुस्थानांतील राजे व इतर लोक धनांध व मदांध झाले असतां, यवनांनीं आपला पाय या देशांत घातला. मग जशी जागृतावस्था व्हावी तशी धुंदी जाऊन इकडील लोकांस परतंत्रता सहन होईना, पण करतात काय? आतांच्या स्थितीप्रमाणें सर्व हिंदुस्थान देश मुसलमानांच्या कबजांत जाऊन ते सार्वभौम बनले होते. अशा कठीण प्रसंगीं एका कोनाकोपऱ्यांत राजतेज उत्पन्न होऊन, त्याचा मोठा विस्तार होऊन तितक्या काळांतच महाराष्ट्र देशाचा महिमा इतका वाढला कीं, ज्या हिंदुस्थान देशानें वीर्यवैभवानें आणि संपत्तिवैभवानें तसेंच विद्याकलादि प्रभावानें सकल जगास कांहीं वेळ दिपविलें, अशा वीर्यशाली पुरुषांचा पवाडा गाण्यास काय कमी आहे? आमच्या मतें येवढें साद्यंत लिहिणें ह्मटलें तर प्रतिभारत होईल, आणि हें एकाचे हातानें तडीस जाण्यासारखें कृत्य नाहीं. सांगण्यास कारण इतकेंच कीं, असले थोर पुरुष आमच्या दे-

---

१ असल्या प्रकारचे थोर इतिहासकार इंग्रेजांतही क्वचितच आढळतात. त्यांनीं इकडील लोकांची खरी योग्यता प्रकट करण्याचा जरी फारसा यत्न केला नाहीं तरी, खोटी निंदाही करण्याचा बहुधा यत्न केला नाहीं; ही गोष्ट परकीय राष्ट्रांतील इतिहासकारांस भूषणास्पद आहे. हें पाहून आह्मांस वाटतें कीं, हिंदुस्थानचा किंबहुना महाराष्ट्र देशाचा इतिहास उत्कृष्ट होईपर्यंत ग्रांट डफ कृत 'मराठ्यांची बखर' वाचण्यास फार चांगली आहे.

शांत निपजले असून परकीय राष्ट्रांतील पुरुषांकडे आह्मां पाहणें कशाला ? तेव्हां येवढी अखंड विषयाची योजना अ सतां वरील दुसरे आक्षेपाचेंही कांहीं चालण्यासारखें आ काय ?

थोडे दिवसांपूर्वीं कांहीं जुने लेख आह्मांस एका गृहस्थ कडून मिळाले. ते पाहत असतां त्यांत खालचें कथानक अ लेखाच्या आधारें लिहिलें आहे, तो लेख बराच लांब ' ब गोखल्यांची बखर ' या नांवाचा सांपडला. तो इतका हेतु पुरःसर लिहिलेला पाहून आह्मांस अचंबा वाटला कीं, य लेखांतील नायकाचा महिमा या देशहितचिंतकास जितक वाटला त्याहून कांहीं कमी तरी आतांचे लोकांस वाटत आहे काय ? ज्या अर्थीं आपल्या काळाचा व्यय करून हा लेख पुरा करण्यासाठीं त्या थोर बुद्धीच्या गृहस्थानें इतकी मेहनत घेतली, तर तो अप्रसिद्ध ठेवणें रास्त नाहीं; असें आह्मास वाटलें. **बापू गोखले** यांचें चरित्र तर यावरून समजेलच, पण त्याहून अधिक एक गोष्ट वाचकांस समजा वी असा आमचा हेतु आहे, तो हा कीं, आपल्या महाराष्ट्र देशांत जागजागीं जुने लेख पसरले आहेत ते किती आस्था पूर्वक लिहिलेले आहेत हें पण यावरून समजावें, व कदा चित् कोणास कांहीं त्यांतून सांपडण्यासारखें असल्यास त्याची उपेक्षा त्यांच्या हातून होऊं नये अशी त्यांस सूचना व्हावी.

वर ज्या लेखाबद्दल आह्मीं लिहिलें तो कोणी लिहिला असेल, हें कळण्याची इच्छा वाचकांस झाल्यावांचून राहणार नाहीं; ह्मणून त्याविषयीं माहिती देतों. बापू गोखले यांजपा शीं **विठ्ठलपंत** पुणेकर ह्मणून एक गृहस्थ होते. त्यांनीं हा

लेख उदार बुद्धीनें लिहून ठेविला आहे. ह्या लेखावरूनच त्यांचे थोरपणाची खात्री होते. हे **बापू** असतां त्यांचे जिवास जीव देणारे होते इतकेंच नाहीं, तर **बापू** निवर्तल्यावरही त्यांच्या देण्यासंबंधीं यांणीं पुष्कळच घस सोसली. यावरून **बापू**विषयीं यांचे ठिकाणीं किती पूज्यबुद्धि होती हें दिसत आहे. यांचें वास्तव्य पुण्यास पूर्वी वहुत दिवस होतें. हे मूळ भिमथडी तालुक्यापैकीं देलवडी गांवचे इनामदार. त्या गांवीं त्यांचे बंधूचा वंश असून त्यांचाच खुद्द वंश ह्मटला तर हल्लीं बडोदें येथें आहे. **विठ्ठलपंत** पुणेकर हे मोठे उद्योगी, धर्मशील आणि दूरदृष्टी होते, असें त्यांनीं त्यांचे घरीं केलेल्या पोथ्यापुस्तकांच्या संग्रहावरून वाटतें. हे नुकते गेले सालीं स्वर्गवासी झाले. बडोद्यास सध्यां जे **रावजी विठ्ठल** पुणेकर ह्मणून एक पुणेकर थोर गृहस्थ सुभ्याचे कामावर आहेत, ते यांचे सुपुत्र होत. असो. तर अशा प्रकारें यांच्या सुकीर्तीचा ध्वज इकडे फडकत आहे.

वर ज्याप्रमाणें पुणेकरांचे सद्वंशाविषयीं लिहिलें त्याचप्रमाणें **बापू गोखले** यांचे चुलत बंधु जे **भास्करपंत** गोखले त्यांचा वंश हल्लीं येथें नांदत आहे. **विश्वासराव भास्कर** गोखले हे **बापू गोखले** यांचे चुलत बंधु जे **भास्करपंत** गोखले त्यांचे पुत्र होत. **भास्करपंत** गोखले हे शूर असून तेजःपुंज आणि सदृढ असे असत. **बापू गोखले** यांस भास्करपंत यासुद्धां चौघे चुलत बंधु होते. त्यांपैकीं वडील

---

१ बापू गोखले यांचे देण्यानिमित्त त्यांच्या काळेवावरांतील राममंदिरानजिकचे वाड्याचा विध्वंस झाला. या वाड्याची जागा प्राचीन एका परदेशाची असून त्याजपासून वाडा बांधतेसमयीं **बापूं**नीं बलात्कारानें घेतली, त्यामुळेंच त्यांचें निःसंतान झालें असें कोणी ह्मणतात.

**विसाजीपंत.** ह्यांविषयीं पुढील चरित्रांत थोडा लेख आ
च आहे. भास्करपंत गोखले यांचे पुत्र विश्वासरावजी गो
यांनीं काळावर नजर ठेऊन व इंग्लिश सरकारचे इमा
पणावर कांहीं लक्ष देऊन, त्यांची चाकरी पत्करली. वि
**श्वासरावजीं**नीं आपला शहाणपणा आणि हुपारी य
मासला चाकरी करीत असतां सर्वांस दाखविला; ि
न्यायाची उत्कृष्ट पद्धति आपल्यामागून होणाऱ्या न्याया
शांस समजण्यासाठीं त्यांनीं कित्ताच घालून ठेविला
काय कोण जाणे! यांनीं प्रथमतः कोणते खात्यांत चाक
धरिली व केव्हां धरिली हें जरी आह्मांस माहित नाहीं त
ते न्यायाधीश होते ते वेळीं त्यांनीं जो लौकिक गाजविला
अजूनपर्यंत आमचे कानांत घुमतो आहे. शेवटीं शेवटीं हे
गमनेर येथें न्यायाधीश (मुनसफ) असतां आपल्या पूर्वजां
लौकिकाचें व परमेश्वराचें स्मरण ठेवून उचित तेंच यां
केलें. ह्मणजे यांचे सुन्यायपद्धतीबद्दल अद्यापपर्यंत ति
डील लोकांस विस्मरण झालें नाहीं. इतकेंच तर काय, पर
असे चिकित्सखोर आणि दक्ष न्यायाधीश क्वचितच, अ
ध्वनि त्यांचे मुखांतून नेहमीं ऐकूं येतो. यांनीं केलेला वि
काल अपील कोर्टांत फिरत नसण्याविषयीं तर भारी लौकि
होता. असो. आपल्या थोरपणाप्रमाणें व शहाणपणाप्रमाणें उ
त्तम न्यायाधिशाची पद्धति यांनीं उचलून इंग्लिश सरकार
चाकरी एकनिष्ठेनें करून अखेरीस त्या सरकारची पेनशन
बद्दल नेमणूक घेऊन, हल्लीं पुण्यग्रामीं आपल्या कुटुंबांत
थोर पुरुष दक्षिणेंतील सरदार वास्तव्य करीत आहेत. गृहस्
लोकांस योग्य अशा प्रकारचा यांचा प्रौढ स्वभाव पूर्वीपासू
असून, ह्यांची स्वधर्मावर पूर्ण निष्ठा आहे. यांस दोघे पुत्र वि

द्वान् असून, त्यांचाही क्रम वडिलांचे धोरणासारखाच आहे.

हें चरित्र फार विस्तारानें न लिहितां जितकें तोकडें करवेल तितकें केलें आहे, कारण क्लिष्ट विषयाचें लांबलचक वाचन अद्याप इकडे कोठें आवडूं लागलें आहे! दुसरें असें कीं, हा मुख्य इतिहास नसून नाटकांतील एखादें पात्र जसें असावें, तसें महाराष्ट्र देशाचे इतिहासांतील हें आहे. आमच्या देशाचे भाग्यानें हल्लीं जसा 'विविधज्ञानविस्तार' पुस्तकांतून या देशाचे इतिहासाच्या उज्ज्वलनार्थ उद्योग चालू आहे, तसाच तो पूर्णतेस गेला तर, किंवा पूर्ण तऱ्हेचा इतिहास या देशाच्या भाग्यानें कोणीं लिहिला तर, त्यांतील कोनाकोपऱ्यास या भागांतील विषयास जागा मिळावी या आशेनें हें चरित्र थोडक्यांत लिहिलें आहे.

आतां याचे उपयोगाविषयीं तूर्तच्या प्रसंगास अनुसरून पुनः दोन शब्द बोलून हा उपोद्घात आटपण्याची रजा घेतों. आजच्या स्थितींत असल्या तऱ्हेचा शूरपणा प्रगट करण्यास मुळींच जागा नाहीं, असें जरी कांहीं अंशीं दिसत आहे तरी दयाळू इंग्रेज सरकार लष्करांतील मोठमोठ्या जागा एतद्देशीय लोकांस केव्हां केव्हां देतात, त्यांत सुद्धां शूरपणा दाखविण्यास थोडी जागा आहे असें नाहीं. फार तर काय, नेटिव शिपायांची विश्वासू वागणूक पाहून आमचें सरकार दूरदूरचे मोहिमेवर त्यांस नेतात. 'आबिसिनियाची लढाई' जिंकण्यास इकडील शिपाई किती उपयोगी पडले हें आमचें सरकार जाणत आहे. अशा तऱ्हेची राजनिष्ठा पाहून याहून मोठाल्या हुद्याच्या लष्करी जागा इकडील लोकांस इंग्रेज सरकार देणार नाहीं, असें नाहीं. असें असतां असल्या शूरांचे पोवाडे निरर्थक कसे ह्मणतां येतील? त्यां-

तून मराठी भाषा ज्या ज्या टापूंतून चालत आहे त्या त
टापूंत सध्यां पुष्कळ संस्थानें व राज्यें आहेत. तीं संस्था
व राज्यें जरी आज स्वतंत्र नाहींत तरी फौजेसंबंधी त्यां
स्वतंत्रता कायम आहे. नुक्ते दिल्लीदरबारचे वेळीं नेटि
राजांच्या फौजेनें निशाण मारण्यांत जी करामत दाखवि
ती पाहून सर्वांनीं तोंडांत बोटेंच घातलीं! नामदार गवर
जनरल यांणींही मोकळ्या मनानें त्यांची स्तुति केली. द
वरून आज अशा चरित्राचा उपयोग किती आहे तो स्प
दिसतच आहे.

आतां प्रथमारंभीं बुद्धिदाता जो पार्वतीसुत त्याचें स्मर
मंगलदायक, ह्मणून शिष्टाचाराप्रमाणें त्यास नमन करून ग्रंथ
र्णता करण्याविषयीं विनयपूर्वक प्रार्थना करितों. ज्या थो
कुलांत मोरेश्वर देव, थोरले चिंतामणि देव, धाकटे चिंता
मणि देव, तसेंच धरणीधर महाराज इत्यादि थोर थोर आणि
पुण्यशील साधु निपजले, त्याच शालिग्रामकुलांत आमच
जन्म; अतएव ज्या ऋषीपासून आमची उत्पत्ति, त्या हारीत
मुनीस परम विनयानें आणि सद्भावपूर्वक प्रणाम करून
मोरेश्वर महाराजांची आठवण करितों. तसेंच यांत कांहीं
अंशीं देशहित जर साधत असेल तर या चरित्रांत सरसत
येण्याविषयीं त्यांनीं अनुग्रह करावा, अशी प्रार्थना करून
परमेश्वरस्मृतीनें ग्रंथारंभ करितों.

मुक्काम पुणें.
तारीख ३० जून १८७७.

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

प्रथमावृत्तीपेक्षां या खेपेस विशेष काय झालें आहे, हें येथें सांगणें इष्ट आहे; ह्मणून त्याप्रमाणें येथें सांगतों.

प्रथमावृत्तीचे वेळीं जी इकडील ग्रंथकारांची आणि वाचकांची स्थिति सांगितली आहे तींत आलीकडे पुष्कळच फरक पडत जाऊन दिवसेंदिवस वाचकांची अभिरुचि आणि रसिकता विशेषच वृद्धिंगत होत चालली आहे असें स्पष्ट दिसतें. आज जो हा द्वितीयावृत्ति काढण्याचा प्रसंग प्राप्त झाला आहे तो तरी वरील स्थितीचाच दर्शक होय असें ह्मटलें पाहिजे.

प्रथमावृत्तीपेक्षां या आवृत्तींत पुष्कळ फेरफार झाला आहे, ही गोष्ट आमचे पुस्तकाची पहिली आवृत्ति वाचणाराचे लक्षांत तर येऊन चुकली असेलच. रा० ब० गोपाळराव हरी देशमुख व रा० ब० माधवराव गोविंद रानडे या उभयतांनीं मेहेरबानीनें जीं जीं स्थळें वाढविण्यास सांगितलीं होतीं तीं वाढविलीं व कमी करण्यास सांगितलीं होतीं तीं कमीं केलीं. रा० ब० देशमुख यांनीं तर मोठ्या आस्थेनें पुष्कळ प्रकारची तोंडी माहिती सांगितली व कांहीं टिपणेंही दिलीं, हा जो त्यांचा मराठी वाचकांवर व त्यांतून इतिहासाची माहिती मिळवूं इच्छिणारांवर उपकार झाला त्याबद्दल ग्रंथकर्ता हा त्यांचा ऋणी आहे.

कैलासवासी विठ्ठलपंत पुणेकर यांचे बखरीचे आधारानें आह्मी जें हें चरित्र लिहिलें आहे त्याच पुणेकरांचे वरीं ह्मणजे भिमथडी तालुक्यांतील देलवडी गांवीं आह्मांस आण-

खीही एक दोन जीर्ण झालेल्या बखरी मिळाल्या होत्या, रंतु त्यांचा उपयोग होईल किंवा नाहीं याविषयीं आजप आह्मांस मोठी शंका होती! कारण प्रथमत: तर आह्म असें वाटत होतें कीं, आमचें बापू गोखल्यांचें चरित्रच वाचकांस कितपत मान्य होईल कोण जाणें! कारण एक ही अगदींच नवी सुरू केलेली पद्धति व दुसरें बापू गोख हे पुरुष तर आमच्या याच भाग्यहीन देशांत जन्मास आ तेव्हां या पुरुषाची कितीशी मान्यता होते! पण आह्म तर आतां असें कळून आलें कीं, कोणी जरी मन:पूर्व स्वदेशसेवा केली तर ती निष्फळ ह्मणून जावयाची नाह असो. तर आतां आह्मी वरील जीर्ण झालेल्या बखरींचा उपयोग करण्याचें मनांत आणून प्रथम **विठ्ठल शिवदे विंचुरकर यांचें चरित्र** छापण्यासाठीं तयार केलें अस तें लवकरच छापून प्रसिद्ध होईल.

मुक्काम पुणें.

ता० २ एप्रिल १८८२.

**शंकर तुकाराम शाळिग्राम**

# बापू गोखले यांचें चरित्र.

१. कोंकण प्रांतांत राजापूर महालांत पिरदावण नजीक तळेखाजण ह्मणून एक खेडें आहे. तेथें पूर्वी **बल्लाळपंत** गोखले ह्मणून ब्राह्मण ज्ञातीचे एक गृहस्थ राहत असत. त्यांचा धंदा ह्मटला तर तेथें त्यांची कांहीं मिरास जमीन वडिलार्जित होती, तिची वहिवाट करून आणि तिजवरच चरितार्थ चालवून काळ काढावा असा होता. त्यांस संतति दोन पुत्र झाले; वडील **धोंडोपंत** आणि धाकटे **गणेशपंत**. हे **गणेशपंतच बापू गोखले** यांचे तीर्थरूप होत. वरील दोघे बंधु बापाचा व्यवसाय करून त्या खेड्यांत कांहीं दिवस वास्तव्य करीत होते. **धोंडोपंत** यांचा विवाह, **व्यंकटरावजी** भावे, संस्थान नरगुंद, यांची कन्या **आनंदीबाई** इजशीं झाला. तिजला पुढें संतति मुळींच झाली नाहीं. **गणेशपंत** यांस मात्र दोन पुत्ररत्नें झालीं; ज्येष्ठ पुत्राचें नांव **आपा** आणि कनिष्ट पुत्राचें नांव **बापू**, असें होतें. श्रीमंत **सवाई माधवराव** पेशवे हे राजचक्र फिरवीत असतां, **नाना फडणवीस** यांचे चुलत बंधु, **गंगाधरपंत** भानु, हे कोंकणांतील विजयदुर्ग येथें सुभेगिरीवर होते; त्यांचे हाताखालीं हे **धोंडोपंत** फडणिशीचें ह्मणजे जमाखर्चीं लिहिण्याचें काम करीत असत. धाकटे **गणेशपंत** हे आपल्या वतनी जमिनीची वहिवाट करून आपल्या गांवींच नांदत असत.

ज्या शूर पुरुषानें आपल्या पराक्रमेंकरून आपलें नांव वर

काढिलें; तसेंच **थोरले बाजीरावाचे** मागें ब्राह्मण लो
तील युद्धकौशल्य नष्ट झालें; असा जो सर्वत्रांचा १

---

१ येथें आम्हास ही गोष्ट सुचविणें भाग येतें कीं, सर्वत्रांचा झटला हा अपवाद येईल. कारण आमच्या देशाविषयीं सर्वदां ज्य उपेक्षाबुद्धीच असेल त्यांस या शूरांच्या गोष्टी अंधापुढें जसा सूर्यप्र तसें आहे. पण त्यांस ही पुढील गोष्ट वाचण्याची विनंति आहे.

एके वेळीं मोंगलानें थोरले बाजीरावास आपल्या भेटीस बोला लें. ही स्वारीही मनांत कांहींच न चरकतां व आपलें त्याचें वैमन आहे याची परवा न करतां खुशालपणें कांहीं लोक बरोबर घेऊन भे स गेली! वाड्यापुढें गेल्यावर घोड्यावरून उतरले व मोंगलाकडू सामोरे आलेल्या माणसांबरोबर बाजीराव वाड्यांत शिरले. सैन्य बाहेरच राहिलें. मोंगल ज्या दिवाणखान्यांत भेटीची वाट पह बसला होता तो दिवाणखाना उत्तम शृंगारलेला होता. मोठमोठे आरसे लावून व हंड्या टांगून फारच सुशोभित केला होता. पलीक चिकाच्या पडद्यांत मोंगलाचा जनानखाना होता. बाजीराव आल्या वर मोंगलांची व त्यांची भेट झाली. त्यांत मोंगलाच्या आईस बाजी रावाचें रूप फारच मनोहर वाटलें! भेट झाल्यावर सहज गोष्टी ब लत बोलत मोंगलानें बाजीरावास शेजारच्या दालनांत नेलें. तेथें त्यावर थोडक्या वेळांत नग्न तरवारीचा गराडा आपले भोंवतीं पडले ला आहे असें बाजीरावानें पाहिलें. हें कृत्य मोंगलानें प्रथमच क ण्याचें योजून ठेविलें होतें, त्याप्रमाणें झालें. असें झाल्यावर मोंगला बाजीरावास प्रश्न केला कीं, "या वेळेस तुला शिपायांकडून मारवि तर काय करशील?" हें ऐकतांच या शूरानें आपल्या कमरेच्या तलवा रीस हात घालून म्यानांतून बाहेर ओढली आणि मोंगलास उत्तर दि लें कीं, "या शस्त्रानें प्रथम तुझा प्राण घेईन. मग तुजवर उड्या मारणा रे हे लोक, तो तूंच नाहींसा झाल्यावर यांचें तें काय चालणार आहे मग अशीच तलवार त्यांजवर चालवून ही फळी फोडून मी आपल्या सैन्यांत पार निघून जाईन!" प्रत्यक्ष तलवारी पडताळून प्राण घेण्या

झाला होता, तो घालवून आणि कांहीं वेळ तर अपार युद्धचापल्य दाखवून, वीर्यशाली पुरुषांचे मालिकेंत आपलें नांव चिरस्थायी केलें, असा तो राजबिंडा, वरील **गणेशपंत** गोखले यांचा कनिष्ठ पुत्र होय.

आमच्या वाचकांस येथें शंका येईल कीं, इतक्या दीर्घ कालमर्यादेंत थोरले बाजीरावापासून थेट धाकटे बाजीरावापर्यंत शूर ह्मणून नांव घेण्यास कोणीच निपजला नाहीं काय? पण आर्यजननीचे आशीर्वादेंकरून असा प्रसंग आज दिवसपर्यंत कधींच प्राप्त झाला नाहीं. फार तर काय, पण गेल्या तपापूर्वींच वीर्य ह्मणून आमच्या लोकांतील आतां लयास गेलें! आतां शूरत्व आमच्यांत कधींच मिळावयाचें नाहीं! पूर्वींचे आमचे पूर्वजांचे पराक्रम श्रवण करण्यास किंवा पोवाडे गाण्यास मात्र आतां उरले आहेत! आतां या आंगाच्या त्या आंगावर देखील वळण्याची आशा नको! असा जिकडे तिकडे ध्वनि निघत आहे, व पराक्रमाविषयीं खरोखरच सामसूम, अशा वेळीं देखील आमच्या आर्यजननीचे बालकांत (ब्राह्मणांत) तेज आणि वीरश्री किती आहे हें एका ताऱ्यानें क्षणभर चमकून आणि आपली तलवार कांहीं वेळ पडताळून सकल लोकांस दाखविलें;

---

तयार झालेल्या लोकांपुढें हें बोलणें!!! हें बोलणें आपले साहसाची खात्री असल्यावांचून एरवीं निघेल काय? हें समग्र कृत्य पडद्यांतून मोंगलाचे आईनें पाहिलें होतें. तिला या धारिष्टाचा फारच अचंबा वाटला, आणि "शाबास बाळा! धन्य तुझी जननी!!" असें ती बोलली. तिनें यास कुरवाळून अभ्यंग करविलें. त्यावरूनच पुढें बाजीराव तिला मातोश्री, व थोरले माधवराव मोंगलास काका ह्मणून ह्मणत असत असें ह्मणतात.

आणि अस्त पावलेल्या प्राचीन ताऱ्यांची ल्काकी सर्व मनांत पूर्ण बिंबविली. ही गोष्ट आमचे इतिहासज्ञांस ठ नाहीं, असें नाहीं; ती निदान कांहीं तपें तरी त्यांचे मन राखाडींतील विस्तवाचे फुणगीप्रमाणें झांकलेली राहील असो. यावरून समजावें कीं, गिलच्यांस पिटवून लावण **राघोबा** भरारी, थोरले **माधवराव** व त्यांचेच वेळ **फडके**, तसेंच नुकतें गाजलेलें **पटवर्धन**मंडळ, हीं अशीं दुसरीं नांवें आह्मी अगदींच विसरलों, असें नाहीं त्यांचा विसर आह्मास व आमचे प्रिय वाचकांस कसा मा होईल बरें? हीं नांवें तर आमच्या देशाभिमानी पुरुषांनीं अ पल्या हृत्पट्टिकेवर अढळ बसवावीं अशी त्यांची योग्य आहे.

२. **धोंडोपंत दादा** हे लिहिण्यांत हुशार असून जा जबाबी, तसेच बोलण्यांत चतुर असून शूरही असत. हा श वटचा गुण शिवायकरून बाकीचे गुण कारकुनाचे ठिकाण अवश्य असावेच लागतात. ह्या गुणांत या देशांत ब्राह्म लोकांचा हात आजपर्यंत कोणाच्यानेंच धरवला नाही कलमाचे बळकट तेच! विद्या अशी त्यांणींच शिकवावी असो. **धोंडोपंत** आपल्या गुणेंकरून **नाना फडणवी** यांस प्रिय झाले. ठीक आहे, जशाला तशाची गोडी अ सतेच. नाना फडणवीस तरी लिहिण्यांत आणि बोलण्यां परम कुशल आणि चलाख होते हें आह्मीं येथें नव्यानें सां गायाला हवें असें नाहीं, त्यांचे चरित्रांत तर असा ले आहे कीं, ते एका दिवसांत किती काम करीत होते कोणास सांगितलें तर त्यास तें असत्य वाटेल; पण खरो खरच ते जबर काम काढणारे होते. असो. विजयादु

गला. हें पाहून **पेशवे** सरकार संतोषित होऊन नेकना
पत्र लिहून पोषाक व इनाम पाठविलें. सरकारा
असें पत्र व बक्षीस **धोंडोपंतांस** मिळाल्यावर त्यांचें ग
त्याचें वर्णन पुण्याचे दरबारीं वारंवार होऊं लागलें. **गंगा**
**धरपंत** भानू यांचें हिशेबाचें काम संपल्यावर सरकार
परवानगी त्यांस विजयादुर्गास जाण्याविषयीं मिळाली.
पुण्यास असतां **गोखले** यांची स्तुति दरबारांत सर्वतोमु
होत असे, ती यांस पसंत न पडून त्यांस मत्सर वाटूं लाग
होता. त्यांस वाटूं लागलें कीं, **धोंडोपंताची** जी ये
बढती झाली आहे ही आपले अपकीर्तीस कारण होई
त्यांचा जो नांवलौकिक झाला तो आपले लौकिकास क
कच लागला असें समजायाचें. पुढें विजयादुर्ग येथें **भा**
गेल्यावर **धोंडोपंताचा** वारंवार अपमान करावा व त्यां
अदावत चालवावी असा क्रम चालला.

वरील गोष्ट हलक्या स्वभावाची होय. तरी अशाही म
नोविकारास मनुष्यें वश झालेलीं आढळतात. अशीं उदा
हरणें वरींच सांपडतील. त्यांच्यांत हीच गोम असते कीं, आ
पल्या हाताखालच्या मनुष्याची किंवा आपल्यापेक्षां कमी द
याच्या मनुष्याची सुकीर्ति किंवा चढती कला झाली असल
तर या दुष्ट मनुष्यांस ती सहन होईनाशी होऊन तीस वि
रजण घालण्याचा यत्न ते करीत असतात; परंतु त्याची यो
ग्यता खरोखर होणेंच असली तर तेणेंकरून त्या दुष्ट म
ष्यांचे आचरणानेंच शेवटीं तोंडघशी पडल्यासारखें हो
हाच मासला हल्लीं येथेंही स्पष्टपणें दृष्टीस पडत आहे. अ
वेळीं आपल्या वरिष्ठाची किंवा प्रौढाची वाईट कृति उच
करूं नये असें समजून जर कोणी ती सहन करील कि

गुप्त ठेवील तर प्रसंगीं सहन करणारास व गुप्त ठेवणारास मोठेंच अनहित सोसावें लागेल यांत संशय नाहीं.

४. **धोंडोपंत** गोखले पाणीदार मनुष्यांत मोडण्याच्या योग्यतेचे होते ह्मणून त्यांणीं असा विचार केला कीं, जर यांची ही अदावत निमुटपणें सोशीत चालावें तर दिवसेंदिवस हा त्रास वाढून प्रसंगीं आपले कीर्तीवर पाणी पडेल. करितां कांहीं तरी यांचीच खोडी काढावी ह्मणजे तेणेंकरून यांचें तेज कमी होईल, अथवा "भीक नको पण कुत्रें आटप" असें होऊन आपल्या मागें लागणार नाहीं. असा विचार करून **गोखले** पुण्यास गेले. तेथें गेल्यावर **सरकारची** व **नाना फडणीस** यांची भेट घेऊन **गंगाधरपंत** भानू यांणीं दहा लक्ष रुपये खाल्याबद्दलची कांहीं कलमांची याद सरकारांत दिली. ते वेळीं सरकार अल्पवयी असल्यामुळें सर्व कारभार **नाना फडणीस** पाहत असत. त्यांणीं असा विचार केला कीं, या यादीपैकीं सर्व नाहीं तरी कांहीं कलमें जरी **भानू**वर लागू झालीं तरी तेणेंकरून दरबारांत आपल्यास खालीं पाहणें येईल. कारण **भानू** हे आपले चुलत बंधु आहेत, ही गोष्ट सर्वांस माहित आहे, करितां **गोखले** यांस त्यांचे हाताखालीं पुनः न पाठवितां येथेंच ठेवून घ्यावें हें बरें. मग त्याप्रमाणें **धोंडोपंत** यांस हुजुरांत राहण्याची परवानगी मिळाली.

५. **धोंडोपंत** हे आपले पुतणे **आपा** व **बापू** यांसहवर्तमान पुण्यास येऊन राहिले. **आपा** व **बापू** हे दोघे बंधु जात्या शूर असत. पुण्यास आल्यावर यांचें दररोज दरबारीं जाणें होत असे. यांची वागणूक व हुषारी पाहून

पेशवे सरकारची मर्जी त्यांजवर प्रसन्न होत असे.[1] एके वर्षी तर "हे दोघे बंधु सरदारीचा हुद्दा देण्यास योग्य आहे" असें श्रीमंत बोलले.

**नाना फडणीस** यांचीं खासगी बसण्याचीं घोडीं स... पन्नास होतीं. त्यांत दोन घोडीं फारच उत्तम असत. त्यां... वर चाबुकस्वारास देखील बसण्याची परवानगी नव्हती. ए... वेळीं मर्जी आली तर **फडणीस** मात्र खुद्द बसत अ... बाकीचीं घोडीं स्वारीचे वेळीं कोतवाल चालवावीं अशी ... हिवाट असे. **धोंडोपंत** गोखले हे घोड्यावर बसणार फ... हुषार आणि चतुर आहेत, अशी गोष्ट **फडणीस** यांस ... रभारें समजली होती. एके दिवशीं **नाना फडणीस** ... ची स्वारी नित्याप्रमाणें घोड्यावर बसून देवदर्शनास जा... लागली. जाण्याचे पूर्वी **गोखले** यांस "आमच्या खासगी घो... घोड्यांपैकीं एकावर तुह्मीं बसावें" अशी आज्ञा **फडणीसां**... केली. स्वारीची तयारी झाल्यावर चालीप्रमाणें सर्व कोतवाल घो... उभीं केलीं होतीं, त्यांतच पलीकडे त्या दोन घोड्यांपैकीं ए... घोडी मोतद्दार धरून उभा होता. हें पाहून **गोखले** यां... मोतद्दारास सांगितलें कीं, "काढणी सोडून दे. मजला घोडीव... बसावयाचें आहे." तें ऐकून मोतद्दार ह्मणाला कीं, "या घोडी

१ मनुष्याची परीक्षा करण्याची कला एक शेवटील बाजीराव ... रीज करून सर्व पेशवे यांस अवगत होती, असें त्यांच्या चरित्रावर... उघड दिसतें. त्यांतही थोरला बाजीराव हा या कामांत फारच चतु... असावा असा आमचा सुमार आहे. याचे बहुतेक गुण शिवाजीप्र... माणेंच असत. ह्मणजे शूरत्व, वक्तृत्व, धारिष्ट, चापल्य, गुणपरीक्ष... साहस, महत्त्वाकांक्षा इत्यादि गुणांचा आगर जो शिवाजी, त्याचप्रमा... बाजीराव बल्लाळही होता, असें दिसतें. असले पुरुष निपजले म्हण... नच देशाची ऊर्जितकळा दिसत होती.

चर धूनीमहाराज खेरीज करून दुसरें कोणी बसावयाचें नाहीं. तीं दुसरीं घोडीं कोतवाल आहेत त्यांपैकीं वाटेल त्याजवर जाऊन बसावें'. हें आपण या पराक्रमी पुरुषास कोठून सहन होणार? त्या मोतदाराच्या तोंडांत लगावून स्वारी अश्वारूढ झाली. इतक्यांत **नाना फडणिसांची** स्वारी देवदर्शनास जाण्याचे तयारीनें बाहेर आली; तों मोतदाराच्या तोंडांत मारल्याची खबर त्यांचे कानीं गेल्यावर, त्यांणीं **धोंडोपंत** दादांस असें करण्याचें कारण जवळ जाऊन हळूच विचारिलें. इतक्यांत या पुरुषानें असें समर्पक उत्तर दिलें कीं, **नानांचें** अंतःकरण शांत होऊन **धोंडोपंतास** तसें करण्याबद्दल शाबासकीच मिळाली. ते ह्मणाले, 'मोतदारानें फारच अमर्यादा केली. ती अशी कीं, आपण घोडीवर बसण्याची परवानगी दिली असून त्याणें मान्य केली नाहीं; जो आपला हुकूम सर्व राज्यांत मान्य होतो तो या यःकश्चित् पांच रुपये दरमहाचे किंमतीच्या मोतदारानें मोडला ह्मणून त्यास शासन करणें भाग पडलें. खरोखर पाहतां यापेक्षांही ज्यास्त शिक्षा करण्यास हा पात्र आहे, परंतु ही थोडीच केली.' हें बोलणें ऐकून **नानांनीं** हास्यवदन करून उत्तर दिलें कीं, 'आपण हें फार चांगलें केलें. येथून पुढें ही घोडी आपलेकडेसच राहील. हिजवर आपण नेहमीं बसत जावें.' नंतर ती घोडी तशीच त्यांजकडे देऊन मोतद्दार, चंदी, वैरण, रतिब, सरकारांतून नेहमीं चालू ठेविला.

थोडा काळ गेल्यावर **नानांनीं** असा विचार केला कीं, **धोंडोपंत** व त्यांचे पुतणे हुशार असून शूर आहेत; करितां यांस सरदार असें पद द्यावें. हें पद हल्लींचे नामधारी पदाप्रमाणें फुकट चालण्यासारखें नसून तें घेणाराची योग्य-

ताही तशीच पाहिजे होती. असो. त्यांणीं विजयादशमीचे मुहूर्तानें त्रिवर्गास दरबारांत बोलावून आणून बहुमानाचीं वस्त्रें दिलीं. प्रत्येकास पालखी, नगारा, निशाण आणि हत्ती, देऊन त्यांचा खर्च व तैनातीकडे शंभर शिलेदार आणि शंभर घोडे यांचा खर्च सरकारांतून देण्याचा ठराव केला. असो. याप्रमाणें सरकारहुकुमावरून या त्रिवर्गांनीं पागा तयार करून शिलेदार व घोड्यांची भरती केली. अशा प्रकारें सरदारी हें पद त्रिवर्ग गोखले पावले. याप्रमाणें **बापू** गोखले यांस प्रथम सरदारी मिळाली.

६. याप्रकारें हे वरील पदाचा कांहीं दिवस उपभोग घेत आहेत तोंच खरा सरदारीचा उपयोग सरकारास दाखविण्याचा यांस समय येऊन ठेपला. तो असा कीं, कर्नाटकांत **कितूरकर देसाई** यांनीं पेशवे सरकारचे हुकुमावांचून सैन्य वाढविलें आणि मुलखांत लूट करावी, रयतेस उपद्रव द्यावा, असा क्रम आरंभिला. ही गोष्ट पेशव्यांचे कानीं आल्यावर त्यांनीं अशी योजना केली कीं, **गणेशपंत** भेरे यांच्या बरोबर अजमासें चार हजार फौज देऊन देसाई यांचें पारिपत्य करण्याकरितां रवाना करावें, व त्यांच्या बरोबर **धोंडोपंत, आपा** व **बापू** गोखले या त्रिवर्गांसही पाठवावें असा विचार केला. त्याप्रमाणें **भेरे** यांस हुकूम दिला व त्रिवर्ग **गोखल्यां**सही आपल्या पतकांसह जाण्यास सांगितलें. त्या वेळीं **गोखले** यांनीं सरकारास विनंति केली कीं, 'आमची नेमणूक तर कमी आहे आणि सरकारचें काम तर चांगले रीतीनें झालें पाहिजे. यावर सरकारची आज्ञा आम्हांस शिरसावंद्य आहे'. त्याजवरून त्यांस दरबारांतून पांच पांचशें स्वार प्रत्येकास ठेवितां येतील इतकी जमा वाढवि

ण्याचा हुकूम मिळाला. अगोदर सरकारची व **नाना फडणिसांची** यांजवर कृपा होतीच; मग यांनीं विनंति केल्यावर यांचें मनोगत पूर्ण कां होणार नाहीं ! **चिंतो त्रि-**

---

१ शेवटील दिग्विजयी पुरुष शिवाय करून सर्व पेशवे यांस माणूसपरीक्षा फार उत्तम असे हें मागें टिपेंत सांगितलेंच आहे. तशी राजास परीक्षा असणें अगदीं आवश्यक आहे. शेवटल्या वेळीं तिची न्यूनता पडली ह्मणूनच सर्व गोष्टींची न्यूनता होऊन आज आमच्या देशास द्रव्याची न्यूनता भोगावी लागत आहे. असो. थोरले बाजीराव यांणीं शिंदे होळकर यांस वाढविलें तेव्हां त्यांची परीक्षा करूनच वाढविलें. राणूजी शिंद्याची गोष्ट अशी ऐकिवांत आहे कीं, एक वेळ बाजीराव साताऱ्च्या दरबारीं गेले असतां राणूजी हा हुजऱ्या बरोबर होता. दरबारचे द्वारांत शिरण्याचे पूर्वीं राणूजीपाशीं जोडा देऊन आपण आंत गेले. सरकारी कामकाज उरकून बाहेर येऊन पाहतात तों हुजऱ्या निद्रिस्त असून जोडा उराशीं गच्च धरिला आहे. मग त्यास जागें करून सांगितलें कीं, 'जोडा खालीं न ठेवितां उराशीं धरिला, यावरून तूं सरकारची चाकरी काळजीनें करशील असें दिसतें'. मग त्यास लागलेंच सेनेकडे नेमिलें. पुढें दिवसेंदिवस त्याची बढतीच होत गेली. असो. महादजी शिंदा जो इतका प्रबळ झाला त्याचें मूळ पाहिलें तर असेंच आहे. यावरून यांणीं केलेली परीक्षा सत्यत्वास कशी उतरली तें पहा ! अशाच प्रकारचीं प्रत्येक पेशव्यांचीं उदाहरणें दाखवितां येतील. ठीकच आहे कीं, ज्या शिवाजी महाराजांचें प्रतिनिधीपद यांस मिळालें त्यांचीच परीक्षा ही यांस मिळाली असें वाटतें. कारण हा अजब गुण तर त्यांचे ठिकाणीं अपरंपार असे. त्यांचे लहानपणाचे सोबती पाहिले तर तान्हाजी मालसुरे, बाजी पासलकर, हे जिवाशीं जीव देण्यासारखे होते. तान्हाजी तर बिचारा यांच्या दुर्घट कारस्थानांत अतिशय उपयोगीं पडून सिंहगड घेत असतां मरण पावला. त्यांचे अष्टप्रधानही तसेच परीक्षेनें नामी नामी ठेविले होते. असाच एक मासला नानासाहेब बंडवाले यांचाही नजरेस येतो.

**बक व महादजी त्रिंबक** पुणेकर यांस सातशें स्वा
निशीं यांचे कुमकेस जाण्याचा आणि वर लिहिल्याप्रमा
नेमणूक वाढविण्याचा हुकूम सरकारांतून मिळाला. हा हु
हातीं पडतांच या वीर्यशाली **बापू गोखल्यास** फा
संतोष होऊन कर्नाटकाकडे स्वारी अघाडीस निघाले
आपल्या बरोबरचे सरदार व इतर सैन्य कर्नाटकांत येऊ
पोंचतें न पोंचतें इतक्यांत यांनीं **देसाई** यांचे सैन्याचे
तळाची तपासणी केली. **देसाई** यांचे स्वार आणि का
टक लोकांचें पायदळ मिळून पांच सहा हजार लोक, तसें
पांच तोफा यांसह तळावर **कितुरकरांची** फौज तयारीनें होती.
**बापू गोखल्याबरोबर** असलेली टोळी या तळावरील लो
कांनीं पाहून त्यांनीं उठावणी केली. हें पाहून ज्या शू
पुरुषाचा पोवाडा गाण्यास आह्मीं हातांत आज कलम धरिले
आहे त्या शूर पुरुषानें आपला प्रथमचाच पराक्रम **देसाई**
यांचे सैन्यास दाखविला. तो असा कीं, शत्रूच्या लोकांस
**बापूबरोबर** असलेलें थोडें सैन्य पाहून चेव आला, आणि
त्यांणीं एकदम युद्धास सुरवात केली. हें पाहून **बापूंनीं**
मोठ्या शूरत्वानें चाल करून जो आवेश आला त्या आवे
शांत शत्रूचे बहुत लोक मारून त्यांच्या तोफा सर्व हिसकावून
घेतल्या. हें करूनही आणखी **देसाई** यांजकडील लोकांचीं

---

तात्या टोपे कोण? आणि त्याणें लढाईत अजब चातुर्य दाखविलें
कसें? आणि शेवटीं मित्राकरितां मरून गेला कसा! आणखीही त्यांचे
लेही असेच कांहीं जिवापाड झटणारे असल्यावांचून इतका विभु
चिला असेल काय? असो. शेवटचे बाजीराव यांणीं जी गमाविली ती
परीक्षा यांचे ठिकाणीं धुरंधर होती हें उघड आहे. अशाच प्रकारची
वरील गोखले यांची परीक्षा केली असेल यांत संशय नाहीं.

पन्नास पाउणशें घोडीं पण धरून आणिलीं. याप्रमाणें पहिल्याच मोर्च्यास **देसाई** यांची फारच त्रेधा त्रेधा उडविली. हा **बापूं**चा पहिलाच प्रताप होय. हा अगदींच मोड झालेला पाहून **कितुरकरास** अशी भीति पडली कीं, या एका लहानशा टोळीनें आपली अशी दशा केली आणि आपण जर कां पुनः यांस आतां तोंड दिलें तर सर्व सैन्य येऊन आपला ठिकाण होता कीं नव्हता असें होऊन जाईल, आणि आपलें वडिलोपार्जित मिळविलेलें देसाईगिरीचें वतनही जाईल, याकरितां यांस शरण जावें हेंच वरें. असा विचार करून नवीन घातलेलीं आपलीं ठाणीं उठवून **गणेशपंत** भेरे यांजकडे आपला वकील पाठविला. त्या वकिलानें **भेरे** यांचें व **गोखले** यांचें सैन्य होतें तेथें जाऊन त्यांच्या मुलाखती घेतल्या, आणि **भेरे** यांस असें कळविलें कीं, सर्व नवीन ठेविलेली आमची फौज आतांच कमी करून येथून पुढें पेशवे सरकाराशीं विरुद्ध वागणार नाहीं असें वचन देतों. त्यांसही हेंच पाहिजे होतें. त्यांणीं वकिलाचें हें बोलणें मान्य करून पेशवे सरकाराकडे साकल्यवृत्त लिहून तात्काळ कळविलें. त्यांत **बापूंनीं** केलेला पराक्रम तसेंच बंडवाल्यांचा झालेला पराजय हें यथास्थितपणें लिहिलें, व परत येण्याविषयीं मला हुकूम व्हावा हेंही लिहिलें. हें वर्तमान दरबारीं कळल्यावर सरकारास परम संतोष होऊन **बापू साहेब** यांस पोषाक व अलंकार इनाम पाठवून

---

१ बाप दूरदृष्टि व धोरणी असला तर त्याचा मुलगा सद्गुणी आणि कर्तबगार निपजायाचाच; कारण मुलास सद्गुण आणि हुषारी वाढवावी अशी इच्छा होण्यास कांहीं तरी उत्तेजन बाप योजीत असतो. हीच गोष्ट राजास व त्याचे पदरचे सरदारांस लागू पडते. सरदार

त्रिवर्ग गोखले यांस कर्नाटकांत राहण्याचीं आज्ञापत्रें गेलीं. त्यांत मजकूर कीं, तुह्मी आपल्या पतकासुद्धां व **पुणेकर** यांच्या पतकासुद्धां मुलुखांत राहून बंदोबस्त राखावा. असा असून **गणेशपंत** यांस सैन्यासहवर्तमान परत बोलाविलें.

---

शूर, मुत्सद्दी, असले तर समजावें कीं, राजा उदार आणि गुणपरीक्षक आहे. एऱ्हवीं जेथें कधीं उत्तेजन मिळण्याचा संभव नसतो तेथें पदरचे नौकर आपला जीव धोक्यांत घालून पराक्रम करण्यास जातात कशाला? महाराष्ट्र देशाच्या इतिहासांत शूरांची व राजकारस्थानी पुरुषांची जी एवढी लांब मालिका दृष्टीस पडते याचें कारण पाहूं गेलें तर तो योग असा कांहीं चमत्कारिक आला होता कीं, गुणाढ्य चहातेच बहुतेक राजसूत्रांत प्रवेश करीत. तेणेंकरून गुणिजनांची यथायोग्य बूज होऊन त्याणें केलेलें शूरत्व किंवा कोणतेंही अघटित कृत्य निष्फळ होत नसे.

१ पूर्वी ही चाल फार उत्कृष्ट असे कीं, ज्या सरदारानें जेथें पराक्रम केला किंवा एकादा प्रांत काबीज केला तर त्याचें तात्काळ होणारें फळ राजानें न घेतां त्या सरदारासच द्यावें; ह्मणजे जो प्रांत काबीज केला तो त्यास जहागीर किंवा वसूल करण्यास मुखत्यारी द्यावी. अशानें सरदारांस विशेष उत्तेजन येत असे. मराठ्यांच्या राज्यांत जे इतके शूर पुरुष निपजले याचें कारण व आज सर्व हिंदुस्थानभर संस्थानें व राज्यें वेगळीं वेगळीं पसरलेलीं आणि वाढलेलीं दृष्टीस पडतात याचें कारण पाहतां वरीलच होय! पहा! महादजी शिंद्यानें सवाई माधवराव पेशवे यांजकरितां दिल्लीचे पादशहापासून सनद बहुप्रयत्नानें आणिली, ती त्याचेच उपभोगांत देऊन तेथील वकीलमुतलकी वंशपरंपरा त्याजकडेसच दिली.

स्पेनच्या राणीनें कोलंबसास नवीन भूमी शोधण्यास पाठविलें, तऱ्हां त्याशीं जे करार केले त्यांत कोलंबसाचे वंशजांचा नवीन सांपडणाऱ्या भूमीवर कांहीं हक्क ठेवण्याचाही करार केला होता. हाच करार त्याचें धाडशी अंतःकरणासही आल्हादपर झाला नसेल काय?

याप्रमाणें **गोखले** हे सरकारहुकुमानें कर्नाटकांत राहिले व बाकीचें सैन्य परत पुण्यास रवाना झालें.

७. कर्नाटक प्रांतांतील फौज परत गेल्यावर इकडे **देसाई** यांस पुनः वर डोकें काढावेंसें वाटलें. त्यानें आणखी शिबंदी वाढविली आणि पूर्ववत् गांवें लुटण्यास आरंभ केला. **गोखले** यांणीं ही खबर पुण्यास कळविली आणि हें बंड मोडण्यास आणखी सेना ठेवण्याची आज्ञा मागितली. ती आज्ञा मिळाल्यावर फौज वाढवून **कितूरकर** यांजला जी कांहीं आशा होती ती अजीबात नाहींशी केली. ह्मणजे त्याचें यथास्थित पारिपत्य करून आणखी अधिक दरसाल खंडणी घेण्याचें एक साधन करून घेतलें. तें असें कीं, तसा एक त्याजपासून दस्तऐवज करून घेऊन पुण्यास पाठवून दिला. हें सर्व पाहून सरकारास फारच संतोष वाटला.

८. वरील देसाई यांचा पराजय करण्याचे कामांत **गोखले** यांजवळ सैन्याचा बराच जमाव झाला. तो वाढत वाढत दोन अडीच हजारपर्यंत वाढला. इतक्या फौजेचा पगार सरकारांतून वेळचे वेळेस पावेनासा झाला, व फौजेस तर महिन्याचे महिन्यास पगार द्यावा लागत असे. या कारणाकरितां यांस कांहीं मुलूक हाताखालीं घालावा अशी मनीषा उत्पन्न झाली. ठीकच आहे; ही युक्ति तर त्यांच्या धन्याच्या धन्यापासून परंपरेनेंच चालत आली होती. तिचेंच अनुकरण यांस करावेंसें वाटलें यांत नवल तें काय!

शिवाजी महाराजांकडे बापानें आपल्या जहागिरीचा मुलूख देऊन आपण विजापुरकरांचे पदरीं चाकरीस असतां तेथून यांस पैशाविषयीं विचारावें तर या महत्त्वाकांक्षी पुरु-

थानें बापास कळवावें कीं, 'येथील उत्पन्न येथील खर्चास पुरेसें होत नाहीं! त्यास काय करावें!' आणि इकडे स्वारी मोठमोठ्या दुर्धर बेतांची योजना करीत होती. मावळे लोकांस आपले संवगडी करून मराठ्यांचे राज्या पाया उभा करण्यासाठीं जहागिरीचे खर्चांत काटकसर करून उरविलेला पैसा खर्च करण्यास तयार होऊन थोडक्या द्रव्यानेंच यानें एकोणिसाव्या वर्षी तोरणा किल्ल्यावर स्वराज्याचें निशाण फडकायास लाविलें.

प्रथमतः पुणें प्रांतींची जहागीर दादोजी कोंडदेव, शिवाजीचा शिक्षक व शहाजीचा कारभारी, त्याजकडे संभाळण्यास होती. नंतर इंदापूर परगणा, बारामती परगणा व पुण्याजवळची मावळांतील तळवट जमीन इतका भाग आणखी पुणें प्रांतींचे जहागिरीकडे लावून दिला, तरी ज्याणें पुढें संपूर्ण महाराष्ट्र देश यवनांकांपासून काबीज केला तरी इच्छा पूर्ण झाली नाहीं त्यास इतक्या मुलुखाचे वसुलापासून संतोष होतो कसला! त्याणें दादोजीचे मरणानंतर लागलेंच राजगड बांधण्याचें काम संपवून चाकणचा किल्लेकरी फिरंगोजी नरसाला याजपासून तो किल्ला घेऊन त्यासच तेथील मामलत दिली. नंतर शहाजीची दुसरी स्त्री जी तुकाबाई, हिचा भाऊ बाजी मोहिता याजकडे सुपे परगणा होता तो वश होईना ह्मणून मावळे लोक बरोबर घेऊन रात्रीस सुप्यांत शिरून बाजी मोहिते व त्याचे कारभारी यांस धरून कैद केलें, आणि अनुकूळ झाले त्यांस चाकऱ्या देऊन सुपे परगणा आपले अमलांत आणिला. तसेंच कोंडाणें किल्ल्यावरील अधिकारी मुसलमान यांस लांच देऊन ताब्यांत घेतला आणि त्यास



सिंहगड असें नांव दिलें. इतकें होत आहे तोंच पुरंदर किल्ल्याविषयीं आपसांत कलह उत्पन्न झाला. त्या कलहांत पडलासें करून तो किल्ला तात्काळ आपल्या हातीं आणिला. असा चाकण किल्ला व निरा नदी यांजमधील प्रांत मिळविला. असो, या शूराचा पोवाडा या नेमक्या ओळींत किती गातां येईल. ज्याणें संपूर्ण मुसलमानांस जर्जर करून महाराष्ट्र देशास स्वराज्याचें सौख्य दाखविलें, त्याचें वर्णन एकाद्या प्रचंड पुस्तकांत निराळेंच पाहिजे आहे! सारांश प्रथम जो हा प्रांत मिळविला तेथून पुढें याचें बल आणि तेज शुक्लपक्षाचे चंद्राप्रमाणें सारखें मरेपर्यंत वाढत जाऊन एकामागून एक प्रांत व किल्ले मिळत गेले.

हीच कला पेशव्यांच्या उपयोगीं पडली. त्यांणीं या शूर धन्याच्या युक्तीचें अनुकरण केलें नसतें तर दिल्ली अटकेपर्यंत भगवे झेंडे नाचत जाण्याची गोष्ट स्वप्नांत तरी आली असती काय! **बाळाजी विश्वनाथ** यानें दिल्लीहून चौथ सरदेशमुखी व स्वराज्य यांची सनद आणिली. पुढें तिचा उपयोग चिरंजिवांनीं केला! पहिले **बाजीराय** यांचा वरील सनदेच्या जोरावर प्रांत काबीज करण्याचा तर सपाटा चालला होता. असो; त्यांच्यापुढें तर मराठी राज्य पूर्ण उत्कर्षास पावलें होतें. सोनपतपानपतचे लढाईचे पूर्वी पेशव्यांचे दरबारीं असा बेत ठरला होता कीं, या मोहिमेंत

---

१ ही गोष्ट ग्रांट डफ साहेब यांणीं आपले बखरींत लिहिली आहे. त्यांणीं माहिती मिळविली तितकी माहिती आतां कोणास पाहिजे तर मिळण्याचा संभवही नाहीं. जागजागीं माहिती, जुने लेख पुष्कळ सांपडण्यासारखे आहेत, कोणी आपलीं कांहीं वर्षें (आमच्या मतें तर या प्रचंड उद्योगास एका मनुष्याचें आयुष्यही पुरणार नाहीं.

अटकेपलीकडे अफगाण लोकांस हाकून देऊन त्यांचे
तोंडावर शूर सरदार जे **शिंदे** आणि **होळकर** यांस
हेमी ठेवायाचें. **शिंदे** आणि **होळकर** हे सरदार शूर
विषयीं खात्रीचे असत ह्मणून यांस राज्याचे सरहद्दीवरचे
देऊन नेहेमी ठेवावें, असो पेशवे सरकारचा सांप्रदाय अ
ल्या सांप्रदायास अनुसरून अटकेपलीकडील मुलूख कार्बि
करून ह्या दोघां सरदारांस तेथें जहागिरी देऊन उत्त

कारण सर्व हिंदुस्थान देशभर संस्थानें आहेत त्याचा मूळ पाया शौ
त्यावांचून ही गोष्ट पूर्णतेस पावेल कशी ?) इकडे घालविलीं
या माहितीनें व लेखानें अजून एक कपाट भरून जाईल असें अ
खरें; तरी ग्रांट डफ, यांस जशी अधिकाराची, द्रव्याची, वगैरे अनु
लता होती तशी सांगड आतां जुळणें दुरापास्तच ! व तितका संग्र
मिळविणेंही दुर्घटच ! वर ह्मटल्याप्रमाणें आयुष्य तर काय, पण कांहिं
वर्षेंही घालविण्यास कोणास इच्छा वाटेल, असें हल्लीं जी आमच्या
देशाचे इतिहासाची प्रीति नवीन विद्वानांत दृष्टीस पडते त्यावरू
वाटत नाहीं. ग्रांट डफनें जो उद्योग केला त्यावरून त्याची वृ
कशी झाली व त्याणें आमच्या लोकांविषयीं जें मत दिलें आहे
पाहून आम्हांस आश्चर्य वाटतें ! आमच्या देशाचें दुर्भाग्य पहा कीं
जें स्वामी रामदास यांनीं दिलेलें भगवें निशाण रायगडापासून निघालें
तें कालेंकरून दिल्ली, अटक, लाहोर पर्यंत फडाडत गेलें व अजूनही
उत्तरेस फडाडत आहे, त्याची हकीकत लिहिण्यास युरोपियनाखेरीज
दुसरा कोणी मिळाला नाहीं ! ! व त्याणें जें काम केलें त्याच्या शतांश
करावेंसें अद्याप कोणास वाटत नाहीं ! अल्लाउद्दीन खिलजी याचे
पलीकडील माहिती आज कांहींच मिळण्याची आशा कोणाही हिंदू
नाहीं काय ? तोच आमच्या देशाचे इतिहासाचा उगम काय ? हल्लीं
एक सुवार्ता कानीं पडली आहे कीं, 'विविधज्ञानविस्तार' मासिक पुस्त
कांत एक देशाभिमानी पुरुष पूर्वींचे इतिहाससंबंधीं जुने लेख मिळ
वून सावंत्त छापणार आहे !



मन मानेल तशी हद्द वाढविण्याची परवानगी द्यावयाची, आणि त्यांचें राज्य उत्तर हिंदुस्थानपर्यंत असलेलें सर्व पुण्याखालीं खुद्द पेशव्यांचे अमलांत ठेवायाचें, असा संकेत होता. असो. ज्या **शिवाजी** महाराजानें मुसलमानांच्या त्रासानें स्वतंत्र मराठी राज्याची स्थापना केली व हा सर्व हिंदुस्थान यवनी संस्थानांनीं भरला असून महाराष्ट्र देश कात्रीज केला, आणि गोब्राह्मणप्रतिपालक राज्य स्थापलें. त्यांत कित्येक वेळां तर अपार शौर्य, अपार चापल्य आणि अपार कौशल्य प्रकट करण्यांत आलें. त्यांच्या प्रधानांकडून वरील वेत होऊन यवनी राज्याचा हिंदुस्थानांतून ठिकाण मोडून त्यांच्या वाटाच रोखून बंद करणें ठरलें हें आश्चर्य कसचें ! असें करणें त्यांचें स्वभावजन्यकृत्यच समजलें पाहिजे. आणि त्यांच्या विशेष उत्कर्षास कारण हेंच ब्रीद झालें. स्वदेशाभिमानाचा हा ठसा सर्व राज्यकारस्थानी पुरुषांवर मराठी राज्यांत कसा उमटला असे, ही गोष्ट वरील वेळांवरून चांगली लक्षांत येईल. असो. वरील पुण्यास ठरलेली पेशव्याचे दरबारची मसलतच पानपतचे लढाईंत मराठ्यांचे अपजयास कारण झाली. उघड आहे; चांगलें सोयखोर घर बांधलें असून तेथून दुसरीकडे राहण्यास जाण्यास सांगणें घराच्या मालकास जसें रुचणार नाहीं, तीच गत ही मसलत ऐकून **शिंदे** आणि **होळकर** यांस झाली. त्यांनीं लढण्याचे कामांत फारच कसूर केली. एकाद्या मनुष्याचे हात बांधून त्यास कुस्ती करण्यास सांगितलें तर परिणाम काय होईल ? तोच परिणाम या लढाईंत घडून आला. काय ते प्रतापी सरदार शिंदे आणि होळकर हेच. हे पेशव्यांचा डावा आणि उजवा हात ह्मटलें तरी चालेल. त्यांनीं प्रसंगीं तोंड नाहीं

दिलें तर काय होईल, हें दिसतेंच आहे! दुर्दैवानें उ
डणें तें घडून आलें. हिंदुस्थानासारखी सुपीक जमीन
टली तर क्वचितच. त्यांतून शिंदे आणि होळकर यांचे
च्यांत जो मुलूख आहे त्याची बरोबरी करण्याजोगी पि
जमीन हिंदुस्थानांतही नाहीं! ही गोष्ट अद्याप सर्वांस
दित आहे. असा मुलूख टाकून उखीर वाखीर आणि
तमय काबुलांत जाऊन हिंगाचीं झाडें राखीत बसणें शिं
आणि **होळकर** यांस कसें बरें आवडेल! असो. आ
पूर्व विषयाकडे वळूं.

९. **गोखले** यांजवळ फौजेचा जमाव अडीच हजा
पर्यंत झाला होता. त्या फौजेचा खर्च श्रीमंतांकडून[1] वेळ
वेळेस पोंहोचत नसे आणि फौजेस तर दरमहाचे दर
वेतन दिलें पाहिजे. याकरितां नवलगुंदकर देसाई यां
नवलगुंद तालुका सुमारें तीन लक्षांचा होता तो दा
आपलेकडे घेतला. पुढें त्या वसुलानेंही सेनेचा खर्च
गलासा भागेना इतकी सेना वाढली. नंतर करवीरकर रा
पटवर्धन आणि मोंगल यांचे मुलखांतील चांगले आबाद गा
पाहून त्यांजवर स्वारी करावी आणि गांवापासून खंड
घ्यावी; खंडणी न मिळाल्यास लूट करून द्रव्य आणा
असा क्रम चालला. तोफा, पायदळ आणि स्वार मिळू
सुमारें तीन चार हजार पावेतों हमेषा जवळ बाळगण्या
सामर्थ्य यांस आलें. या सुमारास कर्नाटकांत वारंवार बं

१ श्रीमंत हें नांव आतां फक्त वृद्ध मनुष्याचे तोंडून मात्र केव्हां केव्हां ऐकूं येतें. हें नांव पूर्वी पेशव्यांस देत असत हें वाचकांस क ळवितों. ब्रह्मावर्तास शेवटले बाजीराय असतां त्यांसही तेथील मंडळी याच पदवीनें आळवीत असत.

डावा होत असे, त्याचें पारिपत्य करून बंदोवस्त ठेवावा आणि सरकारास झालेले मजकुराचीं विनंतीपत्रें पाठवावीं असा परिपाठ असे. या निमित्तामुळेंच सेना जास्त ठेविल्याबद्दल दोष वगैरे येण्याचा संभव नव्हता. उलट या विनंतिपत्रापासून पेशव्यांची मर्जी सुप्रसन्न राहिली.

१०. कर्नाटकांत तुंगभद्रेनजीक हुनगी ह्मणून एक मोठा गांव आहे. त्या गांवासभोंवतीं कोट असून आंत किल्ल्याप्रमाणें गढी असे. ती गढी मजबूत असून त्यांत तोफा वगैरे सामान व पांचशें लोक नेहमीं रहात असत. सरकारास आपलें गांव केवढें आहे हें समजूं नये, ह्मणून सरकारी नौकरांस गांवांत येऊं देत नसत. सालाबाद जमावंदी करण्याकरितां मामलेदार आला ह्मणजे त्यास सामोरें गांवाबाहेर जाऊन डोळे बांधून गढींत नेऊन तेथें डोळे मोकळे करावे व त्यास तडजोडीनें मर्जीप्रमाणें वसूल देऊन ग्रामस्थांनीं मार्गस्थ करावें असा परिपाठ असे.

हें वर्तमान गोखले यांस कळल्यावर कांहीं शिबंदी बरोबर घेऊन त्या गांवावर गेले. तों काटक लोकांनीं गोळी चालू केली. हें पाहून एकदम हल्ला करून गांव सर केला, आणि आंत गेल्यावर जितके काटक लोक लढत होते तितक्यांचीं डोकीं उडवून आपलेकडील कारकून शिबंदी ठेवून गांवचा बंदोवस्त केला, व याचप्रमाणें जेथें जेथें बंडाई होती व कमावीसदार याचा अम्मल रयत मानीत नव्हते तितक्यांचें पारिपत्य करून सर्व कर्नाटकांत जरब वसेल अशी व्यवस्था केली. ह्यापासून सरकारचा अम्मल बसून वसूल सुरळितपणें पोहोंचूं लागला.

राज्याचा मरातब वाढविणें हेंच सरदाराचें काम, व

एवढ्यासाठीं पदरीं खर्च बाळगून सरदार ठेवावे लागतात. शिंद्यासारखे व भोंसल्यासारखे सरदार नसते तर 'मराठे राज्य इतक्या योग्यतेस पावतेंचना. खुद्द शाहू राजास पेश-व्यासारखे प्रधान न मिळते तर मराठी राज्याचा पाय मुळींच डळमळीत झाला असता! तसेंच गोखले यांणीं पेशव्यांचा अम्मल कर्नाटकांत पूर्ण बसविला हें थोर सरदा-रीचेंच लक्षण होय.

हें कर्नाटकांतील वर्तमान ऐकून श्रीमंतांस फारच संतो- वाटला, व त्यांनीं गोखल्यांची तारिफ केली.

११. हैदरअल्ली ह्मणून एक मुसलमान शिपायाचा पु असे. हा पहिल्यानें बापाचाच धंदा करीत असे. पण अं शौर्य असल्यामुळें लागलाच प्रबळ होऊन आपल्या धन्या पदच्युत करून त्याचे स्थानीं आपणच झाला. आज ह प्रांत घेतला, उद्यां तो प्रांत घेतला, अशा रीतीनें तो मुल वाढवूं लागला. पेशव्यांच्या मुलुखास त्यांजपासून उपद्र होऊं लागला. तसेंच निजामाचे मुलुखासही होऊं लागल तेणेंकरून त्रास पावून सन १७६७ त पेशवे, निजा आणि इंग्रज या त्रिवर्गांनीं विचार केला कीं, हैदरअल्ली वाढूं देऊं नये. पहिले पेशवे हें नांव सर्वांस विदित आहेच दुसरे निजाम, हे हैदराबादचे राजे. अद्यापपर्यंतही तेथी गादीवर त्यांचे वंशांतील एक पुरुष विराजमान असून त्यां बऱ्याच थाटामाटानें राज्यवैभव राखलें आहे. तिसरे इंग्रेज हे आज उत्कर्षाच्या पूर्ण शिखरास पोहोंचले आहेत.

वर **हैदरा**विषयीं लिहिलें त्याचप्रमाणें त्याचा पुत्र **टिपू** सुलतान याणेंही मुलूख काबीज करण्याचा सपाटा चालविला. कर्नाटकांत श्रीरंगपट्टण वगैरे प्रांत हैदरानें

जिंकिले होते. ते राखून त्याहून ज्यास्त राज्य वाढवावें या आशेनें निजाम आणि पेशवे यांचे राज्यास उपद्रव देऊं लागला. नरगुंदकर **व्यंकटराव** हे पेशवे सरकारचे आप्तसंबंधी असून करवीरकर यांचे हे अष्टप्रधानांपैकीं सचीव होते. यांची व टिपूची दहा महिने लढाई चालून अखेरीस टिपूनें नरगुंदचा किल्ला घेऊन नरगुंदकराचे दिवाण **काळोपंत** यांजला धरून पिंजऱ्यांत घालून मारिलें, आणि खुद्द व्यंकटरावजीसही कैद केलें होतें. वर सांगितल्या-प्रमाणें **हैदरा**च्या व **टिपू**च्या नाशास्तव पेशवे, इंग्रेज आणि निजाम हे त्रिवर्ग पूर्वींच एक झाले होते, परंतु टिपू हा या त्रिवर्गांसही सामान्य शत्रु नव्हता; कारण तो लढा-ईंत पिसाळल्या वाघाप्रमाणें तुटून पडणारा योद्धा होता. असो. त्याचें पारिपत्य करण्याकरितां इंग्रेजांची फौज नेहमीं कर्नाटकांत उतरली होतीच; आणि वर जो नरगुंदकराचा प्रकार सांगितला तेव्हांपासून पेशव्यांसही फार राग आला होता, आणि त्यांचेही मनांत **व्यंकटरावजीं**ची मुक्तता करण्याकरितां **टिपू**शीं सामना करावा असा विचार होता. व नरगुंदकरांचा मुलूख त्याजकडून हिसकून घेऊन नरगुंद-करांस परत देणें हें आपलें कर्तव्य आहे, अशी त्यांची समज होती. याच सुमारास इंग्रेजांसही पेशव्यांची मदत पाहिजे होती ह्मणून श्रीमंतांनीं आपले सरदार **परशुरामपंत** भाऊ पटवर्धन[१] यांस फौजेसह जाण्यास आज्ञा करून गोखले यांस

---

१ पटवर्धन घराणें युद्धकौशल्यांत किती निपुण होतें हा लौकिक कोणास सांगायाला पाहिजे असें नाहीं; कारण शेवटल्या बाजीराय-पर्यंत यांचा तरवारबहादूरपणा जय्यत गाजतच होता. एकदां बाजीरायाची खोड मोडल्यासारखेंच त्यांणीं केलें:—

त्यांचे मदतीस जाण्याचीं आज्ञापत्रें पाठविलीं. हा हुकू
पोहोंचल्यावर दोन हजार स्वारांनिशीं गोखले पटवर्धना

---

पूर्वी कोल्हापूरकराकडून आपल्या राज्यास फार उपद्रव लागतो
दुसऱ्या कोणत्याच तऱ्हेनें मोडणार नाहीं असें पाहून पटवर्धन
कोल्हापूरचे सरहद्दीवर सांगली, मिरज, हे प्रांत पेशव्यांनीं जहागि
दिले. पटवर्धन तर शूरच; त्यांणीं कोल्हापुरकराचा उपद्रव अजीं
नाहींसा करून उलट आपल्या जहागिरी कोल्हापूरकरांच्या मुलख
वाढविल्या. याप्रमाणें शेवटपर्यंत पटवर्धन यांची वहतीच हो
गेली. ती धाकटे बाजीराव यांस मात्र नापसंत होऊन त्यां
जहागिरीकडे डोळा ठेविला. त्याणें जुने प्रधान व जहागिरी
बहुतेक कमीच करून माणकेश्वर, नारो आवटी, बाळोबा कुंज
असेंच नवें प्रधानमंडळ योजलें होतें. हेंच मंडळ राज्य गमावण्या
कारण झालें असें ह्मणतात. असो. पटवर्धन हे शूर फार. यांच्या जहागि
हस्तगत होण्यास तर बिलकुल इलाज चालणार नाहीं असें पाहून त्यां
मारेकऱ्याकडून तरी मारवावें असा मनसुबा करून पटवर्धनाच्या
रच्या सर्व पुरुषमंडळीस वाड्यांत एके दिवशीं मेजवानीस बलाविलें
त्यांच्याकरितां एक स्वतंत्र उत्तम जागेची योजना करून बाकी स
पात्रें दुसरे दिवाणखान्यांत मांडलीं. बाजीरावाचें आचरण पटवर्धन
मंडळीस सर्व माहीत होतें ह्मणून त्यांनीं तरी हा बेत अटकळीनें
तात्काळ जाणला, पण मनांत काडीइतकी कचर न आणितां खुशा
लपणें जेवायास गेले. पात्रें वाढून तयार झाल्याची खबर येतांच अ
लेली चवदा पंधरा मंडळी एकाचढी एक तेज:पुंज आणि सुरेख दे
खणे राजबिंडे पोषाग उतरून जरीकांठी पीतांबर परिधान करून उ
त्तरीयवस्त्र ह्मणून शाली आंगावर घेऊन नग्न तलवारी सोन्यारुप्या
च्या कंबरपट्यांत कमरेस लटकावून एकामागें एक पात्रें मांडलीं
होतीं तिकडे सडक चालते झाले! त्यांची ही योजना व इभ्रत पाहून
बाजीरावाचा बेत भीतीमुळें सर्व फसला!! आणि तेव्हांपासून पट
वर्धनांचा-बाजीरावावर दरारा बसला!!!

जाऊन मिळाले. यांची सर्व जमियत फौज पंचवीस हजारपावेतों जमली. एक दोन दिवसांतच जाऊन **टिपूचे** सेनेची गांठ घ्यावयाची, परंतु कृष्णानदीस पूर फार आला यामुळें नदीचे किनाऱ्यासच मुक्काम करणें यांस भाग पडलें. सर्व सेना नदीवर तळ देऊन राहिली असतां दुसरे दिवशीं टिपूकडील सुमारें पांचशें स्वार, पेंढाऱ्यांपैकीं असलेले नदीचे पलीकडील बाजूस ह्मणजे या फौजेच्या दक्षिण दिशेस कृष्णा नदीचे काडेवर येऊन उभे राहिले. त्यांस पेशव्यांची फौज अतिशयित आहे हें माहित असूनही आले, ही मोठी नवलाची गोष्ट आहे. असो. हे स्वार पाहून **परशुरामपंत** भाऊ बोलले कीं, 'आपल्या फौजेंतून कोणी जाऊन या स्वारांशीं सामना करील तर फार चांगलें होईल.' हें बोलणें **धोंडोपंत** दादा गोखले यांनीं ऐकून डेऱ्यांत येऊन तीनशें लोक कृष्णा नदींतून पोहून पार जाण्यासारखे बरोबर घेऊन तोंडांत तरवारी धरून उड्या टाकून नदीपार पोहून गेले. टिपूकडील स्वार गाफील होते. त्यांस एवढ्या पुरांतून आपल्यावर शत्रु येईल असा संभव देखील वाटत न-

---

१ धोंडोपंत गोखले शूर कमी नव्हते ही गोष्ट आह्मीं वर लिहिलेल्या चरित्रावरून वाचकांच्या ध्यानांत येऊन चुकलीच असेल; बापू गोखल्यांचें शौर्य तर अद्याप आबालवृद्धांच्या मुखीं गाजत आहे! बायका जात्यावर ओंव्या गातात त्यांत सुद्धां आम्ही त्यांच्या पराक्रमाच्या गोष्टी गाइलेल्या ऐकिल्या आहेत!!! अष्टयाच्या लढाईंत याणें गाजवलेली तरवार पाहून व शेवटचा त्याचा पराक्रम ऐकून सर्व लोकांस त्याचे शौर्याची पराकाष्ठाच वाटली; आणि तेव्हांपासून याच्या सुकीर्तीचा नगारा चोहींकडे दणदण वाजूं लागला!!! तो आजपर्यंत धीमू धीमू ऐकूं येतच आहे!

व्हता. इतक्यांत एकदम त्यांजवर हल्ला झाला. त्या हल्ल्यांत हातघाईवर येऊन टिपूकडील पन्नास साठ असामी जखमी होऊन त्यांचीं घोडीं धोंडोपंत गोखले यांनीं घेतलीं. बाकी उरलेल्या स्वारांनीं तात्काळ आपल्या गोटांत पळ काढला. हा चमत्कार पैलतीरीं परशुरामपंत भाऊ पटवर्धन व सर्व सेना पाहत बसली होतीच. त्यांनीं हें पाहून माना डोलविल्या आणि लागलेच नावा पाठवून दादास त्यांचे लोकांनिशीं आलीकडेस आणिवलें. हा प्रथम मोर्चा टिपूकडील स्वारांचा गोखले यांनीं उडविल्यावर थोडेच दिवसांनीं टिपूशीं इंग्रेज व पेशवे यांनीं युद्ध केलें. त्यांत टिपू पराजय पावून लागलाच तह करिता झाला. तहांत मूळ संकेताप्रमाणें नरगुंदकरास कैदेंतून सोडवून त्यांचें संस्थानही मोकळें करवून त्यांचें त्यांस परत दिलें. परशुरामपंत भाऊंचें पत्र लढाईचे हकीकतीविषयीं पेशव्यांस पूर्वींच पोंचलें होतें. त्यावरून गोखले यांस बहुत आदरानें दरबारचीं सन्मानपूर्वक पत्रें पाठविलीं. पुढें थोडेकेच दिवसांनीं या युद्धाचा परिणाम तारीख ४ मे सन १७९९ रोजीं टिपूचें राज्य इंग्रज लोकांनीं घेतलें हा झाला. त्याच सुमारास टिपूचा शेवट झाला. असो.

१२. इकडे याच सुमाराचे वेळीं खर्ड्याच्या लढाईंत पेशवे सरकारांनीं अजब जय मिळवून निजामास मेणाप्रमाणें मऊ केला. फार दिवस निजामाचा दिवाण जो मुशीर उल्मुलुख याजवर असा डोळा होता कीं, हाच निजामास आपल्याविषयीं चिडवीत आहे. तो सूड पूर्णपणें उगविण्याकरितां त्यास पुण्यास कैदेंत ठेवून सवाई माधवराव पेशवे यांनीं

जधामास गेले. त्या वेळीं संपूर्ण पुण्यनगरी शोकाक्रांत झाली. संपूर्ण महाराष्ट्र देशास या प्रभूचे कारकीर्दीत जें सौख्य

१ सवाई माधवराव जिवंत असतां त्यांच्या चातुर्याचा व शहाणपणाचा मोठाच लौकिक होता; अल्पवयी राजा असून रयतेस पराकाष्ठेचें सौख्य मिळालें यावरून त्यांच्या राज्यास रामराज्य ह्मणत असत. ते मृत्यु पावले तेव्हां प्रभु निजधामास गेले म्हणून सर्वजन ह्मणूं लागले. तोच शब्द आह्मीं वर योजिला आहे.

वरील गोष्टीचें प्रमाण अशी भोळ्या लोकांनीं पिकविलेली एक चमत्कारिक दंतकथा अद्याप लोकांत राहिली आहे, ती काय कारणानें उत्पन्न झाली याचा पत्ता तर बरोबर समजत नाहीं, परंतु तिजवरून त्या प्रभूविषयीं लोकांची पूज्यबुद्धि कशी होती हें स्पष्ट व्यक्त होतें, ह्मणून ती येथें सादर करतों:—

सवाई माधवराव पुण्यास राज्य करीत असतां पुण्याचा एक गृहस्थ महायात्रा करण्याकरितां गेला. काशीयात्रा आटपल्यावर बद्रीनारायणाकडे जाण्यासाठीं निघाला. बद्रीनारायणास जानेवेळीं भागिरथी मार्गांत लागते आणि तेथें ती अतिशयित खोल आहे. ती इतकी कीं तळीं पाण्यास नजर देखील पुरत नाहीं. तिजवरून जाणें तें शिक्यांत बसून जावें लागत असे. आतां मात्र लहानशी वाट केली आहे ह्मणून ह्मणतात. त्या शिक्यांतून तो गृहस्थ जात असतां अर्ध्यांत शिकें तुटलें आणि बोवांनीं तळाचा रस्ता धरिला. अशा वेळीं त्यास शुद्ध तरी कोठून राहणार! स्वारी तळीं निपचीत जाऊन एका विवरांत पडली. (प्राण कसा राहिला असेल याचा आह्मांस मोठा संशय वाटतो.) थोड्या वेळानें डोळ्यांवरील झांपड गेल्यावर इकडे तिकडे पाहिलें तर पलीकडे कांहीं आसनांवर तपोनिष्ठ ब्राह्मण तपश्चर्या करिताहेत असें दिसलें. प्रत्येकाच्या पुढें एक एक प्रज्वलित दीप प्रकाशमान असा होता; फक्त एका रिकाम्या आसनापुढें दीप जळत असून आसनावर कोणीच नव्हतें. हें सर्व पाहून यास मी कोठें आहें, पाहतों काय, हें कांहींच समजेना, तरी तेथून उठून एका मुनीस जाऊन नमस्कार केला. त्याणें नेत्र उघडून पाहिलें आणि 'कोण?

लाभलें होतें तें त्यापुढें तर बोलावयासच नको, परंतु म
गेंही कधीं लाभलें नव्हतें असें ह्मणतात. असो. ते दुःखा
अश्रु अद्याप पुण्यग्रामांतील ब्रह्मवृंदाच्या नेत्रांचे खळले ना
हींत. वरील समयीं महाराष्ट्र देशास तर काय पण सकळ
हिंदुस्थानासही शोक झाला आणि आतां आपलें दुःखवि
मोचन होण्याची तिळभर सुद्धां आशा नाहीं असें समजून

---

येथें येण्याचें कारण काय? व येतां कसें आलें?' हें विचारलें
त्याणें जी हकीकत झाली होती ती निवेदन केली, परंतु येथें कसा
आलों हें समजत नाहीं, असें सांगितलें. त्या मुनींनीं त्याचें भय
निवारण केलें आणि सांगितलें कीं, 'तुला परत वर नेऊन पोंचतें
करूं. काळजी करूं नये.' याची कांहीं धास्ती कमी झाल्यावर त्यास
त्या रिकाम्या आसनाचें कारण विचारलें. मुनींनीं असें सांगितलें
कीं, 'हल्लीं पुण्यास जे माधव नांवाचे राजे राज्य करितात त्यांचें
हें आसन. पुण्यास गादी रिकामी पडली आणि संपूर्ण ब्रह्मवृंदास
काळजी पडली कीं आतां गादीचें काय होईल? ह्मणून या आसना
वरील पुरुषानें तिकडे पेशवे कुलांत जन्म घेऊन राज्यसुख भोगिलें.
आतां मात्र त्याची इकडे परत येण्याची मुदत भरत आली आहे, या
करितां आम्ही तुजपाशीं एक पत्र देणार आहों तेवढें त्यास नेऊन दे.
तें पत्र गुप्त रीतीनें मात्र दिलें पाहिजे, म्हणजे तो सत्वर येईल.' असें
म्हणून पत्र लिहून दिलें. आणि त्याचे डोळे झांकून पूर्व ठिकाणीं आ
णून ठेविलें.

कांहीं दिवसांनीं हा गृहस्थ पुण्यास येऊन पत्र पोंचतें करण्याचा
इलाज करूं लागला, परंतु श्रीमंतांची एकांत गांठ कोठली पडते!
ह्मणून एक दिवस संधि साधून शनवारचे वाड्यांत दिल्ली दरवाज्यावर
कवाडाआड खिडकी जी आहे तींत बसून श्रीमंतांची पालखी सायंका
ळीं दरवाज्याबाहेर निघत असतां पालखींत टाकून दिलें. मग त्याज
वर दोन दिवसांनींच कारंज्यावर श्रीमंतांनीं उडी टाकली असें म्हण
तात. पुढील मृत्युप्रकार तर सर्वांस माहीत आहेच.

शोकसागरांत बुडून गेले. या समयीं पुण्यनगरीची कोण दशा झाली असेल बरें ! ईश्वराच्याच दयालुत्वावर भरंवसा ठेवून त्यांस अश्रु पुसणें प्राप्त झालें. असो.

**सवाई माधवराव** मृत्यु पावल्यावर राज्यावर बसवावें कोणास, हा मोठाच घोंटाळ्याचा प्रश्न उत्पन्न झाला. **नाना फडणिसा**दि कारभारी मंडळींचे मनांत **यशोदा** बाईचे मांडीवर **राघोबादादा**चे पुत्र अमृतराय अप्पा यांस देऊन त्यांजकडून राज्यकारभार चालवावा. या गोष्टीस शिंदा प्रतिकूळ झाला. त्याचें वजनही भारी असल्यामुळें कारभारी मंडळीचा बेत फसून शिंद्यानें बाजीराव यांस गादीवर बसविलें. त्या गर्दीत नाना फडणीस पळून साताऱ्यास गेले होते. पुढें त्यांस आणवून नगरच्या किल्ल्यांत ठेविलें.

१२. ही वरील संधि पाहून पटवर्धन यांनीं असा विचार केला कीं, नेहमी गोखल्याकडून आपल्यास उपद्रव लागतो ह्मणजे वारंवार मुलूख लुटतात, खंडण्या घेतात; यासाठीं त्यांशीं लढाई करून त्यांचें पारिपत्य करावें हें बरें. मग त्याप्रमाणें त्यांच्या स्वारांची एक लढाई झाली, तींत महादाजी त्रिंबक पुणेकर व आणखी कांहीं गोखल्याकडील लोक यांस जखमा लागल्या, परंतु पटवर्धनाकडील बरेच लोक मारले व जखमी केले. शेवटीं उभयतांचा लवकर सल्ला झाला; परंतु या गोखल्यास दुसरा एक शत्रु उत्पन्न झाला. वाचकांस ठाऊक असेल कीं, कर्नाटक प्रांतीं यांच्या फौजेस खर्च पुरेना ह्मणून यांनीं करवीरकर राजे यांच्या मुलखांत व पटवर्धन यांच्या मुलखांत लुटालूट करावी; त्यापैकीं पटवर्धन यांनीं सूड उगविण्याचा जो प्रयत्न केला तो नुकताच सांगण्यांत आला आहे. आतां दुसरे जे करवीर-

कर यांनींही गोखल्यांचा सूड घेण्याचा निश्चय केला. ।
हकीकत वाचकांस कळविण्यापूर्वी दुसरी एक महत्वा
गोष्ट प्रस्तुत प्रसंगीं सांगणें इष्ट वाटली ह्मणून सांगून नं
पुनः वरील गोष्टीकडे वळूं.

आह्मीं गोखलेमंडळ प्रथम कोंकणांतील एका खेड्यां
काढून कांहींवेळ विजयादुर्ग येथें नेऊन नंतर जे ए
कुग्रामांतील कांहीं दिवसांपूर्वी शेतकरी होते तेच पुण्या
दरबारीं आणून सोडिले. तेथें त्यांचा कांहीं उत्कर्ष
हुशारी झाली ती दाखवून तेथून सरदार बनवून कर्ना
कांत आणून सोडिलें. या इतक्या गोष्टी आमच्या वा
कांच्या डोळ्यांपुढें दिसत असतील अशी खात्री आहे. इत
वेळ फौजेच्या खर्चाकरितां काय तो मुलूख त्यांस श्रीमंतां
दिला होता, व श्रीमंतांचीच काय ती वहाल मर्जी अ
आतां दुसरे जे निजाम त्यांचीही मर्जी प्रसन्न होऊन त्यां
देणगी दिली तें श्रुत करितों. एकदां निजामाचे कांह
लोक लढाईत सांपडले असतां **धोंडोपंत** दादा व **बापू
साहेब** मध्यें पडून ते लोक घायाळ झालेले सोडवून हैद
राबादेस सुखरूप पोंचते केले. ह्या प्रसंगीं **धोंडोपंतां**
तोंडावर तरवारीचा वार लागला आणि **बापू साहे**
यांचे मणगटावर तरवारीची जखम लागली. हें निजामा
समजल्यावर दहा हजारांचा मुलूख जहागिरीदाखल इना
दिला. पुढें थोडक्याच दिवसांत करवीरकर राजे यां
विचार केला कीं, फौज पाठवून गोखले यांचें पारिप
करावें, असें मनांत आणित्याप्रमाणें रत्नाकर अप्पा दिवा
यांजबरोबर पांच हजार स्वार, व कांहीं पायदळ, व दह
पंधरा तोफा आणि साहेब नौबत इत्यादि सामान देऊन

गोखले यांजवर पाठविलें. ते समयीं वर सांगितल्याप्रमाणें पुण्यास **बाजीराव** साहेब नुकतेच गादीवर येऊन दाखल झाले होते. पण कारभारी कायमचा कोणी नसून, बेबंद राज्य झालें होतें. **नाना फडणवीस** यांस शिंद्यांनीं नगरच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें होतें. असो. असल्या झोटिंग पादशाहींत आपल्यास दरबारचा हुकूम मिळणार नाहीं, तेव्हां अशा समयीं करवीरकरांचे फौजेशीं सामना तर करणें आहे. मग सावनूर शहराची नाकेबंदी करून तेथें किल्ल्यांत फौजेचा तळ दिला. त्या शहरास मजबूत कोट असून त्याभोंवतीं खंदक खणून आणखी मजबुती करविली. ही बातमी करवीरकराचे फौजेस समजल्यावर तिनेंही तात्काळ येऊन शहरापासून तीन कोसांवर दूर तळ दिला. मग दररोज शहरावर चाल करून गोखल्याचे फौजेशीं लढाई करावी असा क्रम चालला. ज्या दिवशीं करवीरकरांचे फौजेचा जोर फार होई त्या दिवशीं गोखल्याचे फौजेनें असें करावें कीं, किल्ल्याचे आश्रयास राहून शहराचे तटावरून तोफांचे गोळे मारावे. असें झालें ह्मणजे राजाची फौज आपोआप मुक्कामास जाई. असें तुमुल युद्ध सहा महिनेपर्यंत सारखें चाललें होतें. सहा महिल्यांत मदत मिळण्याकरितां पुण्यास गोखल्यांनीं पत्रें बरींच पाठविलीं, परंतु पुण्याहून मदत मिळण्याचा सुमार नव्हता. ही संधि पाहून रत्नाकर अण्णा दिवाण यांनीं असें केलें कीं, बाहेरून आंत दाणा वगैरे जाऊं देण्याची मनाई केली. त्यांस वाटलें कीं, आज सहा महिने एके गांवांत यांस कोंडून ठेविलें आहे. आतां हें बहुतेक आपल्या हातीं आल्याप्रमाणेंच झालें आहे. पुण्याहून तर मदत येतच नाहीं. धान्याचा

तोटा पाडला ह्मणजे आपोआप हे स्वाधीन होतील. ह्या घमंडींत ते बेफिकीर राहून नित्यशः थोडी फार फौज किल्ल्याकडे रवाना करून आपण तळावरच राहूं लागले. धनी जाग्यावर नसल्यावर चाकर काय करील, हें सर्वांस ठाऊकच आहे. त्याप्रमाणें एक दोन टोळ्यांनीं शहरावर जाऊन सायंकाळीं परत माघारी यावें. इकडे गोखले मात्र मोठ्या संकटांत पडल्यासारखे झाले होते. कारण जवळच्या धान्याची बेगमी कधीं तरी सरून जाईल ही एक काळजी. दुसरी अशी कीं, बाहेरचें साह्य येण्याचा तर आतां बिलकुल भरंवसा नाहीं. बाहेर शत्रूची छावणी सारखी पडलेली; आपल्यांत सामर्थ्य कमी असतें तर आजपर्यंत शहर शत्रूंच्या ताब्यांत जातें. असा प्रसंग पाहून त्रिवर्ग गोखल्यांनीं विचार करून ठरविलें कीं, एकदां शत्रूच्या फौजेची फळी फोडून पार निघून जावयाचें मग जिवावर आली तरी चिंता नाहीं. कारण येथें राहून तरी परिणाम काय लागायाचा! शूरांस हाच विचार खरोखर योग्य होय. असो. सर्व सैन्य किल्ल्यांत धान्यावांचून विपत्ति भोगीत होतेंच. त्यांनींही अखेर दिवशींची तयारी मनापासून केली. गोखल्यांनीं अशी योजना केली कीं, फौजेचे दोन भाग जे पायदळ आणि तोफखाना हे जय्यत करून शहराबाहेर एक नाला होता त्यांत गुप्तपणें छपून ठेविले; आणि स्वारांच्या तीन टोळ्या करून शहराबाहेर आल्या. त्या प्रत्येक टोळींत एकेक शूर सरदार असावयाचा. त्याप्रमाणें एकींत **धोंडोपंतदादा**; दुसरींत **आप्पासाहेब**; तिसरींत **बापूसाहेब**; असे त्रिवर्ग गोखले तिन्ही टोळ्यांचे मुख्य होऊन शहराबाहेर कडेकोट तयारीनें उभे राहिले.

इकडे नित्यनेमाप्रमाणें **रत्नाकर अप्पा** दिवाण हे छावणींत राहून त्यांनीं दोन हजार स्वारांची टोळी किल्ल्यावर मारा करावयास पाठविली. कोल्हापुरकरांचे स्वारांनीं ह्या टोळ्या सज्ज झालेल्या पाहून ज्या टोळींत बापू गोखले तरवारबहादर हे मुख्य होते, तिजवर चाल करून तुटून पडले.

शत्रूचें सैन्य बापूंच्या टोळीनें आपल्या तोंडावर घेऊन धिमेपणानें तरवारी हातीं घेतल्या. इतक्या अवकाशांत नाल्यांतील फौज बाहेर येऊन शत्रूवर लगेहात तोफा सुरू केल्या. तो तोफांचा मारा यांस अगदीं सहन होईनासा झाला; आणि या माऱ्यानें पुष्कळ लोक मारले गेले व जखमी झाले; अशी एकच धांदल झाली. करवीरकरांचे स्वार या दुहेरी माऱ्यांत घाबरून पळ काढूं लागले. **बापू गोखल्यांची** टोळी स्फुरण चढलेली होतीच. तिणें तात्काळ पळ काढलेल्या स्वारांचा पाठलाग केला. जसें सिंह गजाचें मस्तक फोडण्यास उड्डाण घेतो तसें **बापू गोखले** स्वतः घोडा पिटीत आपल्या स्वारांच्या पुढें शत्रूवर उड्डाण घेत चालले. हा युद्धसंग्राम एवढा वेळ स्वारांच्या दुसऱ्या दोन्ही टोळ्या पाहात होत्या. त्या दोन्ही टोळ्या, तोफखाना व पायदळ या सर्वांस गोलाकृति देऊन **धोंडोपंतदादा** व **अप्पासाहेब** हेही छावणीपर्यंत पाठलाग करीत गेले.

**रत्नाकर अप्पा** आणि त्यांची फौज गाफल होती, इतक्यांत पळालेले स्वार गोटाकडे येतात असें पाहून घाबऱ्या घाबऱ्या कांहीं शस्त्रें वगैरे घेतात सवरतात तोंच **बापूसाहेब** आपल्या टोळीनिशीं तळावर येऊन पोंहोचले. ते पोंहोचले नाहीं तोंच **अप्पासाहेब**ही आपल्या

बंधूंची पाठ राखण्याकरितां त्वरेनें आपली तुकडी घेऊन येऊन दाखल झालें. नंतर हल्ला सुरू केला. या दोघां भा- वांचें युद्धचापल्य आणि हा आकस्मिक प्रसंग पाहून **रत्ना- कर अप्पा** आणि त्यांची फौज फारच घाबरली आणि प्रा- णरक्षणासाठीं इकडे तिकडे पळूं लागली. ही गडबड होत आहे तों धोंडोपंतदादा सर्व मागील फौज ह्मणजे पायदळ तोफा, स्वार घेऊन त्या ठिकाणीं येऊन पोंहोचले. त्यांच्या फौजेंत बिलकुल धांदल वगैरे नव्हती. त्यांणीं आपल्या फौजेचा जसा व्यूह रचला होता तोच छावणीपर्यंत काय राहिला. आतां छावणीवर तोफा वगैरे चालू करणार, पण तोफांचा मारा सुरू होण्यापूर्वींच छावणी सोडून शत्रु पळून जाऊं लागले. त्याणीं आपल्या तोफा, तंबू, हत्ती, घोडे इत्यादि सर्व सामान छावणींत टाकून फक्त जिवाची आशा धरून ज्याला जिकडे मार्ग सांपडला तिकडे त्याणें पळ काढला; सारांश त्यांचा जमाव वगैरे सर्व मोडून एके- कटाच मार्गस्थ झाला.

गोखल्यांनीं त्यांचें सर्व सामान घेऊन डेरे हत्तीवर ला- दून त्यांची साहेबी नौबत वाजवीत वाजवीत परत माघा- किल्ल्याकडे आले. या प्रसंगीं गोखल्यांनीं अवर्णनीय शूरत्व प्रकट करून जय मिळविला; अशी कीर्ति चोंहीं देशीं फैलावलीच होती, त्याप्रमाणें पुढें पुण्यास पण ही सुवार्ता कळली. त्यापूर्वीं दरबारीं सर्व हकीकतीचें प- गोखल्याकडून आलें होतें. आणि या वार्तेवरून सरशे- टले **बाजीराव** महाराज फारच संतोष पावले. त्यांनीं गोखल्यांस बहुमानाचीं पत्रें पाठवून प्रसन्नता दर्शविली. तीं पत्रें पाहून यांस धन्याच्या चाकरीची अधिक उमेद आली

१४. **टिपूचे** पदरीं धोंडजी वाघ या नांवचा एक मराठा मनुष्य होता. हा **टिपू**ची मर्जी प्रसन्न व्हावी एतदर्थ त्याचे पंक्तीस जेवला आणि 'मी तुमचा मुलगा आहें,' असें **टिपूस** ह्मणूं लागला. त्यावरून **टिपू** प्रसन्न होऊन त्यास फौजेंत सरदार नेमिलें. **टिपू**च्या विरुद्ध जे इंग्रेज लोक त्यांशीं याणें बऱ्याच लढाया केल्या. पुढें **टिपू** मेल्यावर हा पेशव्यांचे मुलखांत बंडावा करूं लागला. इंग्रेजांनीं जसा **टिपू**चा पराजय केला तसा हा वाघ स्वतंत्र रीतीनें आपल्या फौजेचा भरणा करूं लागला. पठाण जातीचे लोक यानें आपल्या चाकरीस ठेविले; आणि जागजागीं आपलीं ठाणीं बसवून वसूल घेऊं लागला. या प्रकारें पेशव्यांच्याच मुलखांत धुंदाई करून हा राहिला असें नाहीं. तर इंग्रेजांनीं **टिपू**पासून जिंकून जो मुलूख घेतला होता त्यांतही हा उपद्रव देत असे. त्यावेळीं इंग्रेजाचे मुलखाचा बंदोबस्त **वेलस्ली** साहेब यांजकडे होता. हे साहेब इकडील माहितगार आणि मनमिळाऊ चांगले होते, असें इतिहासावरून दिसतें. जसे पूर्वी **एल्फिन्स्टन्, माल्कम्** होऊन गेले तसे अजूनही इंग्रजी अधिकाऱ्यांत कांहीं थोडे लोक सांपडतात. पुण्याचे छावणीवरील जनरल **लार्ड मार्ककर** हे ह्या वर्गांतील आहेत, ही गोष्ट अभिनंदनीय होय. असो. याच वेलस्ली साहेबांनीं श्रीरंगपट्टण शहर प्रथम काबीज केलें; आणि इंग्रेजांचा बावटा तेथें रों-

---

१ *हलक्या बुद्धीचें लक्षण असें आहे कीं, फक्त आपल्या निर्वाहाकरितां कोणास बाप, कोणास भाऊ, असें वर वर म्हणत असावें. त्यांची ममता कार्य साधण्यापुरतीच कायती असते. एरव्हीं 'तुह्मी आह्मी एक, कंठाळीला लोक,' या म्हणीप्रमाणें त्यांचें आचरण असते.*

विला, हें सर्वांस विदित आहेच. त्यांच्याच सैन्याशीं व- रील वाघानीं कितीएक वेळां सामना केला, व त्यास वारं- वार उपद्रव देऊं लागला. आज इंग्रेजांइतकें सैन्य या हिंदुस्थानांत कोणाचेंच नाहीं व त्यांजवर वांकडी नजर करणें ह्मटलें तर प्राणसंकट, असें जरी आहे तरी यांना वाघाच्या पारिपत्यास इंग्रेजांस गोखल्यांची मदत मागणें त्या वेळीं भाग पडलें होतें. या वेलस्ली साहेबांनीं असें केलें कीं, पुण्यास जो इंग्रेजांचा रेसिडेंट होता, त्यास कळविलें कीं, 'या प्रांतास धोंडजी वाघ याजपासून उपद्रव फार लागतो आहे, तरी त्याचें पारिपत्य करणें आपल्यास अवश्य आहे. याचा उपद्रव जसा आपल्या प्रांतास होतो, तसाच कर्नाटकांतील पेशव्यांच्या प्रांतासही होतो, अतएव त्या वाघाचें पारिपत्य करणें त्यांसही इष्टच आहे. त्यांचे शूर सरदार जे गोखले ते या प्रांतांत आहेतच, त्यांस आह्मास मदत करण्याविषयीं तुह्मी पेशवे सरकारापाशीं विनंति करावी ह्मणजे ते गोखल्यांस मदत करण्याविषयीं आज्ञापत्र पाठवितील. त्यापासून त्यांच्या दोस्तीचा आपल्यास उपयोग होऊन त्यांचेंही कार्य होईल. रेसिडेंट याणें त्याप्रमाणें पेशव्यांच्या दरबारीं विनंति केली. ती येथें मान्य होऊन गोखले यांस आज्ञापत्र गेलें कीं, तुह्मी आपल्या फौजेनिशी वेलस्ली साहेबांस मदत करावी. आणि **धोंडजी** वाघास शासन करून आपल्या मुलखांतील त्यांचीं ठाणीं उठवावीं.'

हें पत्र गोखल्यांस पोंचल्यावर त्यांनीं वेलस्ली साहेबांची भेट घेऊन त्यांस कळविलें कीं, 'ज्या वेळीं तुह्मांस आमची मदत लागेल त्या वेळीं कळवावें, ह्मणजे आह्मी तयारच आहोंत.' वेलस्ली साहेबांनीं **बापूस** उलट असें कळविलें कीं, 'तुमची आमची स्नेहवृद्धि व्हावी अशी फारच इच्छा होती, तो प्रसंग आज घडून आला आहे हें फार चांगलें झालें.' असो. या प्रकारचा उभय वीरांचा संकेत ठरला. पुढें थोडकेच दिवसांत युद्धप्रसंग घडला. तो प्रकार आतां सांगतों:—

ह्या लढाईचा प्रकार सांगण्यापूर्वीं आह्मी वाचकांस मोठ्या दुःखानें कळवितों कीं, येथपर्यंत त्रिवर्ग गोखल्यांचें जें चरित्र आह्मीं लिहिलें आहे, तें येथून पुढें एकट्याचेंच लिहिण्याचा प्रसंग आह्मांवर येणार. कारण या लढाईंत **धोंडोपंत दादा** आणि **अप्पासाहेब** या दोघांचा शेवट झाला आहे. ही गोष्ट फारच खेदकारक झाली. असो. हल्याळ ह्मणून एक गांव कर्नाटकांत आहे, तेथें गोखल्यांनीं आपलें सैन्य घेऊन तावडतोब यावें, असें पत्र वेलस्ली साहेबांकडून गोखल्यास आलें, कारण धोंडजी वाघ तिकडे जवळच उपद्रव देत फिरत होता. तें पत्र पोंचल्यावर हल्याळ येथें इंग्रेजांचीं दोन पलटणें जीं होतीं त्यांस जाऊन आपण मिळावें असा विचार करून गोखले आपला तोफखाना, पायदळ आणि स्वार बरोबर घेऊन निघाले. ते बरेच लांब गेल्यावर त्यांच्या विघ्नास मार्गांत तेथेंच आरंभ झाला. हल्याळ सुमारें दोन कोश दूर राहिले अशा ठिकाणीं एक नाला होता. तेथें तोफेचा गाडा अटकळून उलथून मोडला! हें मुळारंभींचें विघ्न. तो गाडा नीट करण्याकरितां फक्त कांहीं स्वारांनिशीं त्रिवर्ग गोखले चुलते पुतणे मात्र तेथें राहून बाकीचें सैन्य दरोबस्त रवाना करून दिलें. आपण आतां गाडा नीट करून तोफ घेऊन चालतें

व्हावें; इतक्यांत त्यांचा शत्रु जो **धोंडजी वाघ** हा ए[क]
हजार पठाण लोक बरोबर घेऊन अकस्मात् त्या नाल्याज-
वळ येऊन उतरला. त्यास यांची खबर कोठून मिळाले
आणि तो ती वेळ साधून कसा येऊन टेपला कोण जाणे!
संकट येऊं लागलें ह्मणजे कोणीकडून येईल याचा नेम
नाहीं, अशी जी ह्मण प्रचारांत आहे ती या वेळीं सत्य
झाली!

गोखल्यांपाशीं स्वार फारच थोडे होते, तरी त्यांनी
शत्रूशीं लढाई करण्यास बिलकुल मागें पुढें घेतलें नाहीं.
शूर पुरुषांचें लक्षण असें असतें कीं, शत्रूस पाठ कधींच
दाखवूं नये. प्रसंगीं प्राणाची हानि झाली तरी चिंता नाहीं,
पण भेकडपणाचा दोष घेऊं नये. ह्याप्रमाणें आपलीं
हत्यारें पडताळून हे तिघे योद्धे सज्ज झाले. हा प्रसंग
इसवी सन १८०० चे सुमारास झाला असावा. या तीन
गोखल्यांखेरीज आणखी एक चवथा मनुष्य येथें प्रख्याती-
पैकीं होता. तो कोण ह्मणाल, तर **बापू गोखले** यांचा
मित्र **चिंतामणराव** पटवर्धन. हे पटवर्धन सांगलीक-
रांचे घराण्यांतील होत. हे तेथून रुसून तीनशें स्वारां-
सुद्धां कांहीं दिवसांपूर्वीं गोखले यांजकडे येऊन मिळाले
होते. ते या समयीं **बापूच्या** बरोबरच असून याच दो-
घांनीं प्रथम तरवार चालू केली. हे दोघे वीर आपल्या
जिवांकडे कांहींच न पाहतां बेलाशक शत्रूच्या सैन्यांत
शिरले. भारतीयुद्धांत अकरा अक्षौहिणी कौरवसेनेंत
**भीम** आणि **अर्जुन** जसे उड्या घालून जात असत, तसे
हे दोघे पठाण लोकांचा सप्पा उडवीत वाघाच्या फौजेंत
घुसले. रणांगणीं फारच युद्धकौशल्य प्रकट केल्यावर आ-

कस्मिक एका पठाणानें झरकन येऊन **बापू गोखल्या**च्या तोंडावर तरवारीचा घाव मारला. तेणेंकरून त्यांस मोठी जखम झाली. हें अनिष्ट होत आहे तोंच **चिंतामणराव** पटवर्धन यांचेही तोंडावर तरवारीचा वार लागून तशीच जखम पडली. याप्रमाणें हे दोघे घायाळ झालेले पाहून **धोंडोपंत** यांस फारच वाईट वाटलें. मग लागलेच त्यांनीं यांस सुरक्षितपणें हल्याळ येथें पाठविण्याची तजवीज करून आपण शत्रूचे तोंडावर गेले. असो. आतां **अप्पा साहेब** पुतणे आणि **धोंडोपंत दादा** चुलते असे दोघेच काय ते कांहीं स्वारांनिशीं येथें राहिले. ज्या जागीं यांची लढाई होत होती ती जागा अतिशय पेंचाडाची होती. तेथें झाडी तर फारच होती. आणि दुसरा एक प्रकार तेथें होता तो तर वेगळाच. ज्या झाडींत यांचा युद्धसंग्राम चालला होता तेथून बाहेर जाण्यास काय तो एकच मार्ग होता. अशा विकट जागीं **धोंडोपंत दादा** गोखले **अप्पास** समागमें घेऊन लढूं लागले. **आपा** जरी मागेंच होते तरी **दादांनीं** आपला घोडा पुढें दाबला आणि पठाण कापून टाकण्याचा सपाटा चालविला. त्या गर्द झाडींत घोडा चालला आहे, इतक्यांत यांचे छातीस झाडाची फांदी लागून घोड्यावरून खालीं धाडकन पडले. हें पाहून **आपा** चपापून जागींच थबकले; कारण वाघाचें सैन्य फारच असून तें विजयी झालेलें होतें. तेव्हां अशा ठिकाणीं मोठा शूर योद्धा असून तरी काय उपयोग ? मोठा पोहणारा असला तरी तो भव्य आणि अफाट सागरांत पोहणारा असला तरी तो भव्य आणि अफाट सागरांत वर लाटा उडत असल्या तर पोहणारानें काय करावें ? त्यांतून त्या सागरास तुफान होऊन लाटावर लाटा उडत असल्या तर पोहणारानें काय करावें ?

तशी स्थिति आपास झाली होती. कारण बाघाची फौज थोर समुद्राप्रमाणें पसरलेली असून ते कडवे पठाण जयाच्या आरोळ्या मारूं लागले आणि पिसाळलेल्या वाघाप्रमाणें आंगावर तुटून पडूं लागले. अशा प्रसंगीं धीर धरणें हीच गोष्ट अत्यंत कठीण आहे. असो. हा सर्व प्रकार दुर्धर आहे असें समजून **आपा** थांबले आहेत इतक्यांत **दादांनीं** पडल्या पडल्याच त्यांस येथून पार निघून जाण्याची खूण केली. पण या धैर्यवान् पुरुषानें ती मानिली नाहीं! आपल्या जीविताची आशा न करितां प्रसंगीं सत्य स्मरून जें वागणें त्याचेंच नांव शौर्य, आणि अशा धारिष्टानें वागणाऱ्या पुरुषाचीच शौर्याविषयीं कीर्ति पसरते. **दादा** घोड्यावरून खालीं पडले इतकें पाहिल्याबरोबर **धोंडजी वाघ** याचे लोकांनीं त्यांस गराडा घातला. या ठायीं गोखल्याकडील पुरुष काय ते दोघेच या वेळीं राहिले. एक दादा अशा गराड्यांत सांपडलेले; आणि दुसरे आपा. बाकी स्वार तर सर्व निघून गेले. **धोंडोपंत दादांनीं आपास बापूक**डे निघून जाण्यास सांगितलें असून त्यांनीं तसें न करितां ह्मणाले कीं, 'तुह्मास या रणांत एकटें अशा स्थितींत टाकून जाणें मला उचित आहे काय? आतां मला तरी वांचून कर्तव्य काय!' इतकें ह्मणतात तों त्यांजभोंतींही गराडा येऊन पडलाच! आतां तर संकटाची सीमा झाली! त्या ठिकाणीं वाघ होताच; तो अति त्वरेनें तेथें येऊन त्यांस ह्मणूं लागला कीं, 'जर तुह्मी हातांतील तरवार टाकून द्याल तर तुह्मास मारीत नाहीं.' पण हे शूर, त्यांचें बोलणें मान्य करितात काय! नाहीं. जिवंतपणीं आपलें शरीर शत्रूचे स्वाधीन करणें ही गोष्ट पुराणांत अतिनिंद्य मानिली आहे

हें त्यांस ठाऊक होतें. जीव असून विटंबना होणें त्यापेक्षां मरण बरें. या नीतीस अनुसरून दोघां गोखल्यांनीं त्यास उत्तर दिलें कीं, 'हत्यार सोडणें हें शूरास उचित नाहीं ! जें होणें असेल तें चुकत नाहीं !' असें ह्मणून तशा व्यूहामध्यें दोघांनीं पराक्रम करून आठ नऊ पठाण ठार मारिले. इतक्यांत पठाणांनीं पाहिलें कीं, हे आपल्यास जवळ फिरकूं सुद्धां देत नाहींत तर यांस जिवंत धरण्याची आशा कशास पाहिजे ! आतां हे वांचले तर प्रळयकाळ करितील. तर आतां दम धरणें बरोबर नाहीं, असा विचार करून गोळ्या घालून दोघांसही ठार मारिलें ! नंतर दोघांचीं शिरें कापून, आपाचें शीर तेथेंच झाडास टांगून दादाचें शीर घेऊन गेले ! असा या विघ्नाचा शेवट दुःखरूप झाला. येथपर्यंत जो आह्मीं इतिहास लिहिला तो त्रिवर्ग गोखल्यांचे संबंधाचा; त्यांत विशेषतः **धोंडोपंत** गोखल्यांचा होता; कारण तेच सर्वांत वडील असून शूरही सामान्य नव्हते. त्याविषयीं वाचकांची खात्री नवीन करावयास पाहिजे असें नाहीं. हें इतिवृत्त मनन केल्यावर तात्काळ ध्यानांत येईल. या वरच्या लढाईचा प्रसंग कठीण येऊन ठेपला; नाहीं तर हजार पांचशें लोकांत यांणीं आपला घोडा सर केला असता इतकी आमची खात्री आहे.

असो. शूरांचें मरण रणांगणींच व्हावें; त्यांनीं लढाईत पडून मरण्यासारखें दुसरें पुण्य नाहीं; असें जें सर्व लोक मानितात त्याकडे पाहिलें तर या दोघां गोखल्यांचा हाच

१ ऐतिहासिक गोष्टी भाग पहिला यांत असें लिहिलें आहे कीं, धोंडी वाघानें धोंडोपंत गोखल्याचें रक्त प्राशन करण्याची प्रतिज्ञा केली होती ती याप्रमाणें शेवटास नेली.

शेवट उत्तम झाला असें ह्मटलें पाहिजे. पलंगावर पडून मरण्यापेक्षां धर्मन्याययुद्धांत मृत्यु फार उत्कृष्ट. तेथें मरण समर्यीच्या दुःखाचें बीज नाहींसें होऊन आत्मा देवलोकीं चिरस्थायी होण्यास जातो. शूर लढाईंत पडल्यावर त्याच्या मागें दुःख ह्मणून कोणीं करूं नये अशी जी समज आहे ती येवढ्याचकरितां. आतां वरील दोघे पुरुष आणि तिसरे **धोंडोपंत दादा** आणि तसेच त्यांचे पुतणे **आपा** साहेब हे ज्ञातीचे व धर्माचे श्रेष्ठ असल्यामुळें त्यांचा अखेर परिणामाचा विचार येथें केल्यानें आह्मी ह्मणजे केवळ विषयभ्रष्टतेच्या दोषांत पडूं असें नाहीं. असें जाणूनच हें निरूपण अप्रासंगिक आहे असें समजलों नाहीं.

मनुष्याच्या जीविताचे अखेरीस त्याच्या गुणदोषाचें विवेचन होत असतें असा साधारण नियम आहे. त्यास अनुसरून येथें **धोंडोपंत** गोखले यांजविषयीं चार शब्द लिहिणें इष्ट होय. यांचा स्वभाव पाहिला तर तो चपळ होता, आणि त्यामुळें बहुतेक गोष्टींत यांस यश आलें. त्यांची प्रकृति थोडी तापट होती खरी, परंतु त्यांच्या आंगीं समयसूचकता विशेष असल्यामुळें तीस शोभात्व आली होती. हें पुढें दाखवितां येईल. आतां मुळारंभीं पाहिलें तर ते कोंकणांतील एका गांवढळ गांवांतील राहणारे असून तेथून पुढें यांस बऱ्याच प्रयासानें पेशव्यांचा आश्रय मिळाला असेल हें उघड आहे. ह्मणजे विजयादुर्ग येथें सरकारचे खजिन्यासंबंधी जमाखर्च लिहिण्याचें व जावजबाबी काम यांस प्रथम मिळालें. यांची बुद्धि तीक्ष्ण होती, ह्मणूनच त्या कामांत यांस नांव मिळालें; हें दिशेबी व जबाबी काम किती कठीण असतें याविषयीं पहिल्यानदां एक वेळ लिहि-

लेंच आहे. ज्याची बुद्धि स्थिर किंवा पुष्कळ वर्षें ज्यानें ह्या कामांत घालविलीं आहेत, अशास मात्र हें काम साधण्यासारखें असतें. विजयादुर्ग येथील सुभेदार पुण्यास गेल्यामागें सर्व सुभेदारीचें काम यांनींच चालविलें. मनुष्याचा लोपलेला आंगचा गुण उदयास येण्यास कांहीं तरी संधि मिळावी लागते, त्याप्रमाणें हे लिहिणारे हुशार, जाबजबावी हुशार, बोलण्यांत चतुर असे असतां तिसराच एक अलौकिक गुण उदयास पावला. तो कोणता ह्मणाल तर शूरपणा. हे तरवारबहादर आहेत असें सुभेदार पुण्यास गेल्यामागें कळलें. मराठे सरदार असे ह्मणत असतात कीं[1] सरदारी अशी आमच्या जातींतच शोभते. तरवार हातीं धरणें, घोड्यावर बसणें, अचुक निशाण मारणें, ह्या

---

१ नेटिव राज्यें जेथें उरलीं आहेत तेथील थोर थोर मराठे सरदारांचा हा समज आहे. शिवाय महाराजांनीं ही प्रधानांची योजना केली होती ती याच प्रमाणांत असें स्पष्ट दिसतें. फौजेचे अधिकार त्यांनीं मराठे लोकांस देऊन अक्कलेचीं व विश्वासाचीं कामें ब्राह्मणांत सोंपिलीं होतीं. हा ठराव शाहू महाराजांपर्यंत चालला होता! शिवाजीच्या मागेंच राजाराम महाराजांचे कारकिर्दीत तर मराठे सरदार संताजी घोरपडे, धनाजी जाधव, हे फारच नावाजले होते. त्यांणीं तर संभाजीचे कारकीर्दीतील गतवैभव पुनः मिळवून मराठी राज्याचा दरारा चोहोंकडे बसविला. धनाजी जाधवाचा मोगलांस तर इतका धाक वाटत असे कीं, त्यांणीं आपला घोडा नदीवर नेऊन तेथें पाणी न प्याला तर त्यास ह्मणावें कीं, 'तूं पाणी कां पीत नाहींस? तुला धनाजी पाण्यांत दिसला काय?' इतपत जरी मराठ्यांनीं तरवार त्या वेळीं गाजविली, तरी राज्याची उत्कृष्ट सुधारणा करण्यास प्रल्हाद निराजीच उपयोगी पडला! असो. पुढें थोरले बाजीरावांनीं तर या सर्व लोकांच्या मतास हरताळच लाविली! म्हणजे शिपाईगिरींत सर्व मराठे सरदारांस लाजविलें!

गोष्टी आह्मांलाच उत्कृष्ट साधतात. ब्राह्मण लोकांस ही गोष्ट साधणें दुरापास्त. कारण त्यांच्या शरीराचा नरमपणा, मनाचा भेकडपणा, पोपाखाचा पोकळपणा, बारगीर, शिलेदार अशा कामास बिलकुल योग्य नाहीं! ब्राह्मणांनीं फक्त लिहिण्याचें काम, हिशेबी काम, फार तर दिवाणगिरी, चिटनिशी, फडनिशी, दप्तरदारी अशीं कामें करावीं; पण फौजेंत त्यांनीं शिरूं नये. ही गोष्ट कांहीं अंशानें खरीच आहे. कांहीं मराठ्यांनीं जें शौर्य जगास दाखविलें तें कांहीं विलक्षणच! त्याविषयीं वरच्या टिपें-तही थोडा मजकूर आहे. पण मराठ्यांचा तो शूरपणा आतां नांवास मात्र राहिला आहे. असो. धोंडोपंत दादा हे प्रथम फडणीस असतां व त्या गुणांत त्यांनीं प्रवीणता मिळविली असतां शूर पुरुषाच्या मालिकेंत त्यांनीं आपलें नांव गोंविलें याचें आह्मांस फारच नवल वाटतें! असो. धोंडोपंताच्या कारकुनी बाण्याबद्दल वाचकांस येथपर्यंत थोडें कळविलें. आतां दुसऱ्या गुणाबद्दल कांहीं अधिक कळवावयाचें आहे. कारण यांतच यांचा पुष्कळ लौकि-क होऊन शेवटही शौर्यकृत्यांतच झाला. आणखी परा-क्रमी स्वभावाच्या माणसास यांचें पुढील वर्णन वाचून क-दाचित् कित्याप्रमाणें होईल. एतदर्थ त्याविषयीं थोडें विस्तारानें निरूपण करणें अवश्य आहे.

प्रथम **धोंडोपंत** दादांनीं विजयादुर्ग येथील व त्या खालच्या दुसऱ्या कोंकण प्रांतांतील कोळवण लोकांचें बंड मोडलें. त्याविषयीं आह्मांस एक मोठाच अचंबा वाटतो. तो असा कीं, **भानू** हे सदोदित तेथें असून त्यांच्यानें जें कृत्य साधवलें नाहीं तें यांणीं सर्व दुसरें काम संभाळून

थोडके दिवसांत पार पाडलें. बंड मोडलें इतकेंच नाहीं तर बंडवाल्यांचा वध करून यांणीं आपला दरारा त्या प्रांतीं बसविला. ही गोष्ट काय लहान झाली! असें तुमचे हातून होईल असें जर हे आपल्या वतनवाडीचे गांवीं असतां कोणी यांस सांगितलें असलें तर यांस ती सत्य वाटली असती काय! त्याजपुढें भानू आपल्या पूर्ववत् अधिकारावर आल्यावर त्यांणीं यांशीं धुसपुस चालविली असतां यांणीं जें वर्तन केलें तें बरेंच कडकपणाचें होतें. अशाही तऱ्हेचें वर्तन केव्हां केव्हां वरिष्ठाशीं करणें भागच पडतें असें पूर्वस्थळीं सांगितलें आहे. तें अन्यथा नाहीं. जेथें आपला उपमर्द होत असेल तेथें तशा तऱ्हेची वागणूक दोषास्पद होणार नाहीं. दुसरी एक गोष्ट यांत अशी आहे कीं, असे जे शूर पुरुष पुढें निवडणार त्यांचें अगोदरचें वर्तन जगास उद्धटपणाचें दिसण्यासारखें असायाचेंच असा साधारण नियम आहे. ह्मणजे त्यांचा स्वभाव स्वच्छंदी असून परतंत्रता त्यांस बिलकूल आवडूं नये. लार्ड क्लाइव्ह यांस वरिष्ठाशीं कधींच नीट वागतां आलें नाहीं. तो शाळेंत जात होता त्या वेळेपासून तर थेट फौजेकडे चाकरी धरीपर्यंत नेहेमीं त्याची हीच रड! शिवाजी महाराज दिल्लीपतीच्या येथें गेले असतां दिल्लीपती सामोरे येऊन योग्य सत्कार केला नाहीं एवढ्यावरच स्वारी रागावून भर दरबारांत त्यांनीं दिल्लीपतीची शोभा उतरली! दादोजी कोंडदेवास तर शिवाजीच्या पोरपणीं प्रथम अशी चिंता वाटली कीं, शिवाजी एकादें नवेंच बंड करील कीं काय! ह्मणूनच त्याची चित्तवृत्ति मुलुखाचे बंदोबस्ताकडे वळावी यासाठीं जहागिरीचे बंदोबस्ताचें काम त्यावर टाकूं

लागलो. अशा थोर पुरुषांच्या सर्व मनोवृत्ति जागृत असतात. लीनता प्रकट करावी अशी त्यांस इच्छा मात्र झाली कीं, मग कमाल करून सोडतात! मग आपल्या थोरपणाचें देखील त्यांस भान राहत नाहीं! कित्येक वेळां तर त्यांचा विनय थोरपणामुळें थट्टेसही कारण होतो. सवाई माधवराव पेश- व्यांस पालखी आणि नालखी हीं वहनें व तसेंच शिरपेंच तुरा इत्यादि अलंकार दिल्ली दरबारांतून सन्मानाकरितां **म- हादजी** शिंद्याच्या हातें आलीं. तसेंच शिंद्यास वकिलीची सनदही प्राप्त झाली होती. तिचा आदर पेशव्यांच्या हु- कुमावांचून करणें योग्य नाहीं असें महादजी शिंद्यानें जा- णून सर्व पोशाग, अलंकार, वहनें पेशव्यांस अर्पण करण्या- करितां व आपली सनद दाखविण्याकरितां ज्या वेळीं **म- हादजी** पुण्यास आला तेव्हां त्यानें आपलेबरोबर पुष्कळ फौज आणि अपार संपत्ति आणिली होती. **महादजी** पुण्यास येण्यापूर्वीच त्याचा मोठा लौकिक चहूंकडे गाज- ला होता. पुण्यास आल्यावर तर मोठा डामडौलाचा समा- रंभ करून सर्व सरदारांसमक्ष व पुण्यांतील शेटसावकार आणि संभावित लोक यांच्या समक्ष पेशव्यास बादशहाक- डील नजर अर्पण केली. त्या वेळीं **महादजी** शिंद्यानें असा कांहीं विलक्षण नम्रभाव दाखविला कीं, सर्व लोकांस तो खरा नम्रभाव न वाटून कपटीपणा दिसला! त्या दिव- शीं पेशव्याची स्वारी मिरवत येत असतां शहरचे रस्त्यांतून **महादजी** शिंदे पेशव्यावर मोरचेल फिरवीत होते! हें एक आणि वाड्यांत स्वारी गेल्यावर बैठकीवर चढतांना त्यांचा जोडा महादजीनें उचलिला! हें दुसरें. अशा दोन

१ मराठ्यांचा बखर भाग तिसरा पहा.

गोष्टी सर्व आचरणापेक्षां लोकांस फारच चमत्कारिक दिसल्या. यावरून समजावें कीं, शूर पुरुष वैरभाव दाखविण्यास जसे उतावीळ होतात तसेच प्रेमभाव दाखविण्यास ही पण होतात.

**धोंडोपंत** दादाचें व **भानूचें** वैमनस्य पाहून **नाना** फडणविसांनीं **धोंडोपंतास** पुण्यास बोलाविलें. तेथेंही एक वेळ त्यांनीं वरच्याप्रमाणेंच तापटपणा केला होता, परंतु समयसूचकता आंगीं असल्यामुळें तो आपल्या फायद्यासच कारण करून घेतला. हें मागें सांगितलें आहे. येथून पुढें शेवटपर्यंत त्यांचीं कृत्यें शूरपणाचीं आहेत. ह्मणजे सरदारपद मिळविल्यापासून तर थेट मृत्युसमयापर्यंत त्यांचे दिवस लढाया करण्यांत व त्यासंबंधी बेत करण्यांत गेले. त्यांणीं कोणा कोणाशीं लढाया केल्या हें मागें थोडें सांगितलेंच आहे. त्या सर्व लढायांत **बाघाशीं** लढाई करतांनाच काय ते हे पराजय पावले. बाकी सर्व लढायांत हे विजयी झालेले आहेत. हा शेवटला प्रसंग साक्षात् मृत्यूनेंच यांस आणिला ह्मटलें तरी चालेल. यांनीं केलेल्या प्रत्येक लढाईचें येथें संक्षिप्त टिपण देण्याचा प्रथम विचार होता, परंतु व्यर्थ विस्तार होऊन वाचकांस कंटाळवाणें होऊन द्विरुक्ति केल्यासारखेंही होईल, ह्मणून त्याविषयींचें मनन वाचकांवरच सध्यां सोंपवितों.

आतां येथून पुढें एकटे राहिले जे **बापूसाहेब** गोखले त्यांजविषयीं लिहावयाचें आहे. ते आपल्या प्रतापेंकरून राजाच्या मांडीशीं मांडी भिडवून मसलती करूं लागले. यासाठीं त्यांच्याबद्दल पुढें लिहितां येईलच, परंतु त्यांचे बंधु जे अप्पासाहेब त्यांच्या गुणावगुणांबद्दल लिहिण्यास पुढें अव-

काश उरला नाहीं ह्मणून त्यांजविषयीं येथेंच कांहीं लिहिणें इष्ट होय.

चार पुरुष एके कुटुंबांत असून त्या कुटुंबाची भरभराट होत असली तर त्यांतून कोणत्या पुरुषाच्या पराक्रमेंकरून हें कुटुंब उत्कृष्ट स्थितीस पोंचलें आहे हें बाहेरच्या पुरुषास सत्वर सांगतां येणें जसें कठीण आहे तसेंच वरच्या पुरुषाविषयीं लिहिण्याची गोष्ट ही आहे; तरी अगदीं शेवटी **धोंडोपंत दादा** हे **अप्पा** यांस पळून जाऊन आपला प्राण वांचविण्याविषयीं सुचवीत असतां यांणीं तें ऐकिलें नाहीं हें एक; व तसेंच मागील सर्व लढायांत ते अग्रभागींच जरी उभे राहिले नाहींत तरी पराक्रमी पुरुषास जें उचित तेंच आचरण यांणीं केलें; आणि मृत्यु समीप येऊन ठेपला त्या वेळीं धोंडजी बाघानें यांस शस्त्र हातचें सोडून आमचे स्वाधीन व्हा असें एकटें गांठून सांगितलें असतां **कौशिक ऋषि हरिश्चंद्र** राजाचें सत्व हरण करण्याविषयीं प्रतिज्ञा भोगून छळ करीत असतां रोहिदास राजपुत्रानें जसें एकंदर आचरण केलें तसें यांनीं केलें. अयोध्या नगरींतून वाराणशीस **हरिश्चंद्रास** पाठविलें त्या वेळीं बरोबर **तारामती राणी** व **रोहिदास** पुत्रही होते. मार्गांत सूर्याचा ताप इतका होता कीं, सर्व लहान मोठे वृक्ष करपून गेले, नद्या कोरड्या पडल्या, दगडाच्या लाह्या फुटूं लागल्या, अशा कहरांत **विश्वामित्र** तपोनिधि सत्व हरण करण्यास हीच संधि उत्तम आहे असा विचार करून आपण वेषधारी ब्राह्मण बनून तेथें एक प्रपा घालून बसला. मार्गांतील अति संकटामुळें ह्या तिघांची चुकामूक पडून त्या पोईपाशीं एकामागें एक असे क्रमाक्रमानें जाऊन पोहोंचले. त्या वेळीं **हरिश्चंद्रानें**

व त्याच्या राणीनें तेथें सत्वशील वागणुकीस पाठ दिली नाहीं हें एक थोर कृत्य झालें. पण **रोहिदास** हा लहान मूल असतां, मायेचा **हरिश्चंद्र** व **तारा राणी** पाणी पीत आहेत हें दिसत असतां पाणपोईचें पाणी प्याल्यानें केल्या पुण्याचा क्षय होतो असें त्या वेषधारी ब्राह्मणास स्पष्ट उत्तर देऊन पुढें चालता झाला! आपली ठकविद्या व्यर्थ गेल्याचा शोक जसा **कौशिक** मुनीस झाला असेल तद्वत् **अप्पा**च्या निग्रह पाहून वाघासही झालें असेल यांत शंका नाहीं.

चुलते व बंधु लढाईंत पडल्याची वार्ता **बापू साहेब गोखले** यांस कळली. ज्या समयास ही खबर येऊन पोहोंचली त्या समयास त्यांची जखम बरी झाली नव्हती इतकेंच नाहीं तर ती भारी जखम अपायास कारण होईल अशी भीति वाटत होती. त्यांतून सैन्य सर्व भयभीत होऊन कांहीं तर धारवाडाकडे निघून गेलें. इतकें असून दुसऱ्या ज्या बिना परमेश्वरसत्तेनें घडून आल्या त्यापुढें यांच्यानें **धोंडजी** वाघाचा सूड घेण्यास तात्काळ जाववलें नाहीं. वडील बंधु **आपा** यांची स्त्री पतिवियोगाचें दुःख दुःसह आहे हें जाणून पातिव्रत्यधर्मरक्षणार्थ पतिसहगमन करिती झाली. प्रसंगीं प्राण तृणप्राय मानून जें वर्तन करणें याचें नांव शूरत्व. शूर पुरुषाच्या बायकोनें असें धाडसाचें कृत्य केलें हें थोरपणाचें चिन्ह होय. असो. हे तीन मृत्यु एके दिवशींच झाले. आणखी **बापू** साहेबांची स्त्री प्रसूत होऊन त्याच दहा दिवसांत मृत्यु पावली, यामुळें त्यांजवर एकच कहर गुजरला. सर्वांची क्रिया **बापूं**नीं एके दिवशीं केली. पुढें थोडेच दिवसांनीं

**वसली** साहेब येऊन **बापूचें** शांतवन करिते झाले. **धोंडजी** वाघास मारल्याखेरीज पागोटें घालावयाचें नाहीं असा **बापूचा** निश्चय ठरला होता. त्याप्रमाणें दोन तीन महिन्यांतच **वसली** साहेबांचे कांहीं लोक बरोबर घेऊन **बापू गोखले, धोंडजी वाघाची** गांठ घेण्याची संधि पाहत होते. पुढें एके दिवशीं कातोल भानू येथें गांठ पडली. **बापूचे** आंगांत त्वेष भरला होता त्या आवेशांत वाघाचे फौजेवर तुटून पडून नासाडी करून दिली, आणि एकच सिंहासारखी उडी घेऊन वाघास ठार मारून टाकलें. संपूर्ण कौरवांचा वध केल्यावर **दुःशासनानें** मोकळी केलेली **द्रौपदीची** वेणी घालण्याची प्रतिज्ञा **भीमानें** करून एकवार शत कौरव मारिल्यावर प्रतिज्ञा शेवटास गेल्याचा आनंद होऊन वेणी घालण्यासाठीं **भीमानें** रणांतून धांवत येऊन रक्तानें भरलेल्या हातानें ज्याप्रमाणें **द्रौपदीची** वेणी गोंविली त्याचप्रमाणें **बापू** गोखल्यांनीं वाघाचा प्राण घेतल्याबरोबर डोईस पागोटें घातलें. कर्नाटकांतील लढाईचें सर्व वर्तमान इंग्रेजाच्या रेसिडेंटाकडून पेशव्यास कळलें. तें समजल्यावर त्यांस आपले दोन सरदार पडल्याचें फार वाईट वाटलें. असो. मग **बापू साहेबांस** पत्र पाठविलें त्यांत खेद दर्शवून पुण्यास परत येण्याविषयीं फार फार लिहिलें.

१९. येथपर्यंत **बापूंचें** इतिवृत्त कर्नाटकांतील होतें ह्मणून तें बहुतेकांस अपरिचित असण्याचा संभव होता, परंतु येथून पुढें जें त्यांचें चरित्र लिहिणार आहों तें सर्वांचे परिचयाचेंच आहे. निदान पुण्यांतील वृद्ध पुरुषांस तर

१ वेणीसंहार नाटकाचें कथानक याच मुद्द्यावर आहे.

पुढील सर्व गोष्टींची माहिती असेलच, यांत संदेह नाहीं. वर लिहिल्याप्रमाणें **बापू** श्रीमंतांच्या हुकुमावरून पुण्यास आले त्या वेळीं पेशव्यांच्या दरबारची स्थिति अशी होती कीं, धाकटे **बाजीराव** साहेब नुकतेच गादीवर बसले होते. पेशव्यांचे पुरातन चाकरांतून तीन या वेळेस फारच प्रबळ झाले होते. पहिले भोसले, हे सातारच्या राजाचे सेनापती. यांस स्वतंत्र एक मोठा मुलूख तोडून दिला होता. तो कोणता ह्मणाल तर वऱ्हाड प्रांत. या प्रांता सारखा सुपीक प्रदेश सर्व हिंदुस्थानांत दुसरा नाहीं ह्मटलें तरी चालेल. या प्रदेशाचे मालक जे भोसले यांजपाशीं अपार संपत्ति वरील समयास जमली होती[1]! त्यामुळें ते आपण स्वतंत्र आहोंत असें ह्मणत असत आणि आजपर्यंत पेशव्यांचा हुकूम मानीत असत तो न मानतां मातलेल्या बैलाप्रमाणें पारतंत्र्य जूं यांनीं आपल्यावरील झुगारून दिलें होतें. दुसरे शिंदे, आणि तिसरे होळकर. हे शेवटील दोघे तर आज दिवसपर्यंत स्वतंत्रतेचा डौल भोगीत आहेत. पहिल्यांचा परिणाम जसा भयंकर झाला तसा यांचा होण्याचा संभव नाहीं; कारण हे दोघे सरदार हल्लीं जे सार्वभौम ह्मणून इंग्रेज सरकार येथें गाजताहेत त्यांस १८५७ सालच्या बंडांत फारच उपयोगीं पडले. तो उपकार इंग्रज सरकार अद्याप विसरलें नसून दोस्त सरकाराप्रमाणें

---

१ भोसल्यांची संपत्ति त्यांच्या वाड्यांतून कोणत्या वेळेस गेली हें तर सर्वांस माहित आहेच! ज्या वेळीं इंग्रेजांनीं नागपूरचें राज्य खालसा केलें त्या वेळीं तेथील द्रव्याची कोणत्या प्रकारची वाताहात झाली हें सांगितलें तर आमच्या देशाभिमानी पुरुषांच्या अंगावर कांटा येईल!

यांशीं वर्तन करीत आहे. असो. **बाजीराव** गादीवर बसले तेव्हां पुण्याची झोटिंग पातशाही समजून जसा चोंहींकडे बेबंद कारभार झाला, तसा शिंदे आणि होळकर यांचाही होऊन ते पेशव्यांस मानीतनासे झाले.

**बापू गोखले** पुण्यास आल्याविषयीं मागें लिहिलेंच आहे. ते आल्यावर त्यांस व **बसली** साहेब या उभयतांस वरील तिघांच्या बंदोबस्ताकडे पाठविण्याची योजना झाली. हा प्रकार पाहण्यापूर्वी इंग्रेजांचा व पेशव्यांचा सल्ला, तसेच वरील तिघां बलिष्ठ सरदारांचा व पेशव्यांचा बेबनाव, पूर्ण समजुतीस येण्यास त्या वेळच्या हिंदुस्थानच्या इतिहासाकडे वाचकांनीं लक्ष दिलें पाहिजे. कारण या लहानशा पुस्तकांत तो सर्व घोटाळा सांगतां येणें दुरापास्त आहे. **बसली** साहेब व **बापू गोखले** या कामासाठीं पुण्याहून निघाले ते प्रथम शिंद्यांचा रोख धरून चालते झाले. दौलतराव शिंद्यांची गांठ आंजणव्यास झाली. ज्या वेळीं इंग्रेजांचीं पलटणें व **बापू गोखल्याची** फौज तेथें जाऊन भिडली त्या वेळीं शिंद्यांचे लष्करांत मोठी धांदल झाली. ती अशी कीं, ती वेळ दुपारची असल्यामुळें तोफा ओढणारे बैल रानांत चरावयास गेले होते. शिंद्यांपाशीं फौजेचा व कवाईत शिकलेल्या पलटणांचा जरी भरणा पुष्कळ होता तरी त्यांपैकीं लढाईस कोणी न येतां सर्व पाठमोरे चालते झाले. फक्त चार पलटणी बत्तीस तोफा घेऊन तोंड देऊन उभ्या राहिल्या. खुद्द शिंद्यांजवळ सात आठ हजार लढाऊ स्वार होते तेही पण या पलटणीच्या मागें उभे राहिले होते. पलटणीवरील सरदारांनीं ह्या लोकांस असें सांगितलें कीं, तुह्मी स्वस्थपणें

आमच्या पाठीशीं राहावें. उठावणी करूं नये. कारण हा इंग्रेजांच्या पलटणीशीं लढण्याचा प्रसंग आहे. जर तुह्मी आपले घोडे पुढें आणिले तर आमच्या तोफा बंद होऊन आह्मास व तुह्मास एकदांच मागें हटावें लागेल. या मागच्या लोकांत दौलतराव शिंदा होता. त्याणें पलटणीवरील सरदारांच्या ह्मणण्याप्रमाणें उठावणी तर केली नाहीं; पण पलटणीच्या मागें उभें न राहतां बाजू मात्र धरली. इकडे **वसली** साहेबांनीं असें केलें कीं, इंग्रेजी पलटणें तोंडावर उभीं करून मराठी फौज सर्व मागें उभी केली. याप्रमाणें शिंद्याचे फौजेचीच आकृति आपल्या फौजेस देऊन तीन गोरीं पलटणें व अठ्ठावीस तोफा बरोबर घेऊन शिंद्यांच्या पलटणीवर तोफा सुरू केल्या. शिंद्यांचे गोलंदाज तोफा मारण्यांत परम कुशल असल्या कारणानें त्यांणीं इंग्रेजाकडील एक तोफ पहिल्या झटक्यांत गोळा घालून फोडून टाकली! हें गोलंदाजाचें कौशल्य पाहून इंग्रेजांनीं आपली तोफ बंद करून शत्रूचे अंगावर जाण्यासाठीं पुढें चाल केली. शिंद्याकडून जंजिऱ्याचा[1] मारा होत होता, त्यापुढें यांचा नेट चालेना. इंग्रेजांकडील लोक ओळ बांधून चालत, परंतु त्यांचा गोळा येऊन पडला कीं, यांचे माणसांचा खत्ताला होऊन जाई. अशा प्रकारें फारच लोक मारले गेले. **वसली** साहेबांचा घोडा गोळा लागून प-

---

१ दोहीं टाकांस दोने गोळे असून मध्यें जाडी तार असते अशा गोळ्यास जंजिरा म्हणतात.

२ शिंद्यांकडील फौज इतकी जोरदार कशानें झाली हें सर्वांस विदित आहेच. महादजी शिंद्यां( पाटीलबावा)नीं परेन नामें फ्रेंच सरदार पदरीं बाळगून सेनेंत पुष्कळ सुधारणा केली होती; तिचा हा प्रताप.

डला. आतां पुढें जाणें ह्मणजे मृत्यूच्या दाढेंत पडण्या-
सारखेंच आहे असें जाणून **वसली** साहेबांनीं आपला मो-
हरा मागें फिरविला. परत आल्यावर दुसऱ्या नवीन
गोऱ्या पलटणी घेऊन दुसऱ्या वारूवर आरूढ होऊन
पुनः शिंद्याचे पलटणीवर चाल केली. शिंद्याचे पलट-
णीवरचे अम्मलदार फारच चतुर होते आणि त्यांचे गोलं-
दाजही चलाख असल्यामुळें इंग्रेजी पलटणें पूर्ववत् मागें
हटलीं. पहिल्याप्रमाणेंच या वेळीं वसली साहेबांचा
घोडा पडून लोकही तसेच पडले ! तिसऱ्या वेळीं तुर्की
स्वार बरोबर घेऊन चाल करून पाहिली, परंतु तिसऱ्या-
नदांही प्रयत्न निष्फळच झाला ! तुर्की स्वारांचा सडा
होऊन साहेबांचा घोडा मृत्युपंथास पोंचला ! ! असा तीं
नदां पराजय पावलेला **वसली** साहेब पूर्ण धारिष्ठाचा
ह्मणून त्यानें पुनः प्रयत्न करण्याचें सोडिलें नाहीं. इकडे
शिंद्याकडील पलटणें जागचेजागींच उभीं राहून पूर्ण धा-
रिष्टानें गोळ्यांचा मारा करीत होतीं. चवथे वेळीं गोरे
स्वार घेऊन वसली साहेबानें एकदम हल्ला केला, परंतु
कांहीं झालें नाहीं ! ! कारण शिंद्याकडील पलटणींची अं-
तस्थ रचना होती ती कांहीं अप्रतीमच ! ती असे शेंकडो
हल्ले सहन करण्यास समर्थ होती यांत शंका नाहीं.

वर सांगितल्याप्रमाणें इंग्रेजी पलटणींची यथास्थित फ-
जिती झालेली पाहून दौलतराव शिंद्यास पाठलाग करण्या-
चा चेव आला. चवथ्या वेळीं वसली साहेब उलट खाऊन
माघारा फिरतो आहे तोंच शिंद्यानें आपले लोक त्याजवर
भडिमार करण्याकरितां पुढें आणिलें. पूर्वी सरदारांनीं त्यांस
मागेंच स्वस्थ राहण्याविषयीं दिलेली मसलत न मानून है

बहादूर पुढें सरसावले ! पलटणींतील लोकांनीं यांनीं पुढें न यावें ह्मणून पुष्कळ यत्न केला, पण शिंद्यास वाटलें कीं, आतां इंग्रेज पूर्ण पराजित झाले आहेत यासाठीं यांचा समाचार घेण्याची हीच काय ती उत्तम संधि आहे ! असा पोकळ घमेंडीचा विचार करून पलटणी मागें टाकून आपले स्वार पुढें आणिले, आणि फिरलेल्या लोकांचा पाठलाग केला. इकडे मागें पलटणीचा घोटाळा झाला. तो असा कीं, मालकच फौजेनिशीं आडवे आल्यावर मग यांचें युद्ध बंद पडलें. शिंद्याचे लोक पुढें आल्यामुळें पलटणींतील तोफच बंद करणें भाग झालें ! वसली साहेबानें तोफ बंद झालेली पाहून हर्ष मानिला. कारण त्याच्या लोकांस तो मार बिलकुल सहन होईनासा झाला होता. शिंद्याचे लोक पाठीवर येताहेत हें पाहून गोळीचे टप्यांत त्यांस येऊं देऊन एकदम मोर्च्या फिरविला ! तोफांची व स्वारांची एकदम फैर केली. गोरे स्वारांनीं एकदम तोंड फिरवून इसापनीतींतील सिंहाच्या मागें लागणाऱ्या गाढवाप्रमाणें शिंद्याचे लोकांची अवस्था केली ! कोंबड्याचा शब्द ऐकूं येत होता तोंपर्यंत जशी सिंहास भीति वाटत होती तसेंच तोफ चालू होती तावत्कालच काय ती **वसली** साहेबाचे लोकांस यांची भीति वाटत होती ! कोंबड्याचा शब्द दूर राहिला असें समजल्यावर गाढवास गट्ट करण्यास मृगराजास जसा विलंब लागला नाहीं तसें **वेलस्ली** साहेबांचे लोकांस शिंद्याचे स्वारांचा धुवा उडविण्यास अवकाश लागला नाहीं ! शिंद्याचे स्वार क्षणावधींत घाबरून पळूं लागले. त्याचा सरदार निंबाजी भास्कर हा घोड्यावरून पडून ठार झाला. हा निंबाजी भास्कर राजापूर प्रगणें

दिंडोरीचा कुळकर्णी होता. त्या लोकांनीं ... पडण स्थळाचा रस्ता धरिला. पण पूर्व स्थळ सांपडतें ला मध्यंतरी तर पलटणी लोक होते ! इंग्रेजी पलटणें ... नवी धांवत जाऊन शिंद्याकडील सर्व तोफा घेऊं लागले. त्यां च्या हस्तगत शिंद्याच्या एकशें पंधरा तोफा झाल्या ! यामुळें पलटणींतील शिपाई निरुपाय होऊन मागें परतले, व इंग्रेजाचा व **बापूचा** जय झाला. या लढाईंत इंग्रेजाकडील मेले व जखमी मिळून एक हजार मनुष्यांची संख्या होती. आणि शिंद्याकडील फक्त चौतीस गोलंदाज शिपाई तोफखान्याजवळ पडले होते. याप्रमाणें युद्धाचा हा शेवट झाला. पुढें सर्जेअंजन गांवीं इंग्रेजाचा व शिंद्याचा १७२१ सालांतील तह झाला आहे. त्याविषयीं सविस्तर निरूपण करण्याचें प्रयोजन नाहीं ह्मणून तें येथें गाळाऊ केलें आहे. वरील लढाईंत **बापूचा** संबंध विशेष असल्यामुळें यथासांग लिहिण्याची आवश्यकता जशी होती, तशी त्या तहाविषयीं तादृश दिसत नाहीं.

१६. येथून पुढें नागपूरचे भोंसले यांच्याशीं जो संग्राम झाला तो विदित करावयाचा आहे. पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, भोंसले, शिंदे आणि होळकर या त्रिवर्गांच्या बंदोबस्ताकरितां **बापू गोखले** आणि **वेलस्ली** साहेब यांस पाठविलें होतें. त्याप्रमाणें प्रथम सामना शिंद्याशीं झाला तो नुकता सांगण्यांत आलाच आहे. आतां भोंसल्याविषयीं कथन करूं.

**वेलस्ली** साहेबांची योग्यता वर एके स्थळीं प्रकट झालीच आहे. तरी येथें आणखी सांगतों कीं, बापूंचा व त्यांचा फारच स्नेह जमला असून परस्परांनीं परस्परांस

फारच साह्य केलें ह्मणून पुष्कळ जय मिळविण्यास त्या उभयतांस अवघड पडलें नाहीं.

गाईलगड या नांवाचा एक किल्ला भोंसल्यांचे ताब्यांत होता. तो घेण्याचा प्रयत्न चालू असतांच खालचा लढाईचा प्रकार घडून आला आहे. तो असा कीं, भोंसल्याचे फौजेशीं सामना करण्याचे पूर्वीं थोडा वेळ एक लष्करी इंग्रेज अम्मलदार **वेलस्ली** साहेबांचे छावणींत येऊन मिळाला. त्या समयास छावणींत **वेलस्ली** साहेबांची सर्व फौज आणि **बापू गोखल्यां**ची सर्व फौज याप्रमाणें होती. जो नवीन लष्करी अधिकारी येऊन मिळाला त्याजबरोबरही कांहीं पलटणें होतींच. शिवाय स्वार होते ते निराळे. याप्रमाणें सिद्धता झाल्यावर, आतां लढाई चालू व्हावयाचीच तों वरील आलेला इंग्रेज अम्मलदार **वसली** साहेबांस ह्मणाला कीं, आज लढाईचें काम मजवर सोंपवावें. तें ह्मणणें मान्य होऊन युद्धास आरंभ झाला. भोंसल्याची फौज लढाईस तयार होऊन प्रथम इंग्रेजाचे फौजेवर तोफ सुरू केली. इकडेस इंग्रेज सरदार हत्तीचे हौद्यांत वसून तुरकी स्वार पलटणें बरोबर घेऊन भोंसल्याचे फौजेवर चालून गेले. भोंसल्याच्या फौजेंतून तोफेचा मारा होत होता, व बाणही जलधारांप्रमाणें वर्षत होते. त्यामुळें इंग्रेजांकडील पुष्कळ शिपाई मृत्यु पावले. हा सुमार पाहून इंग्रेज सरदार तात्काळ हत्तीवरून खालीं उतरून घोड्यावर वसले, आणि आपल्या फौजेस आवेश येण्याकरितां एकदम फेर झाडून तोफा चालू केल्या. इंग्रेज पलटणीनें नेट करून भोंसल्याचे फौजेस मागें हटविलें. मारा सहन होईनामा झाला ह्मणून भोंसल्याच्या सेनेनें निसटला पाय

घेतला. इंग्रेजांनीं त्यांच्या तोफा घेऊन त्यांस पिटून लावलें. याप्रमाणें भोंसले पराजय पावल्यावर गाईलगडचा किल्ला इंग्रेजांनीं घेतला. इंग्रेजांस त्या किल्ल्यांत विपुल द्रव्य सांपडलें.

याप्रमाणें भोंसल्याचें पारिपत्य करून त्याशींही शिंद्या-प्रमाणेंच तह केला. **वसली** साहेब व **बापू गोखले** आपला कार्यभाग संपला ह्मणून पुण्यास येण्यासाठीं परतले. मार्गांत त्यांस वर्तमान लागलें कीं, **बाळकृष्ण गंगाधर** व **मलबा दादा** या नांवाच्या दोघां गृहस्थांनीं बंड करून मुलूख लुटण्याचा सपाटा चालविला आहे आणि पुण्यास खजिन्यांत वसूल जाऊं देत नाहींत. त्यांच्या फौजेचा जमाव नजीकच आहे. ही वार्ता कळल्यावर **बापू गोखले** यांणीं बंड मोडण्याचा निश्चय केला, आणि त्या-प्रमाणें थोडेच दिवसांत बंडवाल्यांचा विध्वंस करून मार्गस्थ झाले. हा त्यांचा पराक्रम पाहून **वसली** साहेब त्यांजवर फारच संतोषित झाले. एकंदर स्वारींत जो पराक्रम केला त्याचें वर्णनपर एक सर्टिफिकिट तारीख ६ मार्च सन १८४४ रोजीं दिलें. तें बापूनें मोठे विनयानें घेऊन त्यांचा उपकार मानला. यावरून वाचकांच्या लक्षांत येईल कीं, सर जान **मालकम** आणि **एलफिन्स्तन्** हे साहेब जसे एतद्देशीय लोकांस प्रिय झाले होते व त्यांची योग्यता एतद्देशीय लोक जशी मानीत होते त्याच प्रकारची वरील साहेबांची मानीत होते, व त्यांच्या पूर्वीं कांहीं दिवस हे साहेब पुण्याच्या दरबारीं प्रिय झाले होते हें पण यावरून उघड दिसतें.

**वेलस्ली** साहेब आणि **बापू गोखले** शके १७२५

सालीं पुण्यास येऊन दाखल झाले. बाजीराव साहेबांची जेव्हां भेट झाली तेव्हां साहेबांनीं **बापू** गोखल्याचे शूरत्वाचें वर्णन बहुत केलें. तें ऐकून श्रीमंतांस कौतुक वाटलें. तें इतकें कीं, लंकेंत **हनुमंतानें** काय काय पराक्रम केला याविषयीं **ब्रह्मदेवानें** लिहिलेलें पत्र **लक्ष्मण** वाचीत असतां **रामचंद्रास** जसा आनंद झाला, त्याचप्रमाणें **बाजीरावास** **वेलस्ली** साहेबांचें भाषण ऐकून आनंद झाला. त्या आनंदभरांत **बापू गोखले** यांस वस्त्रालंकार देऊन पुण्यास राहण्याविषयीं आज्ञा केली.

**धोंडोपंत** दादा यांनीं पुण्यास वाडा बांधण्याचें काम चालविलें होतें. ते गत झाल्यामुळें तें कामही बंद पडलें होतें. तें वाड्याचें काम **बापूंनीं** या खेपेस पुरें करून वाड्यांत राहण्यास गेले. या पूर्वीं इमारत पुरी होईपर्यंत शहराबाहेर ते राहात असत. इमारत पुरी झाल्यावर आपले लग्नाची तयारी करून वाड्यांत गेल्याबरोबर लग्न केलें.

१७. पुण्यानजीकच बारा कोसांवर जेजुरी ह्मणून ह्माळसाकांताचें स्थान आहे. तेथील रामोशांनीं आसपास गांवचे रामोशी जमा करून एक टोळी बनविली आणि गांवोगांवीं दरवडे घालावे, असा क्रम चालविला. कांहीं

१ हा वाडा पडून त्याचा मागमूसहीं हल्लीं उरला नाहीं! परंतु तो वाड्याची बखळ काळेबावरांत गोखल्यांच्या राममंदिरानजीकच आहे. हें राममंदीरही त्यांनींच बांधलें आहे. त्याचीही तूर्त बेमरामत स्थिति आहे! गेले वर्षीं याची दुरुस्तीची तजवीज लागल्याचें वर्तमान वर्तमानपत्रांत वाचलें होतें; मग तें पत्रांतील पत्रांतच राहिलें कीं काय कोण जाणे!

गांवांत दिवसा शिरून तेथील स्त्रियांवर मनास वाटेल तसा जुलूम करावे. खाण्याचे पदार्थ घेऊन जावें. असे अनेक तऱ्हेचे ते उपद्रव देऊं लागले. त्यांच्या उपद्रवास रयत त्रासून सरकाराकडे फिर्याद केली. ती सर्व फिर्याद ऐकून घेऊन **बापू गोखले** यांस तिकडे जाण्याविषयीं श्रीमंतांनीं हुकूम केला. हुकुमाप्रमाणें **बापूसाहेब** आपल्या लोकांनिशीं जेजुरीकडे जाऊन संपूर्ण फौज सुद्धां वाल्हें येथें मुक्काम करून दुसरे दिवशीं तेथून एक कोशावर कोथळें गांवीं फौजेचा तळ दिला. फक्त पांचशें पायदळ व आठशें स्वार बरोबर घेऊन जेजुरीकडे सडी स्वारी चालती झाली. तेथें गेल्यावर सर्व पायदळ श्रीमार्तंडाचे दर्शनार्थ ह्मणून पर्वतावर चढविलें, आणि त्यांस हुकूम केला कीं, 'तुह्मी पूर्वेच्या दरवाज्यानें वर चढून राजुरीकडेस उतरावें. आपण स्वतः स्वार बरोबर घेऊन राजुरीकडे डोंगराच्या पायथ्याशीं उभे राहिले. बापू देवदर्शनास जातात अशी अफवा गांवांत पसरली होती. तो स्वारीचा तमाशा पाहण्यासाठीं हत्यारबंद दोनशें रामोशी डोंगराचे मध्यभागीं उभे होते ते **बापूनें** बारीकपणें टेहळून स्वारांस त्यांच्यावर दौड करण्याचा हुकूम दिला. सर्व स्वारांनीं तरवारी पडताळून रामोशांमागें धांवा केला. रामोशी हें संकट पाहून पळून जाण्यासाठीं वर चढूं लागले. थोडे चढून वर गेले नाहींत तोंच पांचशें पायदळ आपल्या तोंडावर धांवा करीत आल्याचें त्यांस दिसलें. मग फारच घाबरून पुनः मैदानांत जाण्याकरितां तळीं उतरूं लागले. स्वारांनीं एकदम त्यांस घेरा घालून बहुतेक रामोशी पकडले. थोडके मात्र त्यांतून निसटून पळून गेले. पकडलेले रामोशी कोथळें येथें नेऊन एका हा-

रांनें सर्व उभे केले, आणि विजयादुर्ग येथील कोळवणाचें बंड मोडतेवेळीं **धोंडोपंतदादांनीं** सर्वांचीं शिरें जशीं उडविलीं, त्याचप्रमाणें **बापूंनीं** एकदम सर्वांचा शिरच्छेद करविला. येणेंकरून सर्व रामोशांत **बापूंचा** मनस्वी दरारा बसून ते चळचळा कांपूं लागले. त्या सर्वांनीं बंडाचा उद्देश सोडून देऊन घराचा रस्ता धरिला! याप्रमाणें रामोशांचे बंडाची राखरांगोळी होऊन चहूंकडे शांतता झाली.

१८. कऱ्हाड येथील पंतप्रतिनिधि **भवानरावजी** यांचा पुत्र **परशुराम श्रीनिवास** यानें बंड केलें होतें. तें **बापू गोखले** यांणीं सन १८०८ च्या सुमारास नाहींसें करून तो मुलूख पेशव्याच्या वतीनें आपल्या कबजांत घेतला. तो प्रकार असा. इंग्लिश व पेशवे यांचा मित्रभाव जमण्यापूर्वीं **परशुराम श्रीनिवास** प्रतिनिधि यांस धरून कैद करण्याची मसलत **बाजीराव** साहेब पेशवे यांनीं केली. अशी मसलत करण्याचें कारण असें कीं, प्रतिनिधि हे वाईट तऱ्हेचें वर्तन करीत असल्यामुळें त्यांचे मुलुखांत मनस्वी घोटाळा झाला होता. तो मोडून तेथील व्यवस्था नीट व्हावी ह्मणून कारभारी **बळवंतराव** फडनवीस व त्यांची मातोश्री **काशीबाई** यांनीं जहागिरीचा कारभार आपल्या मतानें चालविला होता. त्या सुमारास प्रतिनिधि पुण्यास राहात असत. त्यांस ही वरील **बाजीरावाची** मसलत समजतांच ते पुण्याहून निघून कऱ्हाडास गेले. त्या पूर्वी कऱ्हाडचे जहागिरीची वहिवाट कोणीं करावी हा वाद **बाजीराव** पेशव्यापुढें चालला होता. त्या वादांतील बीज असें होतें कीं, प्रतिनिधीची मातोश्री **काशीबाई** आणि **बळवंतराव** फ-

डनवीस राजाचा मुतालिक, या उभयतांचे मनांत आपण जहागिरीची वहिवाट करावी आणि भवानरावाचे पुत्राच्या मनांत आपण वहिवाट करावी हें वादांतील मुख्य बीज होतें. प्रतिनिधि पळून गेले हें पाहून मुतालिक **बळवंतराव** फडनवीस यांनीं जहागिरीची वहिवाट करावी असा पेशव्यांनीं ठराव केला. तो ठराव प्रतिनिधि मानावयाचा नाहीं ह्मणून **बापू गोखल्यास** बरोबरच्या फौजेसहित पाठवून प्रतिनिधीस धरून कैदेंत घातलें. असें केल्यावर कान्होजीच्या कलह मिटून मुलुखांत स्वस्थता झाले. व **बापू गोखले** परत पुण्यास निघून आले. प्रतिनिधीचें आचरण शुद्ध व्हावें ह्मणून त्यांचे आईनें त्यांस उपदेश केला, परंतु त्याचा उपयोग कांहींच झाला नाहीं उपदेश इतकाच कीं, 'आपण थोर कुलांत उत्पन्न झाले आहां, त्या कुलाच्या योग्यतेप्रमाणें आचरण करून प्रजेचें पालन करावें. गोब्राह्मणप्रतिपाळ करावा.' या उपदेशापासून नफा तर झाला नाहींच, परंतु वाईट वर्तन मात्र वाढलें. प्रतिनिधीच्या स्त्रिया दोन होत्या. असें असून त्यांणीं एक तेलीण जवळ ठेविली होती. थोरलें कुटुंब बीडकर यांची कन्या **लक्ष्मीबाई;** धाकटें कुटुंब **हैबतराव** बाबा देशपांडे वेळापूरकर यांची कन्या **काशीबाई**. यांतून पहिली स्त्री महासाध्वी आणि पतिव्रता होती. तिच्या पातिव्रत्याविषयीं इतका लौकिक असे कीं, धर्मभोळे लोक तिजला नवस देखील करीत असत, परंतु ती प्रतिनिधीच्या मनांतून उतरली होती. तिची नेहमीं दुर्दशाच असे. **बापू गोखल्यांनीं** प्रतिनिधीचा मुलूख घेतला तो प्रकार पुढें सांगण्यांत येईल, यासाठीं तूर्त

त्यांच्या स्त्रियांचीच व्यवस्था कशी काय लाविली तें थोड-क्यांत कळविलें. **बापू गोखले** यांनीं थोरले कुटुंबास संस्थानखर्चांतून नेमणूक करून देऊन त्यिन्हई येथें सुखरूप वास्तव्य होण्याजोगी तजवीज लावून दिली. दुसऱ्या कुटुंबाची तरी नीटशी व्यवस्था नव्हतीच; कारण पुरुष फंदी असल्यावर स्त्रीची कोणत्या प्रकारची स्थिति असावयाची हें सर्वांस ठाऊक आहेच. असो. **काशीबाई** ह्या कऱ्हाडासच राहत होत्या. कऱ्हाडकर प्रतिनिधि यांचे भाऊबंद विशाळगडकर प्रतिनिधी संस्थान करवीर यांणीं या दोघी बायांची अशी अव्यवस्था पाहून **बापू गोखले** यांस पत्र पाठवून त्या स्त्रियांस आपल्याजवळ विशाळगडीं नेऊन ठेविलें.

थोडेच दिवसांनीं अशी गोष्ट घडून आली कीं, प्रतिनिधींनीं जी तेलीण राखिली होती, तिनें असें प्रतिनिधीवरचें संकट पाहून अशी युक्ति केली कीं, वासोटा किल्ला[1] प्रथम हस्तगत करून कित्येक लोक चाकरीस ठे-

---

१. हाच वासोटा किल्ला सन १६६५ त शिवाजी महाराजांनीं आपल्या कबजांत घेतला. ती गोष्ट मोठ्या मौजेची आहे. ती अशीः—

शिवाजी महाराज हे पुंडाई करितात यासाठीं त्यांचे वडील शाहाजी राजे यांस विजापूरवाल्यांनीं कर्नाटकांतून धरून आणून चार वर्षें कैदेंत ठेविलें, तेव्हां महाराजांनीं दिल्लीस शहाजहान बादशहास पत्र लिहून बापाची मुक्तता केली. दिल्लीचे दरबारांत शिवाजी महाराजांचें एवढें वजन पडलें हें पाहून विजापूरवाले किंचित् मनांत दचकूं लागले, आणि महाराजांशीं, उघड द्वेष करण्याचें टाकून दिलें. याशिवाय विजापूरवाल्यांस दुसरा एक धाक वाटत होता. तो असा कीं, पुष्कळ दिवस आपल्याकडून खंडणीचा पैसा दिल्लीस न गेल्यामुळें मोंगलांची निकड लागली आहे. अशांत महाराजांशीं बिनसल्यास ते

विले. आणि ल्हानशी गढी किल्ला मसूर येथें प्रतिनिधींस बंदींत ठेविलें होतें, त्या ठिकाणीं जाऊन हल्ला करून

---

आपला मुलूख मोगलांचे स्वाधीन करतील. या कारणास्तव कर्णो करून गुप्त रीतीनें महाराजांस आपले काबूंत आणावें अशी युक्ति त्यांणीं चालविली. या वेळीं शिवाजी महाराज हमेशा महाडास रहा असत. व सह्याद्रीच्या मार्गानें त्यांचें घाटावर येणें जाणें असे. हें पाहू न विजापूरवाल्यांनीं बाजी शामराज या नांवाच्या एका मनुष्याबरो बर फौज देऊन त्यास पारघांटाचें सुमारास दडून राहण्यास सांगित व महाराज जाण्यायेण्याची संधि पाहून त्यांच्यावर शस्त्र चालविण्या स आज्ञा केली. परंतु ही सर्व बातमी शिवाजी महाराजांस पूर्वीच क ळून त्यांणीं पारघांटाचे पायथ्याशीं बाजी शामराज येतांच त्यांच सैन्यावर छापा घातला; व समूळ पराजय करून त्यांचे लोकांस गनी माळ हांकून लाविलें. या कामामध्यें चंद्रराव मोरे यांणीं विजापूरच त्यांची फौज घांटमार्गानें जाऊं दिली व त्यांची दुष्ट मसलत माहि असतांही मदत केली. येणेंकरून महाराजांस त्वेष येऊन त्यांनीं मो यांचा सूड घेण्याचा निश्चय केला. तेव्हां जावळी प्रांत मोऱ्याकडे होता.

यापूर्वी मोरे व महाराज यांच्यामध्यें बराच घरोबा असे. एक कांकडे जासूद व कारकून जात येत असत. महाराजांनीं मोरे यां पारिपत्य करण्याकरितां सैन्य जमा केल्यावर जावळी प्रांताची माहि ती मिळावी ह्मणून व मोरे हे कितपत सावधगिरीनें असतात व त्यां सैन्याची कशी काय तयारी आहे ही खबर घेण्याकरितां राघो बल्लाळ ब्राह्मण व संभाजी कावजी मराठे असे दोन कारकून पंचवीस माव ळ्यांसहवर्तमान जावळीस रवाना केले. या कारकुनांनीं अंतर्यामींचा हेतु गुप्त ठेवून मोरे यांस सांगितलें कीं, 'शिवाजी महाराजांस जा आणखी एक लग्न करणें आहे. त्यास आह्मी आपले कन्येस पाहण्या आलों आहों.' मोरे यांणीं कारकुनांचें यथायोग्य आदरातिथ्य कर त्यांच्याशीं निष्कपटपणानें वागूं लागले. हा प्रकार पाहून राघो ब



त्यांस तिणें तेथून मुक्त केलें. नंतर प्रतिनिधींनीं आपला झेंडा उभा करून लोकांत प्रसिद्ध केलें कीं, 'मी पंत प्रधान पेशवे यांचा अंकित नसून माझे धनी सातारचे महाराज आहेत. त्यावरून प्रतिनिधीचे मुलुखांतील शिपाई लोक व त्यांचे संबंधी कित्येक मोठमोठे कुलीन गृहस्थ त्यांजकडे जाऊन राहिले. त्यायोगें कदाचित् त्यांचा मनोरथही सिद्धीस गेला असता. कारण प्रतिनिधि कांहींसे शूर आणि उग्र स्वभावाचे होते, परंतु अविचार हा एक मोठा दुर्गुण त्यांच्या ठायीं होता; त्यामुळें ते आपल्या आईच्या पक्षाचें

---

ळाचे मनांत पापबुद्धि आली, व मोरे अगदीं गैरसावध आहेत हें लक्षांत आणून त्यानें चंद्रराव यास ठार मारण्याची मसलत केली. संभाजी कावजीसही हा बेत पसंत झाल्यावर, उभयतां कारकुनांनीं शिवाजी महाराजांस पत्र लिहिलें. परंतु पत्रांत मजकूर काय होता हे कळत नाहीं. पुढें महाराजांनीं कृष्णेच्या उगमाजवळ महाबळेश्वरीं आडमार्गानें सैन्य रवाना केलें व आपण पुरंदरच्या वाटेनें जाऊन सैन्यास मिळाले. इतक्या अवकाशांत जावळी येथें राघो बल्लाळ व संभाजी कावजी यांणीं चंद्रराव व त्यांचे बंधु यांची एकांत गांठ घेऊन त्या उभयतांस ठार मारिलें. नंतर बरोबरच्या मावळ्यांसहवर्तमान कोणास न कळूं देतां जंगलांत पळून गेले. इतक्यांत संकेताप्रमाणें शिवाजी महाराज जावळीस येऊन दाखल झाले व गांवांत वेढा घातला. मोरे यांचे दिवाण हिम्मतराव यांणीं बराच वेळपर्यंत शौर्यानें युद्ध केलें, परंतु अखेरीस ते मरण पावले. नंतर महाराजांनीं वासोटा किल्ला सर केला. तेणेंकरून संपूर्ण जावळी संस्थान त्यांचे स्वाधीन झालें. हें संस्थान इंग्रेजांचे हातीं येईपर्यंत सदोदित तेथें स्वराज्य व स्वतंत्रता चालू होती. आतां मात्र महाबळेश्वर ही उत्तम हवेची जागा असल्यामुळें हजारों इंग्लिश लोक तेथें वर्षांतून कांहीं महिने वास करीत असतात.

अथवा कारभाऱ्याकडचें कोणीं सांपडलें असतां, त्यावर बि-
लकुल दया न करितां अत्यंत क्रूरकर्म करीत. आणि ख-
र्चास द्रव्य जमा करायासाठीं आपल्याच प्रजेस पेंढाऱ्याप्र-
माणें लुटून उपद्रव देऊं लागले. त्यावरून ते लोकांच्या
मनांतून फारच उतरले. असें झाल्यानंतर पेशव्यांनीं बापू
**गोखले** यांस पुनः हुकूम केला कीं, 'तुह्मी कऱ्हाडास जा-
ऊन प्रतिनिधीस शुद्ध रीतीनें वागण्याविषयीं जरबेनें सम-
द्यावी. इतक्यावर त्यांनीं ती गोष्ट नच मानली तर शि-
रस्त्याप्रमाणें संस्थानचा बंदोबस्त करून प्रतिनिधीस पकडू-
इकडे आणावें.' याप्रमाणें बापूंनीं हुकूम मान्य करून आ-
पली सेना व जामानिमा बरोबर घेऊन लागलेच कऱ्हाडा-
कडे कूच केलें. हें प्रतिनिधि यांस कळल्यावर त्यांस सं-
ताप आला, आणि त्या क्रोधावेशांत त्यांनींही फौज तया-
करून लढाईचा बेत ठरविला. त्या वेळीं प्रतिनिधीचे को-
णी विश्वासू चाकर होते त्यांनीं त्यांस अशी मसलत दिली
कीं, 'या वेळीं गोखल्यांसमोर युद्धास उभें राहूं नये. का-
रण, त्यांच्यापुढें टिकाव लागणें परम दुर्घट होय. यासाठीं
आतां डोंगरांत जाऊन तेथें रामोशी सहाय करून घेऊन
जे वेळीं हात चालेल ते वेळीं युद्धप्रसंग करावा.' हें म-
ऐकून वसंतगडाजवळ गोखल्यांच्या फौजेची वाट पहात रा-
हिले. नंतर गोखले यांचें सैन्य आल्यावर तात्काळ युद्ध
होऊं लागलें. पहिल्याच हल्ल्यांत प्रतिनिधीचे पुष्कळ लो-
क पळून थोडेच शिल्लक उरले! त्या युद्धाच्या गर्दींत प्रति-
निधीही पुष्कळ लढले, परंतु त्यांचा उजवा हात तुटून ते
**बापू गोखल्यां**च्या हातीं लागले! हा जो त्यांस प्रतिबं-
प्राप्त झाला तो पेशवाईचे अखेरपर्यंत होता. असो. हें गो-



खल्यांचें यश ऐकून पेशव्यास परम संतोष वाटला. त्यांनीं
गोखल्यांस आज्ञापत्र पाठविलें कीं, त्या मुलुखाचा बंदोबस्त
आपल्या मार्फत करून प्रतिनिधीचा हात बरा होईल असा
इलाज करावा व त्यांस जावता ठेवून पुण्यास घेऊन यावें.
हें पत्र पाहून किल्ला खेरीज करून सर्व मुलूख **बापूं**नीं घे-
तला. तो मुलूख पुढें कांहीं दिवस **बापूंचे**च कबजांत रा-
हिला होता. त्याची अमर्याद खंडणी घेतल्यानें व कांहीं
प्रतिनिधीची चीजवस्त सांपडली असल्यामुळें **बापू गोखले**
त्या वेळच्या सर्व सरदारांत फार धनवंत झाले. एक वा-
सोटा किल्ला मात्र त्या तेलणीनें बळकावला होता; तो प्र-
कार पुढें सांगूं. असो; **बापू गोखले** यांनीं प्रतिनिधीचे
हाताची जखम बांधायाची तजवीज केली, परंतु ते हात बांधूं
देईनात. ते ह्मणूं लागले कीं, 'मातोश्री **काशीबाई** व का-
रभारी **बळवंतराव** या उभयतांचे स्वाधीन मला करणार
नाहीं असें वचन द्याल तर जखम बांधूं देईन. नाहीं तर
बांधूं देणार नाहीं.' याप्रमाणें त्यांचें फारच आग्रहाचें बो-
लणें ऐकून **बापूं**नीं ती गोष्ट मान्य केली. कारण अमान्य
करावी तर यांच्या जिवास अपघात होण्याचा सुमार आहे.
मग नाइलाज समजून वचन दिलें, आणि हाताची दुखापत
नीट होईल अशी पट्टी बांधली. त्या दिवसापासून प्रतिनिधि
**बापू गोखले** यांस तीर्थरूपाप्रमाणें मानीत असत. पुढें क-
ऱ्हाडचा सर्व कारभार आटोपला असें पाहून श्रीपंढरपुरा-
हून **बापू** पुण्यास गेले. पुण्यास गेल्यावर श्रीमंतांचे हुकू-
मावरून तुळशीबागेचे पिछाडीस गोडबोले यांचे वाड्यांत
प्रतिनिधि यांस बंदींत ठेविलें.

ही वार्ता प्रतिनिधीची राख **ताई** तेलीण हिनें ऐकून

अंतकाळ फौजेचा जमाव केला. तिची वजनदारी
ज जमविण्यापुरती होती. फौज जमविल्यावर
तेलणीनें प्रांतांतील गांवें लुटण्याचा क्रम चालवि
स्त्रीवर वीरानें शस्त्र उचलूं नये असें आहे,
केव्हां केव्हां असा कांहीं अद्भुत योग घडून येतो
त्या वेळीं शूराचा निरुपायच होऊन जातो. अर्वा
काळच्या इतिहासांत तर काय, परंतु प्राचीन काळ
इतिहासांत जरी पाहिलें तरी असे प्रसंग आलेले शेंकडो
दाहरणें सांपडतील, यांत लवमात्र शंका नाहीं. असो, त
प्रसंग **बापूवर** येऊन ठेपला. त्यांस त्या तेलणीवर जा
चा हुकूम झाला, आणि त्या प्रांतांत एकंदर सत्तावीस कि
आहेत ते कवजांत घेऊन नीट बंदोवस्त करण्याविषयीं
कूम झाला. **बापू गोखले** जातांच वेळीं तेलणीचे फौजे
पराभव केला. पण ती तेथून पळाली ती थेट जावली प्रां
तील वासोटा किल्ल्यांत जाऊन बसली. तेथील सर्व
मुग्री बळकावून स्वस्थपणें तेथेंच राहिली. तो किल्ला
रच विकट असल्यामुळें लवकर यांच्या हातीं चढला नाहीं
आठ महिनेपर्यंत ती तेलीण लढून शेवटीं दाण्याच्या
टीस आग लागल्यामुळें निरुपाय होऊन तिनें किल्ला दि

१ त्या तेलणीच्या शूरत्वाविषयीं अद्यापपर्यंत एक आर्या लोकां
प्रसिद्ध आहे. बापू गोखले जिवंत असतां त्यांचे समक्ष भोजनसम
पंक्तींतून ही आर्या मुलें म्हणत असत आणि ती ऐकून बापूही स्वा
मौजेनें हांसत असे, असें ऐकिवांत आहे. ती आर्या ही;—

श्रीमंत पंत प्रतिनिधि । यांचा किल्ला अजिंक्य वासोटा ।
तेलिण मारी सोटा । बाप गोखल्या संभाळ कांसोटा ॥ १ ॥

आणि आपण गोखल्यांच्या स्वाधीन झाली! मग तिला गोखल्यांनीं इतमामानेंच पुण्यास नेऊन ठेविलें.

या सर्व कऱ्हाड प्रांताच्या बंदोबस्तांत **बापू गोखले** यांस पदरचें द्रव्य खर्चावें लागलें. कारण हा सर्व मुलूख मूळचा अठरा लक्ष रुपयांचा होता, त्यांतून **भवानरावजी** यांणीं सुमारें आठ लक्षांचा मुलूख इनाम धर्मादाय केला होता. वरील समयीं कर्नाटकांत बंदोबस्त करण्यांत व किल्ले ताब्यांत घेण्यांत आणि तेलणीशीं लढण्यांत **बापू गोखले** यांस पुष्कळच पैसा खर्च करणें भाग पडलें. किल्ला घेतांना शिबंदी वाढवावी लागली, तिचा पगार तुंबला तेव्हां कऱ्हाडचे खजिन्यांत पगार देण्यास पैसा शिल्लक नाहीं असें पाहून सावकारापासून पैसा काढून सर्वांचें वेतन चुकवून दिलें. पुण्यास आल्यावर खर्चानिमित्त सतरा लक्ष रुपये कर्ज झाल्याची याद श्रीमंतांस दिली. ती श्रीमंतांनीं मंजूर करून दरसाल दोन लक्ष रुपये सरकारांतून **बापू गोखले** यांस देण्याचा ठराव केला, आणि त्याविषयीं सरकारी दप्तरीं खातेबंदी करून ठेविली. पुढें दरसाल दोन लक्ष रुपये **बापू गोखले** यांस पोंचत गेले, परंतु ती सर्व फेड होण्याच्या पूर्वींच पेशवाईचा भंग होऊन इंग्रेजी नवी मुद्रा झाली! त्यामुळें कांहीं पैसा आदा होण्याचा राहिला असेल यांत नवल तें कोणतें! याप्रमाणें कऱ्हाड प्रांतासंबंधी जितका **बापू गोखले** यांचा संबंध होता तितका येथवर निरूपण केला. आतां येथून पुढें दुसरे गोष्टीकडे वळूं.[1]

---

१ बापू गोखल्यावर तीन लाख रुपये देणें बापू कृपाराम कऱ्हाणपुरकर याचें होतें ह्मणून ऐतिहासिक गोष्टींत लिहिलें आहे.

१९. **बाजीराव** पेशवे यांची स्वारी दरसाल श्रीपंढरपूर, वांईक्षेत्र, नाशिक आणि कोपरगांव इतक्या ठिकाणीं तीर्थाटन करण्याकरितां जात असे. या सर्व ठिकाणीं जाऊन तेथील उत्कृष्ट वाड्यांत कांहीं दिवस वास्तव्य करून मग राज्याकडे लक्ष देण्यास कितीसें फावत असेल हें दिसतच आहे! असो. बाजीराव साहेबांचा बहुतेक काळ तीर्थयात्रा, ब्राह्मणसंतर्पण, यज्ञयाग, दानधर्म, ख्यालीखुशाली, या खालींच गेला. स्वतः ते याज्ञिक कर्मांत निपुण असत. त्यांत ते भटास हार जाण्याजोगे नव्हते. तसेंच क्षेत्रस्थ ब्राह्मणांपेक्षां ते पोहणारही अधिक होते. या सर्व गोष्टी आमच्या वाचकांस विदित असतीलच. ह्मणून त्यांचा विस्तार करण्याची जरूर नाहीं. पूर्वींच्या त्यांच्या पूर्वजांनीं तीन चार पिढ्यांपर्यंत अतोनात खटपट करून संपत्ति मिळविली होती; तसेंच राज्याची बढती होऊन जी मजबुती केली होती तिचा यांच्या कारकीर्दींत लय झाला! बहुता दिवसांचा पाणी घालून वाढविलेला जोरदार वृक्ष जसा समूळ उपटून टाकावा तसें यांनीं केलें. असो. याविषयीं कितीही हळहळ केली तरी उपयोग काय! आमच्या देशाच्या दुर्भाग्यानें या राजास पूर्वींचे सुमंत्री दूर करून दुष्ट मंडळ जमा करण्याचीच बुद्धि झाली! चांगला मंत्री जवळ असता तर त्यानें राजाचें मन स्वराष्ट्रमजबुतीकडे वळविलें असतें. हे महाराज राज्यावर येतांच 'वडिलांचे हातचे चाकर, त्यांस न मिळे भाकर', अशी जुन्या थोर थोर प्रधानांची अवस्था करून टाकली. राजाजवळ निस्पृह प्रधानमंडळ असावें अशी राज्यनीति आहे. प्रधान सर्वोत्कृष्ट असून राजानें पण त्यांचा सल्ला ऐकला

पाहिजे. येथें तर दोहीं गोष्टींचा अभावच ! पहा ! ! कोणे एके समयीं थोरले **माधवराव** पेशवे यांस पंडितांचे भाषणेंकरून अशी इच्छा झाली कीं, कांहीं तपस्या करावी, यामुळें **माधवराव** नित्य जप करूं लागला. मग एक दिवस तो जपास बसला असतां **रामशास्त्री** कांहीं कामानिमित्त त्यांजकडे गेला. तेव्हां त्यांचे जवळचे शिष्यांनीं सांगितलें कीं, 'या वेळेस श्रीमंतांची गांठ पडणार नाहीं. कां कीं ते जपास बसले आहेत.' त्यावरून **रामशास्त्री** आपल्या घरीं जाऊन विचार करिते झाले कीं, याविषयीं वाद करावा तर ठीक नव्हे; यासाठीं याचा आश्रय सोडून जावें हेंच बरें. मग दुसरे दिवशीं तेथें जाऊन बोलले कीं, 'मला काशीस जावयाची आज्ञा द्यावी.' तें ऐकून **माधवराव** बोलला कीं, 'आपण येऊन गेलां ते समयीं मी जप करीत होतों त्यामुळें आपली भेट झाली नाहीं.' त्यावर **रामशास्त्री** यांनीं उत्तर केलें कीं, 'आपण जें निमित्त सांगतां तें ब्राह्मणास योग्यच आहे, परंतु ब्राह्मण जर आपलें कर्म सोडून राज्य करूं लागले तर त्यांनीं प्रजापालन करावें तें टाकून जप करीत बसणें हा अन्याय आहे. त्यांतून जर आपले मनांत जप करावा असेंच आहे तर हें सर्व राज्य टाकून मजबरोबर काशीस चलावें. मी तें आपणास पुर्तेपणीं शिकवीन.' त्यावरून **माधवराव** मनांत समजून त्यानें तें कृत्य टाकून दिलें.

ही चतुरस्रपणाची गोष्ट अगदीं आलीकडील काळाची झाली. त्याचप्रमाणें मराठी राज्याचे स्थापक जे **शिवाजी**

---

१ ग्रांटडफची बखर मराठी भाषांतर भाग एकवीस पहा.

महाराज यांजविषयीं एक चमत्कारिक गोष्ट 'तुकारामच रित्रां'त सांगितली आहे. ती अशी:—

१ महिपतीनें रचिलेल्या 'तुकारामचरित्रां'त या गोष्टीचा व खालच्या गोष्टीचा विस्तार फार केला आहे, पण तो येथें सर्वच घा लणें प्रशस्त नाहीं; म्हणून संक्षेप मात्र येथें सादर केला आहे. ग्रां टडफच्या इतिहासांत हा संस्कार शिवाजी महाराजांस झाल्यानं कोठेंच कांहीं लिहिलें नाहीं! 'तुकारामचरित्रां'त तर ही गोष्ट लि हिली असून दुसरी एक मौज शिवाजीराजाविषयीं सांगितली आहे ती अशी:—

पुण्यास दादोजी कोंडदेव ह्मणून एक ब्राह्मण जातीचे मोकाशी असत. हे परम निग्रही व नीतिमान (शिवाजीचे शिक्षक) असत. यांच्या निग्रहीपणाच्या एक दोन गोष्टी अशा आहेत कीं, एकदां ते उपहार करीत असतां त्यांची भार्या बाहेर गेली होती. तिच्या मागं स मोर असलेली लवणशाख यांणीं आपल्या हातानें घेतली; तें पाहून कांता विनोदानें ह्मणाली कीं, 'आपण मला विचारल्यावांचून घेतलें हें अनु चित काम केलें. दुसऱ्यास नीति सांगत असतां आपणच असें क रणें विपरीत आहे.' एवढ्या गोष्टीवरून आपला हात तोडून टाक ण्याविषयीं चाकरास आज्ञा केली! इतक्यांत एक श्रेष्ठ ब्राह्मण येऊन त्यानें शास्त्रआज्ञा अशी सांगितली कीं, 'तितकीच आंगरख्याची बाही तोडवून आंखूड करावी ह्मणजे झालें.' त्याप्रमाणें जन्मभरपर्यंत दादो कोंडदेव बाही आंखूडच राखीत असत! एकदां पीठ दळून कमी आलें असें समजलें. त्यावरून मोलकरीण सत्वर बोलावून आण विली. ती ह्मणाली, 'मीं पीठ चोरलें नाहीं.' मग जातें उपटून पा हिलें तर खालच्या तळीखालीं बिळींत पावशेर दाणे निघाले. तें तळी चोर अन्यायी आहे ह्मणून सुळीं देण्याविषयीं तत्काळ हुकूम दिला! अशा तऱ्हेचा निग्रही शिक्षक शिवाजी महाराजांस किती कल्याणदायक झाला हें वाचकांस ठाऊक आहेच. यांणींच गोब्राह्मण प्रतिपालन करण्याविषयीं शिवाजीस शिकविलें. असो. या दादू कोंडदे मोकाशीकडे एकदां दोघे यति येऊन तुकाराम महाराजांविषयीं ग

**तुकाराम** महाराजांच्या अभंगांच्या वह्या **रामेश्वरभट** वाघोलीकर यांनीं देहू येथील इंद्रायणीच्या डोहांत बुडवि-

---

ऱ्हाणीं सांगूं लागले कीं, 'तुकाराम हा शूद्र जातीचा वाणी असून तो कर्ममार्ग बुडवून भाविक जनांस मोहनी घालून भक्तिमार्गाचें प्राबल्य वाढवीत आहे. तसेंच या शूद्रास ब्राह्मण नमस्कार करितात. यासाठीं तुह्मी या प्रांताचे अधिकारी समजून तुम्हाकडे आलों आहोंत. यासाठीं तुह्मी तुकारामास शिक्षा करावी. नाहीं तर आम्ही आपले प्राण देऊं.' हें यतींचें भाषण ऐकून दादोजी कोंडदेवानीं त्यांस सांगितलें कीं, 'तुह्मीं स्वस्थपणें येथें रहावें. तुकारामास लोहोगांवाहून एथपर्यंत बोलावितों. मग तुह्मीं त्याशीं वाद करावा. वादांत हरेल त्यास शिक्षा करीन.' यतींनीं ही गोष्ट कबूल करून तुकाराम महाराज पुण्यास आल्यावर हे वादास सरसावले. तुकाराम महाराजांनीं परमेश्वराचें स्मरण करून एका मोठ्या वाड्यांत कीर्तनास प्रारंभ केला. कीर्तनाच्या नादानें रंग भरून गेला आहे, मंडळी चमत्कार पाहण्यासाठीं तटस्थ बसली आहे, इतक्यांत उभयतां यतीस तुकाराम महाराज नारायणस्वरूपी दिसूं लागले. त्यांणीं भरसभेंत विनयानें जाऊन त्यांच्या पायीं मिठी घातली! आणि त्यांस तात्काळ शरण गेले! हा चमत्कार दादू कोंडदेव पहातच होते. कथा आटपल्यावर कोण हरले, याविषयीं यतींस विचारलें. त्यांणीं सांगितलें कीं, 'आह्मी महाराजांशीं वाद घेण्यास असमर्थ आहोंत! त्यांचा छळ केल्याबद्दल आम्ही अनुताप पावलों! ते केवळ परमेश्वरस्वरूपी आहेत.' हें ऐकून मोकाशांनीं शिक्षा करायाची म्हणून दोन गाढवें यतींची धिंड काढण्यासाठीं आणविलीं. शेवटीं तुकाराम महाराजांनींच असें करणें अनुचित आहे असें सांगितलें, ह्मणून धिंड काढली नाहीं. असो. हा सर्व चमत्कार दादोजी कोंडदेवानीं शिवाजी महाराज प्रांतांत गेले होते त्यांस कळविला. तें ऐकून शिवाजी महाराजांची स्वारी परत लगबगीनें पुण्यास आली. महाराजांची कीर्तन ऐकण्याची मनीषा होती यावरून वाड्यांत कीर्तन सुरू झालें. त्या दिवशीं हरिदिनी होती ह्मणून कीर्तनास फारच रंग आला. इत-

त्या. त्या **श्रीविठ्ठलां**नीं तेरा दिवसपर्यंत कोरड्या राखून चवदावे दिवशीं वर काढल्या. ही गोष्ट व तसेंच **अन**-

---

कथांत एक अपूर्व चमत्कार झाला तो असा; चाकणाहून दोन हजार पठाण घोड्यावर स्वार होऊन शिवाजीस पकडण्यासाठीं आले. त्यांनी पाळत ठेवून कथेच्या रंगांत सर्व वाड्यास गराडा घातला! आतां वाड्यांत शिरून शिवाजी महाराजांस धरावें तों ती बातमी शिवाजीच्या कानीं पडली. त्यावरून ते तुकाराम महाराजांस कथेंतून निघून जाण्याविषयीं आज्ञा विचारूं लागले. मग सर्व श्रोते गजबजून कथेचा विरस झाला. हें अरिष्ट पाहून तुकाराम महाराजांनीं पंढरीनाथाचा धांवा आरंभला कीं, 'आमच्या जिवाचें कोडें मुळींच वाटत नाहीं, परंतु तुझ्या भजनांत व्यत्यय येतो हें पाहून दुःख होतें.' हा धांवा तात्कालिक नवीन चार अभंग करून केला! इतकें होत आहे तों पठाण वाड्यांतील सर्व मंडळी कापून काढावी म्हणून आंत शिरूं लागले. तों ईश्वरानें शिवाजीचें रूप धरून वाड्याबाहेर पळूं लागले. तें पाहून गर्दीत शिवाजी निघून गेला ह्मणून पाठोपाठ घोडे फेकीत सर्व पठाण चालते झाले! एका प्रहरांत तीस कोस जमीन चालत जाऊन एका काटेवनांत सर्व पठाण जाऊन पडले! शिवाजी मुळींच हातीं न लागतां नुसत्या हुलीवर फसून त्या अंधाऱ्या रात्रीं त्यांस परम क्लेश भोगावे लागले! इकडे कीर्तन आटपल्यावर शिवाजीराव तुकाराम यांचा निरोप घेऊन सिंहगडीं निघून गेले व तुकाराम महाराजही लोहगांवीं गेले.

ग्रांटडफच्या बखरींत या गोष्टीविषयीं लेख नाहीं हें वर सांगितलेंच आहे. तरी त्यांत लेख कथेविषयीं मात्र आहे तो असाः—'त्या शिवाजीला बाळपणीं भारती युद्धकथा व भागवती युद्धकथा अत्यंत प्रिय असत. पुढें त्याचे मोठेपणांतही त्याणें कोठें कथा होत्ये असें ऐकिलें ह्मणजे जरी वाटेमध्यें कांहीं मोठें भय असलें तरी तें न मानितां तो कीर्तनास जाई. त्याची हिंदुधर्मावर प्रीति होती आणि मुसलमानांचे धर्माचा तो लहानपणापासून तिरस्कार करी.'

**गडशहा** फकिराचें भिक्षापात्र **तुकाराम** महाराजांच्या मुलीच्या लहानशा चिमटींतील पिठानें भरलें. ह्या गोष्टी ऐकून **शिवाजी** महाराज परम विस्मित झाले, आणि **तुकाराम** महाराजांचें एकदां तरी दर्शन व्हावें या बुद्धीनें पुण्याहून कारकुनाबरोबर घोडा, छत्री देऊन मोठ्या विनयानें लोहोगांवीं बोलावणें पाठविलें. महाराजांनीं हा राजाचा आदर पाहून चित्तांत अनुताप पावून घोडा परत पाठविला, आणि चार अभंग लिहून कारकुनाहातें राजाकडे उत्तर पाठविलें. पाठविलेला घोडा अतिशयित तापट आणि जलद होता, त्याजवर कोणी बसेल असें नव्हतें, तरी **तुकाराम** महाराजांनीं त्याची पाठ थोपटतांच तो शांत होऊन आलेला कारकून त्यावर बसून चालता झाला. असो. हा चमत्कार पाहून आणि या साधूची निरपेक्षता पाहून स्वतः दर्शनास जाण्याचा **शिवाजी** महाराजांनीं बेत केला. बरोबर थोर थोर लोक आणि प्रधान तसेंच पूजासामुग्री मोहोरा होन अलंकार भूषणें घेऊन लोहोगांवीं गेले. नंतर तुळशी, बुक्का, पुष्पमाळा **तुकाराम** महाराजांस स्वहस्तें वाहून एक तबकभर सुवर्णमुद्रा पुढें ठेविल्या. तें राजद्रव्य पाहून **तुकारामास** कंटाळा येऊन बोलले कीं, 'आह्मास हें द्रव्य कशास पाहिजे ! आह्मास **विठ्ठला**वांचून दुसरा हेवा नाहीं. हें आपलें देणें सुवर्णाच्या पर्वतास सोनें वाहणें किंवा क्षीरसमुद्रास दुधाळ गाय देणें अशांतील आहे ! आह्मी **विठोबा**चे दास ह्मणवितों तेव्हां मग आह्मास उणें नाहीं. हें धन गोमांसाप्रमाणें त्याज्य आहे.' हें ऐकून तें सर्व द्रव्य राजानें ब्राह्मणांस वांटलें ! रात्रीं **तुकाराम**

साधूचें कीर्तन ऐकिलें. तें ऐकून यांच्या ठिकाणीं पूर्ण विरक्ति बाणली! प्रातःकाळीं साधु महाराजांचें दर्शन घेऊन एकांतीं अरण्यांत जाऊन सप्रेम सुख भोगूं लागले. प्रधानादिकांस जवळ न येऊं देतां दिवसां वनांत आणि रात्रीं **तुकाराम** महाराजांच्या कीर्तनांत वेळ घालवावा. हें साकल्यवृत्त प्रधानानें पुण्यास **शिवाजी**ची मातोश्री जी **जिजाबाई** तिजला लिहून कळविलें. तिनें हें ऐकतांच धाय मोकलून रडूं लागली आणि ह्मणूं लागली कीं, '**तुक्यानें** माझें घर बुडविलें!' पालखींत बसून मोठ्या त्वरेनें **जिजाबाई** लोहोगांवीं आली. तेथें आल्यावर **तुकारामास** साष्टांग नमस्कार घालून पदर पसरला, आणि अश्रुपातानें डोळे भरून गेले आहेत तरी मोठ्या विनयानें ह्मणूं लागली कीं, 'मला एकुलता एक पुत्र; तो तुमच्या कीर्तनश्रवणानें विदेही होऊन बसला! त्याच्या पोटींही पुत्रसंतान नाहीं! राज्यकारभार पुढें चालविण्यास कोणीच नाहीं. यासाठीं पुत्रदान मजला द्यावें, हेंच मागणें आहे.' हें भाषण ऐकून त्या साधु तुकारामानें असें सांगितलें कीं, '**शिवाजी** कीर्तनास आल्यावर चार गोष्टी सांगूं. तुह्मी परमेश्वर आठवून स्वस्थ असावें.'

रात्रीं कीर्तनास आरंभ होतांच **शिवराय** श्रवणास येऊन बसले. मग काय! कर्मकांड सांगण्यास आरंभ केला. या भवाब्धींतून तरणोपाय होऊन पार पडण्यास एक सत्कर्मच काय तें प्राधान्य आहे. धर्मशास्त्रीं असें सांगितलें आहे कीं, ज्याचा जो धर्म असेल तोच त्यानें आचरावा; दुसऱ्याचा उत्तम धर्म जरी असेल तरी आचरूं नये. यास दृष्टांत असा कीं, मोठा उत्तम आरबी घोडा आणून नांगरास

किंवा मोटेस जुंपिला तर चालेल काय? उत्तम अन्न तयार करून सर्पास खाऊं घातलें तर चालेल काय? उलटा मरून मात्र जाईल. माशास पाण्यांतून काढून तुपांत घातलें तर वांचेल काय? घुशी, उंदीर, बिळांत राहतात; त्यांनीं पक्षासारखें उडूं ह्मटलें तर चालेल? पक्षी बिळांत राहूं ह्मणतील तर चालणार नाहीं! अशीं दृष्टांत वचनें नानाप्रकारचीं बोलून शेवटीं असें सांगितलें कीं, जो स्वधर्म टाकील त्यास तेंच मरण आहे. ईश्वरानें सृष्टि निर्माण केली तेव्हां ज्याचें कर्म त्यास सांगितलें आहे. **ब्रह्म्यानें** उत्पत्ति करावी, **विष्णूनें** पालन करावें. **शेषानें** भूभार मस्तकीं धरावा, **समुद्रानें** पृथ्वीस वेढा घालून मर्यादा धरून असावें. **सूर्यानें** प्रकाश पाडावा. **चंद्रानें** जनास शितळाई द्यावी. शित उष्ण पर्जन्यकाळ आपल्या नेमाप्रमाणें होतात. श्रुतीची अशी आज्ञा आहे कीं, ब्राह्मणांनीं वेदाक्षरें घोकावीं. हें ब्रह्मचर्य व्रतांतील कर्म आटपल्यावर गृहस्थाश्रम धरून षट्कर्मांचा विचार करावा. पुढें वानप्रस्थ स्वीकारल्यावर इंद्रियदमन करावें; परमहंस बनावें; हा ब्राह्मणाचा धर्म वेदांत सांगितला आहे, आतां क्षात्रिय धर्म असा कीं, शत्रूस सन्मुख युद्धांत जिंकावें. पुत्राप्रमाणें प्रजेचें पालन करावें. प्रत्येक अवयवांची जशी जिवास काळजी असते, तशी प्रजेची काळजी राजास असावी. यापेक्षां दुसरें अधिक कोणतेंच पुण्य नाहीं! ईश्वरप्राप्तीस्तव क्षत्रियांनीं दानें द्यावीं. मुख्य ब्राह्मण ज्ञात थोर करून क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांनीं आपले धर्म आचरावे. ईश्वरभजनीं प्रीत असूं द्यावी. व्यापारांत असत्य बोलूं नये. विश्वासघात करूं नये. सर्वांभूतीं दया असावी. क्षुधितास अन्न द्यावें.

ओंगाव साहेब जाऊं लागले ह्मणजे बापूस बरोबर नेत असत. वास्तविक ह्मटलें तर त्यांनीं बापूस मारे रक्षणास म्हणून आपण जात जावयाचें होतें, परंतु तसें न करितां बरोबर नेत असत. अशी पुण्यास झोटिंगपातशाही चालली आहे असें पाहून **चतुरशिंग** राजानें बंड कऱ्हाड प्रांतीं केलें. बंड उपस्थित झालें, ते वेळीं **बाजीराव** साहेबांची स्वारी नाशिक आणि कोपरगांवाकडेस गेली होती. बंडवाल्यांनीं सुमार तीन चार हजार पायदळ व स्वार मिळून जमाव करून प्रथम मच्छंद्रगड किल्ल्यावर गेले. त्या किल्ल्यावर श्रीमंतांनीं **वासुदेव सदाशिव** पटवर्धन यांस शिबंदी देऊन किल्ल्याचे बंदोबस्ताकरितां ठेविलें होतें, त्यांस घेऊन, किल्ला ताब्यांत घेतल्यावर बंडवाले वसंतगड किल्ल्यावर गेले. तो किल्ला घेऊन **चतुरशिंग** तेथेंच राहिला. बंडवाल्यांनीं मसूर येथील गढी घेऊन कऱ्हाडचें ठाणें घेतलें. जीं जीं ठाणीं घेतलीं त्याजवर बंडवाल्यांनीं आपले लोक बंदोबस्तास ठेविले होते. हें सर्व बंडाचें वर्तमान श्रीमंतांस कोपरगांव येथें कळलें. श्रीमंतांनीं **बापू गोखले** यांस तात्काळ आज्ञा केली कीं, 'तुमचेकडील लोक पाठवून बंडवाल्यांचें पारिपत्य करावें. गोखल्याकडील कांहीं लोक पुण्यास होते. त्यांतील मुख्य **विठ्ठल चिंतामण** पुणेकर[1] हे होते. बाजीराव साहेब यांचें थोरलें कुटुंब **वाराणशी** बाईसाहेब यांचे तैनातीकडे हे लोक ठेविले होते. **बापूस** श्रीमंतांची वरील आज्ञा होतांच **बापूंनीं विठ्ठलराव** पुणेकर यांस बंडवाले यांजवर जाण्याचा हुकूम पाठ-

---

१ हें चरित्र ज्या बखरीचा उतारा आहे, ती मूळ बखर विठ्ठलपंत पुणेकर यांणीं लिहिली आहे. ते पुणेकर हेच होत.

अशा परी घरींच सुखानें नांदावें. अशा पुरुषास वनांतरीं जाण्याची आवश्यकता काय! असा कथेंतील उपदेश ऐकून श्रोते मंडळी तटस्थ झाली. **शिवाजी** तर नयनांतून अश्रुपात ढाळूं लागले. कथेची आरति संपल्यावर **तुकोबा**च्या मनोभाव जाणून शिवरायांनीं वस्त्रें परिधान केलीं. नंतर चार दिवस **जिजाबाई** सुद्धां तेथें राहून साधूचा निरोप घेऊन पुण्यास जावें असा बेत केला. निरोप घेण्यास जातेवेळीं मनांत अशी आशा होतीं कीं, जर आपणास राज्य मिळणार असेल तर प्रसाद भाकर मिळावी. आणि पोटीं पुत्र होणें असेल तर प्रसाद नारळ मिळावा. दर्शन घेतां भाकर आणि नारळ असा प्रसाद मिळाला. मग मोठ्या हर्षानें आज्ञा घेऊन सर्व मंडळी माघारी पुण्याकडे चालली. पुढें **शिवाजी** महाराजांनीं दीर्घ प्रयत्न करून स्वराज्य वाढविलें हें सर्वांस विदित आहेच. स्वराज्य स्थापन करावें हा गुरुमंत्र स्वामी **रामदासां**चा यांस झाला. स्वामींचा **शिवाजी**वर तर पूर्ण अनुग्रहच होता.

आह्मीं येथपर्यंत जो दोघां थोर पुरुषांचा महिमा सांगितला तो **बाजीरावास** मुळींच लागू नव्हता; कारण या चरित्रांतील नायक जो **बापू गोखला** यानें राजास कांहींच सदुपदेश केला नसेल असें वाटत नाहीं. बाकीच्या त्यांच्या प्रधानमंडळीविषयीं आमच्यानें सांगवत नाहीं; परंतु यांची आह्मास खातरी देतां येईल. त्यांणींच एके वेळीं अगदीं आणीबाणीच्या वेळीं सांगितलेली मसलत **बाजीरावांनीं** ऐकली नाहीं ही गोष्ट तर सर्वांस ठाऊक आहे! ती वेळ कोणती ह्मणाल तर अष्ट्याचे लढाईची !!

२०. पंढरपूर, वांई, नाशिक आणि कोपरगांव येथें

अशा परी घरींच सुखानें नांदावें. अशा पुरुषास वनांतरीं जाण्याची आवश्यकता काय! असा कथेंतील उपदेश ऐकून श्रोते मंडळी तटस्थ झाली. **शिवाजी** तर नयनांतून अश्रुपात ढाळूं लागले. कथेची आरति संपल्यावर **तुकोबा**चा मनोभाव जाणून शिवरायांनीं वस्त्रें परिधान केलीं. नंतर चार दिवस **जिजाबाई** सुद्धां तेथें राहून साधूचा निरोप घेऊन पुण्यास जावें असा बेत केला. निरोप घेण्यास जातेवेळीं मनांत अशी आशा होती कीं, जर आपणास राज्य मिळणार असेल तर प्रसाद भाकर मिळावी. आणि पोटीं पुत्र होणें असेल तर प्रसाद नारळ मिळावा. दर्शन घेतां भाकर आणि नारळ असा प्रसाद मिळाला. मग मोठ्या हर्षानें आज्ञा घेऊन सर्व मंडळी माघारी पुण्याकडे चालली. पुढें **शिवाजी** महाराजांनीं दीर्घ प्रयत्न करून स्वराज्य वाढविलें हें सर्वांस विदित आहेच. स्वराज्य स्थापन करावें हा गुरुमंत्र स्वामी **रामदासां**चा यांस झाला. स्वामींचा **शिवाजी**वर तर पूर्ण अनुग्रहच होता.

आह्मीं येथपर्यंत जो दोघां थोर पुरुषांचा महिमा सांगितला तो **बाजीरावा**स मुळींच लागू नव्हता; कारण या चरित्रांतील नायक जो **बापू गोखला** यानें राजास कांहींच सदुपदेश केला नसेल असें वाटत नाहीं. बाकीच्या त्यांच्या प्रधानमंडळीविषयीं आमच्यानें सांगवत नाहीं; परंतु यांची आह्मास खातरी देतां येईल. त्यांणींच एके वेळीं अगदीं आणीबाणीच्या वेळीं सांगितलेली मसलत **बाजीरावां**नीं ऐकली नाहीं ही गोष्ट तर सर्वांस ठाऊक आहे! ती वेळ कोणती ह्मणाल तर अष्ट्याचे लढाईची!!

२०. पंढरपूर, वांई, नाशिक आणि कोपरगांव येथें

बाजीराव साहेब जाऊं लागले ह्मणजे बापूस बरोबर नेत असत. वास्तविक ह्मटलें तर त्यांनीं बापूस मागें रक्षणास ठेवून आपण जात जावयाचें होतें, परंतु तसें न करितां बरोबर नेत असत. अशी पुण्यास झोटिंगपातशाही चालली आहे असें पाहून **चतुरशिंग** राजानें बंड कऱ्हाड प्रांतीं केलें. बंड उपस्थित झालें, ते वेळीं **बाजीराव** साहेबांची स्वारी नाशिक आणि कोपरगांवाकडेस गेली होती. बंडवाल्यांनीं सुमार तीन चार हजार पायदळ व स्वार मिळून जमाव करून प्रथम मच्छेंद्रगड किल्ल्यावर गेले. ह्या किल्ल्यावर श्रीमंतांनीं **वासुदेव सदाशिव** पटवर्धन यांस शिबंदी देऊन किल्ल्याचे बंदोबस्ताकरितां ठेविलें होतें, त्यांस घेऊन, किल्ला ताब्यांत घेतल्यावर बंडवाले वसंतगड किल्ल्यावर गेले. तो किल्ला घेऊन **चतुरशिंग** तेथेंच राहिला. बंडवाल्यांनीं मसूर येथील गढी घेऊन कऱ्हाडचें ठाणें घेतलें. जीं जीं ठाणीं घेतलीं त्याजवर बंडवाल्यांनीं आपले लोक बंदोबस्तास ठेविले होते. हें सर्व बंडाचें वर्तमान श्रीमंतांस कोपरगांव येथें कळलें. श्रीमंतांनीं **बापू गोखले** यांस तात्काळ आज्ञा केली कीं, 'तुमचेकडील लोक पाठवून बंडवाल्यांचें पारिपत्य करावें. गोखल्याकडील कांहीं लोक पुण्यास होते. त्यांतील मुख्य **विठ्ठल चिंतामण** पुणेकर[1] हे होते. बाजीराव साहेब यांचें थोरलें कुटुंब **वाराणशी** बाईसाहेब यांचे तैनातीकडे हे लोक ठेविले होते. **बापूस** श्रीमंतांची वरील आज्ञा होतांच **बापूंनीं विठ्ठलराव** पुणेकर यांस बंडवाले यांजवर जाण्याचा हुकूम पाठ-

---

१ हें चरित्र ज्या बखरीचा उतारा आहे, ती मूळ बखर विठ्ठलपंत पुणेकर यांणीं लिहिली आहे. ते पुणेकर हेच होत.

विला. पुणेकर यांच्या ताब्यांत सारे काय ते दोनशें स्वार होते. मालकाचा हुकूम देखत पत्र जाण्याचा होता, तो पाहून लागलीच स्वारी चालती झाली! बंडवाले फार असून आपणापाशीं लोक फारच थोडे आहेत याचा कांहींच आक्षेप न घेतां हुकूम शिरसामान्य केला! पुणेकर कूच करून चालते झाल्यावर मागाहून साळप्याच्या घाटांत आणखी कांहीं स्वार, पायदळ, तोफा हें **बाळाजीपंत** मराठे व **बाबाजी तात्या** गोखले यांच्या बरोबरचे त्यास जाऊन मिळाले. त्याची व यांची गांठ पाडळी येथें झाली. बंडवाल्यांनीं मसूरचें ठाणें घेतलें होतें. त्या ठाण्यास बंडवाल्यांचे सुमार दीडशें लोक होते. त्यांजवर पुणेकर यांनीं आपल्या दोनशें स्वारांनिशीं जाऊन हल्ला केला. त्या हल्ल्यांत त्यांचे तीस चाळीस लोक पुणेकर यांचे लोकांनीं मारले, व पन्नास साठ घायाळ केले, व बाकीचे बहुतेक धरले. याप्रमाणें होत आहे तोंच मागील सर्व फौज तेथें येऊन दाखल झाली. सर्व फौजेचा तेथें एक मुक्काम होऊन दुसरे दिवशीं वसंतगडाकडेस चालती झाली. मुख्य **चतुरशिंग** बंडवाला तो याच किल्ल्यांत असून तो किल्ला मसूरपासून अजमासें तीन कोस दूर होता. तिकडे जाऊन पोंहोचल्यावर त्याशीं लढाई करण्याचा बेत केला. किल्ल्यांत पायदळाची जमियत घेऊन **चतुरशिंग** राहिला होता. स्वार अजमासें पांचशें जे होते ते मोर्च्याजवळ उभे केले होते. आलेल्या सेनेंतून पुणेकर जे निघाले ते आपले दोनशें स्वार बरोबर घेऊन कृष्णानदीचे पश्चिमेस जाऊन किल्ल्याचे माचीस मोर्चापाशीं स्वार जे उभे होते त्यांचे तोंडावर जाऊन थडकले. बाकी रा-

हिलेली फौज व तोफा घेऊन मराठे व गोखले कृष्णेच्या पूर्व बाजूनें नीट किल्ल्यासमोर चालते झाले. किल्ल्यावर तोफेचे गोळे या सर्व फौजेंत येत होते, परंतु यांच्या चलाखीनें कोणासच गोळा लागला नाहीं. इकडे **विठ्ठलपंत** पुणेकर यांनीं मोठ्या जोरानें आपल्या स्वारांसुद्धां बंडवाल्यांच्या स्वारांवर हल्ला केला. त्या सपाट्यांत तीस पस्तीस घोडा जखमी केला; व कांहीं स्वारही पाडाव केले, व बंडवाल्यांचे स्वार पळूं लागले; त्यांच्या मागें हे लागले असतां, किल्ल्यावरील लोकांस खालच्या लोकांचा अपजय झालेला समजला. त्यामुळें किल्ल्याचे दक्षिण बाजूचे दरवाज्यानें अजमासें शेंपन्नास पायदळ लोक उतरून पळूं लागले. यांचा पुणेकरांनीं पाठलाग करून त्यांतून बहुतेक मारले. मग किल्ल्यास प्रदक्षिणा करून पुनः पुढेंच्या आपल्या स्वारांस येऊन मिळाले. या प्रकारें बंडवाल्यांचा मोड करून अस्तमानीं मसूर येथें मुक्कामास गेले. दुसरे दिवशीं मसूर येथें असतां **वासुदेव सदाशिव** पटवर्धन किल्लेदार, जो बंडवाल्यांनीं कैद करून ठेविला होता तो, येऊन सांगूं लागला कीं, बंडवाल्यांनीं तुमचें कालचें शौर्य पाहून असा विचार केला कीं, जर किल्ल्यास वेढा पडला तर आंतच मरण्याची पाळी येईल ! यासाठीं किल्ला सोडून जावें हें बरें. त्याप्रमाणें दोन प्रहर रात्रीं सर्व बंडवाले मागील दारांनीं निघून गेले आणि आह्मी आपल्या भेटीस आलों. हा मजकूर समजल्यावर आनंद मानून किल्ल्याचे बंदोबस्तास शिबंदी पाठविली. नंतर **बापू गोखले** यांस झाले मजकुराचें पत्र मराठे व गोखले यांनीं पाठविलें; त्यांत पुणेकरांचें शौर्य

फार चांगलें वर्णन केलें. पुढें गोखले सातशें स्वार ब रोबर घेऊन बंडवाल्यांचा शोध काढीत चालले. माग मराठे सर्व फौज घेऊन राहिले होते. बंडवाले कोल्हा पुरास गेल्याची वार्ता कळली त्यावरून मराठे कोल्हापुरास जाऊन **रत्नाकर अप्पा** दिवाण यांची भेट घेऊन त्यांस बंडवाल्यांची खबर विचारली, परंतु इकडे आल्याचें ऐकि वांत नाहीं ह्मणून त्यांनीं कळविलें. तसेंच गोखले पंच- गंगेचे तीरीं त्या शोधाकरितां पंधरा दिवस जाऊन राहिले. पहाडांतून पुष्कळ शोध केला, परंतु मुळींच पत्ता नाहीं असें पाहून सर्व फौज आपआपल्या पूर्व स्थळीं जाऊन दा- खल झाली. याप्रमाणें या बंडाचा मागमूस लवकरच ना- हींसा झाला.

२१. **विसाजीपंत** गोखले ह्मणून **बापूचे** भाऊबंदां- पैकीं एक असून ते प्रथम गरीबीमुळें **बापूचे** आश्रयास जाऊन राहिले. **बापूंनीं** आपल्या कुळांतील समजून पंक्तीस भोजन व पागेंतील घोड्यांवर बसण्याची परवानगी दिली. पुढें त्यांची गरीबवृत्ति पाहून त्यांस वाढवावें असा विचार करून पालखी अबदागीर देऊन शंभर घोड्यांची पागा नगारा निशाणासह दिली, व त्याबरोबर सरदार हें पदही दिलें. पुढें लढाईचें किंवा दुसरें कांहीं काम आल्यास ज्यास्त लोक बरोबर देऊन कामगिरीवर पाठवीत जावें; अशी नेहेमीं वहिवाट चालत असे. एके वेळीं **बापूसाहेब** गोखले यांनीं **विसाजीपंत** यांजबरोबर कांहीं फौज देऊन खंडणीचा पैसा वसूल करण्याकरितां पाठविलें. तो तिकडे न जातां श्रीमंतांकडे येऊन **बापू**साहेबांविषयीं भलत्याच गोष्टी सांगूं लागला. तो श्रीमंतांपाशीं असें

सांगूं लागला कीं, '**बापूं**चा इमानीपणा पेशजीप्रमाणें नाहीं. श्रीमंतांचा ते आतां हुकूम मानणार नाहींत इतकेंच नाहीं, तर त्यांस कांहीं आज्ञा झाल्यास ते युद्धासही तयार होतील! इतके बेपर्वा झाले आहेत.' या वेळेस **बापूं**ची स्वारी म्हैसूर येथें होती. त्यांस श्रीमंतांनीं पुण्यास येण्याविषयीं आज्ञापत्र लिहिलें. **बाजीराव** हे किती निश्चयाचे होते हें पुढील त्यांच्या वागणुकीवरून वाचकांचे चांगलें लक्षांत येईल. या ठिकाणीं तर तीन मनुष्यांची परीक्षाच होण्यासारखी आहे. एक **विसाजीपंत** चहाड झाले त्यांची योग्यता; दुसरे **बाजीराव** हलक्या कानांचे त्यांची योग्यता; तिसरें **बापू** गोखले यांचें एकनिष्ठ वर्तन असाव्याचें त्यांची योग्यता; हें सर्व पूर्ण कळण्यासारखें आहे. आजपर्यंत साधु ह्मणविणाऱ्यांच्या चरित्रांतून तरी हेंच असायाचें कीं, त्यांचा दुष्टांनीं छळ करावा व त्यांणीं अशा दुर्धर प्रसंगींही आपली नीति न सोडतां प्रसंगास योग्य तेंच आचरण करावें. असो. ज्या वेळीं बापू गोखले यांस श्रीमंतांचा हुकूम पुण्यास येण्याविषयींचा पोंचला, त्या वेळीं स्वारीचा खर्च चालण्याजोगा जवळ द्रव्याचा संचय नव्हता. ह्मणून हुकुमाप्रमाणें निघण्यास कांहीं अवकाश लागला. त्यावरून हलक्या मनाच्या **बाजीरावास बापूं**विषयीं लागलाच संशय आला. इतका संशय येण्याचें कारण असें कीं, प्रतिनिधीकडील मुलुख **बापूंनीं** आपल्याकडे व्यवस्था करण्यास घेतला होता, व प्रतिनिधीचें बंड मोडलें, त्यांत पुष्कळ पैशाचा खर्च **बापूं**चे हातानें झाला व मुलुखही कबजांत राहिला ह्मणून संशयास जागा झाली. थोडकेच दिवसांनीं श्रीमंतांची स्वारी क्षेत्र वांई येथें आली,

तेव्हां **बापू** लागलेच सडे स्वारीनें फक्त दोन हजार स्वार बरोबर घेऊन वांईस श्रीमंतांच्या दर्शनासाठीं आले. सरकारची भेट घेतल्यावर आज्ञा झाली कीं, स्वारीबरोबर पुण्यास चलावें. **बापूंनीं** आज्ञा मान्य करून तशाच सड्या थाटानें पुण्यास आले. पुढें **विसाजीपंतांच्या** सांगण्यावरून प्रतिनिधीकडील सत्तावीस किल्ल्यांची सोडचिठ्ठी देण्याविषयीं **बाजीराव** साहेबांनीं निरोप पाठविला. पूर्वी प्रतिनिधीला बुडविलें असा जनापवाद न यावा ह्मणून सर्व प्रांत **बापूंचेच** कबजांत श्रीमंतांनीं हा काळपर्यंत ठेविला होता, पण या वेळीं **बाजीराव**साहेबांनीं अशी उलट घेतली. **बापूंनीं** केलेल्या श्रमांकडे तरी कांहीं पाहावयाचें होतें; परंतु या वेळीं त्यांस सर्वच अपहार करण्याची बुद्धि झाली! हेंच काय? यासारखे शेंकडो अपहार **बाजीराव**साहेबांनीं त्या वेळीं केले. 'त्यांस परम प्रिय असें संपूर्ण जहागीरदार यांचा सूड उगवावयाविषयीं त्याचे मनांत होतें तें कृत्य यथास्थित साधावयास उद्युक्त झाला, तेव्हां कित्येक लहान लहान जहागीरदार यांहीं आपली आज्ञा न मानिली असें निमित्त ठेवून, त्यांचीं स्थानें आपल्याकडे जप्त ठेविलीं. याप्रमाणें सर्वांस बुडवावयाची त्यांस वासना झाली, परंतु तें इंग्लिशांच्या मतावांचून घडेना; असें असतांही तो आपल्या मनांतील अर्थ अनेक प्रकारें गोड बोलून लोकांस फसवून कधीं कधीं शेवटास नेत असे. त्यांत **माधवराव** रास्ते यांस इंग्लिशांनीं आपल्या कांहीं कामाकरितां फौज पाठवावी ह्मणून आज्ञा केली, ती त्याणें मानिली नाहीं; त्या योगें तो अपराधीसा ठरून, त्यास शिक्षा व्हावी, असें झालें असतां

**बाजीरावां**नीं त्यांस मसलत दिली कीं, इंग्लिशांस सांगून तुमचें पारिपत्य करणें आह्माकडे येऊं द्या, ह्मणजे तुह्माला तसा दंड होणार नाहीं; या गोष्टीस तो **माधवराव** मान्य झाला, नंतर **बाजीरावां**नीं त्याचा सर्व मुलूख घेऊन त्यांस कांहीं उरूं दिलें नाहीं, असेंच अप्पा देसाई यांस इंग्लिशांनीं कांहीं आज्ञा केली असतां त्यांत अंतर करावयाविषयीं **बाजीराव**साहेबांनीं त्यास गुप्त मसलत दिली आणि त्याचेंही पारिपत्य करावयाचें आपल्याकडे घेऊन त्याचे जहागिरीचा चतुर्थांश घेतला. असा राज्य निर्बळ करण्याचा प्रघात यांचा यांनीं सुरू केला! याबद्दल विशेष विस्तार पाहणें असेल तर बखरींत पाहावा. असो. श्रीमंतांस वाटलें होतें कीं, आपल्या निरोपाप्रमाणें **बापू** सोडचिठ्ठी देण्यास अनमान करतील; परंतु **बापूं**नीं निरोप कानीं पडतांच सत्तावीस किल्ल्यांच्या व प्रतिनिधीकडील सर्व महालांच्या सोडचिठ्या लिहून पेशव्यांकडे पाठवून दिल्या. हें पाहून **बाजीराव** साहेबांचा सर्व भ्रम जाऊन **विसाजीपंतां**चा पूर्ण खोटेपणा दृष्टिगोचर झाला. हा भोळा सांभाचा अवतार राजा याची कोणत्याच गोष्टीची पूर्ण शाश्वती नव्हती, ह्मणून वर सांगण्यांत आलेंच आहे. हा एकदां देऊं लागला ह्मणजे दातृत्वाविषयीं प्रतिकर्णाचा अवतार बनून जाई! **बापू** हे इमानी चाकर असून शूर आहेत, व आज्ञा मान्य करण्यास काडीइतका देखील अवकाश करीत नाहींत, असें मनांत आणून त्यांजला सरंजामाची नेमणूक करून द्यावी, असें श्रीमंतांस वाटलें. मग श्रीमंतांचे मर्जीचा कल पाहून **बापूं**नींही कांहीं तरी जहागीर मिळावी अशी विनंति केली. पेशव्यांनीं सव्वातेरा

लाख रुपयांची जहागीर मुक्रर करून देऊन, स्वार आणि पायदळ मिळून पांच हजार फौज नेहमीं जवळ बाळगण्याची आज्ञा झाली. जहागिरीचा मुलूख कांहीं कर्नाटकांत व कांहीं दक्षिणेंत दिला. या पांच हजार फौजेशिवाय अधिक जर फौज ठेवणें झालें तर मुशाहिऱ्याचा ऐवज निराळा सरकारांतून मिळत जाईल. याप्रमाणें व्यवस्था करून बापूस पुण्यास आपले जवळ राहण्याविषयीं सांगितलें. अशा प्रकारें बापू गोखले हे मुख्य सेनापतीपद पावले.

२२. या **बाजीराव**साहेबांचे कारकीर्दीपूर्वी इंग्रेज लोकांचें वजन पुण्याचे दरबारीं फारसें नसे. बेटावर एक इंग्रजांचा वकील राहात होता, पण त्याची पुसतपास कोणीच करीत नसे. पेशव्यांपुढें जाण्याचा प्रसंग वकिलास कधीं आलाच तर दोन्ही हात जोडून जावें लागत असे.

इंग्रेजांचा कावा **नाना** फडनवीस यांस बराच समजला होता. **राघोबा दादा** यांचा ओढा इंग्रजांकडे फार होता, व त्याप्रमाणेंच **बाजीराव** साहेबांचाही होईल, हें भविष्य जाणून **राघोबा दादा** व तसेंच त्यांचा पुत्र **बाजीराव** या उभयतांचा पाय राज्यांत न शिरावा ह्मणून **नाना** फडनविसांचा दीर्घ प्रयत्न चालू होता. त्या प्रयत्नाप्रमाणें **राघोबा दादा**चा पाय तर पुण्यास लागूं दिलाच नाहीं. आणि **बाजीरावा**स राज्यावर बसूं न देतां **सवाई माधवरावा**चे स्त्रीचे मांडीवर दत्तक देऊन त्यास गादीवर बसवावें ह्मणून भगीरथ प्रयत्न केले, पण ते सफळ न होतां **बाजीराव** साहेब राज्यावर बसले. **राघोबा दादां**नीं इंग्रजांस राज्यांत हिस्सा देण्याचें लिहून दिलें होतें तरी

तें रद्द होऊन **राघोबा दादा**ची इच्छा पूर्ण झाली नाहीं. पण **नाना** फडनविसाच्या भविष्याप्रमाणें **बाजीराव** साहेब गादीवर असतांच इंग्रजांचा हात पेशव्यांचे राज्यांत शिरला! **नाना** फडनविसांनीं हें भविष्य कोणते धोरणावरून केलें असेल तें करोत. त्यांनीं त्या वेळच्या इंग्रजांचे वर्तनावरून अजमास बांधला असेलसें वाटतें. म्हणजे कंपनीचे नौकर अगांतुकाप्रमाणें टपलेले असून कांहीं राज्यप्रकरणीं खलबत होऊं लागलें कीं, हे आपले तींत पडलेच! असो. **बाजीराव**साहेबांची व इंग्रेजांची प्रथम दोस्ती होती. ती पुढें फारच वाढली. ती इतकी कीं, इंग्रेजांनीं पेशव्यास नेहमीं साह्य करावें. त्याप्रमाणें इंग्रेजांचीं कांहीं पलटणेंही छावणी देऊन पुण्यास राहिलीं होतीं. पुढें तर **बाजीराव** साहेबांस तें बांधल्यासारखें वाटूं लागून त्यांस इंग्रेजांची दोस्ती राखवेना असें झालें. या अशाश्वत महाराजांनीं आपली फौज वाढवून सर्व इंग्रजांस आपले राज्यांतून हुसकून देण्याचा बेत केला. **बापू** गोखले यांस आणखी पांच हजार फौज अधिक ठेवण्यास सांगितलें. तसेंच विंचुरकर, पुरंदरे, आपटे, त्रिंबकजी डेंगळे यांसही आपली फौज वाढविण्यास सांगितलें. पुढें कांहीं दिवसांनीं गायकवाडांचे दिवाण **गंगाधर**शास्त्री हे इंग्रज सरकारचे बहादरीनें पुण्यास आले होते. त्यांचा वध **बाजीराव** साहेबांनीं करविला. त्यांच्या पूर्वी **बाजीरावां**ची अस्थिर बुद्धि कां झाली हें प्रकरण थोडेंसें सांगून पुढें तो वृत्तांत लिहूं.

**यशवंतराव** होळकरांचा भाऊ **विठोजी** होळकर यांस **बाजीराव** साहेबांनीं हत्तीच्या पायीं बांधून त्याचा

क्रूरपणें वध करविला; आणि तो वधाचा प्रकार थोरल्या वाड्यांतील खिडकींत वसून आपला मित्र **बाळूजी** कुंज यासह मोठ्या आनंदानें पाहत राहिले होते. ही गोष्ट होळकरास परम दुःसह झाली. **विठोजी**चा बाप **तुकोजी** होळकर याचा व **नाना** फडनविसाचा परम स्नेह होता त्याचा डाव मनांत धरून **बाजीरावां**नीं ही गोष्ट केली कीं काय कोण जाणे! असो. यावरून **यशवंतराव** होळकरानें पुण्यावर येण्याचा रोख धरिला. हा **यशवंतराव** परम शूर होता. त्याचीं शूरत्वाचीं सर्वच कृत्यें सांगण्यास येथें स्थळ नाहीं; परंतु इतकेंच सांगतों कीं, त्यानें पुण्यास येऊन पेशव्यांच्या सेनेशीं युद्ध केल्याबरोबर **बाजीराव** साहेब हे +++ शेंपूट घालून सिंहगडावर पळून गेले! सिंहगडीं धीर निघेना ह्मणून रायगडीं गेले. तेथें पूर्वी या चरित्रांत सांगितलेले **माधवराव** रास्ते यांस ठेविलें होतें त्यांस सोडून त्यांचे जहागिरीचा पूर्ण अधिकार देऊन नवी फौज जमविण्यास त्यांस हुकूम दिला. तेथून पेशवे महाडास जाऊन पुढें वसईस गेले.

वसईस गेल्यावर **बाजीराव**साहेबांनीं पेशवाई बुडविण्याजोगा इंग्लिश लोकांशीं तह केला. इंग्लिश लोकांचीं पलटणें पुण्यास राहूं देण्याविषयीं पहिला ठराव वसईसच झाला. त्या ठरावाप्रमाणें आज दिवसपर्यंत इंग्लिशांचीं पुष्कळ गोरीं पलटणें पुण्याच्या बंदोबस्ताकरितां गारपिरावर व खडकीवर आहेत. पण पूर्वीच्यांत फरक इतकाच झाला आहे कीं, ज्या पेशव्यांच्या वाड्यांतील संपत्तीस हें रक्षण ठेविलें होतें, त्या वाड्यांतील धनसंपत्ति सर्व लयास जाऊन तेथील दरवाज्यावरील दिवाणखान्यांत

हल्लीं सर्व्हे दप्तरांचा खजिना मात्र राखून ठेविला आहे, बाकीचा तर सर्व वाडा उद्ध्वस्त झाला आहे. असो. वसई येथें फारच वाईट असा तह बाजीराव साहेबांनीं केला. त्यास त्यांच्या मांडलिक राजांतून कोणीच मान्य नव्हते. शिंदे आणि भोसले यांनीं तर या त्रासामुळें इंग्लिश लोकांचा द्वेष करून आपलें नुकसान करून घेतलें. तो साराच प्रकार येथें सांगवत नाहीं. पण शेवटीं इतकें मात्र सांगतों कीं, खुद्द बाजीरावसा-

---

१ वसईचा तह सन १८०२ च्या डिसेंबर महिन्याच्या एकतिसावे तारखेस झाला. त्यांत कलमबंदी अशी ठरली होती कीं, इंग्लिशांचे सहा हजार पलटणी लोक व त्या बेताप्रमाणें तोफखाना, व तोफखान्यावरील गोलंदाज, इतकें पेशव्यांचे राज्यांत असावें, असें ठरलें. त्यांतून दोन हजार लोक तर नेहेमीं पेशव्यांजवळच असावे आणि पेशव्यांचे दहा हजार स्वार व सहा हजार पायदळ प्रसंग पडल्यास उपयोगीं असावें. विलायतेंत कोणे एके मुलखीं इंग्लिशांचे द्वेष्टे राहतात तेथील कोणीही पेशव्यानें आपल्या चाकरीस ठेवूं नये. इंग्लिशांचे लष्करी खर्चास बाजीरावानें विसा लक्षांचा मुलूख द्यावा, आणि पूर्वीं सुरतेंत पेशवे आपला कांहीं हक्क इंग्लिशांपासून घेत होते तो न घ्यावा. याशिवाय निजाम आणि गाइकवाड यांजपासून बाकीबद्दल ऐवज पेशव्यांस घेणें तो इंग्लिशांचे द्वारें घ्यावा. निजाम याजबरोबर महाडास तह ठरला होता तो आणि आनंदराव गायकवाडाशीं त्या वेळापूर्वीं थोडेच दिवस आधीं इंग्लिशांनीं तह केला होता तो या दोहींस पेशव्यांनीं कबूल असावें असें ठरलें; आणि पेशव्यास दुसरे कोणाशीं तह करणें असल्यास इंग्लिशांचे मसलतीवांचून करूं नये; इतकीं कलमें ठरलीं!

हा तह झाला तेव्हांच पेशवाई तगण्यास मार्ग उरला नाहीं असें सर्व लोक म्हणूं लागले.

हेत्र हेच इंग्लिशांचा आंतून द्वेष करूं लागले. पुढें तो द्वे षाचा प्रकार कोठपावेतों वाढला हें मागें सांगितलेंच आहे ह्मणजे आपल्या सर्व सरदारांच्या सेना सिद्ध करून एकद इंग्लिशांचा नक्षा उतरावयाचा, असा बेत झाला. आत पुढें **बाजीराव**साहेबांची थोडकीशी वागणूक सांगून नं तर **गंगाधरशास्त्री** यांच्या मृत्युविषयीं प्रकार सांगण्यांत येईल.

वसईचा तह झाल्यावर इंग्लिशांस पूर्ण जोर यावा तसा येऊन त्यांनीं पुष्कळ लढाया मारल्या. त्या सर्व येथें सांग- ण्याचें कारण नाहीं. त्या लढाया कोणकोणाशीं झाल्या हें मात्र सांगतों. वसईच्या तहापूर्वी या महाराष्ट्र देशांत ते तेलंग भटाप्रमाणेंच नेटिव राजांच्या दारोदार हिंडत अ- सत. तो तह झाल्यावर लागलेच 'भटाला दिली ओसरी आणि तो हळू हळू पाय पसरी' या ह्मणीप्रमाणें त्यांनीं संपूर्ण घराचीच मालकी आपल्याकडे करून घेण्याची यो- जना केली! **नाना** फडनविसाचें भविष्य सत्य झालें कीं 'बोट शिरल्यावर हात शिरविण्यास ते उशीर करणार ना- हींत.' त्याप्रमाणें त्यांनीं लागलेंच शिंदे आणि भोसले[1] यांशीं युद्ध आरंभिलें. इंग्लिश लोकांची चढती पायरी करण्याचा ईश्वरानें समय तोच आणला होता ह्मणून त्या वेळीं भले शूर योद्धे कंपनीचे लष्करांत दोन चाकरीस रा- हिले होते. यांनींच काय त्या उत्कृष्ट लढाया मारून जय

१ मारिसकृत हिंदुस्थानच्या इतिहासांत भोंसल्यांस वऱ्हाडचा राजा असें जागजागीं म्हटलें आहे. पण ही इतिहासकाराची चूक आहे, कारण भोंसल्यानीं आपल्यास 'राजा' असें कधींच म्हणवून घेतलें नव्हतें.

मिळविले. लार्ड क्लाइव्हची योग्यता जितकी इंग्लिश लोक मानतात तितकीच वास्तविक या दोघांची मानावी असें आमचें मत आहे. लार्ड क्लाइव्ह हिंदुस्थानांतील राज्याचा स्थापक खरा, परंतु वरील वेळेस हे दोघे टोपीवाले या देशांत आले नसते तर इकडे त्यांचा येवढा पगडा पडून शूरत्वाचा नांवलौकिक झाला नसता. खरोखर या दोन साहेबांनीं जितके लढण्याचे प्रसंग या देशांत भोगले आहेत तितके दुसरे कोणचेच इंग्रजानें भोगले नसतील. या वेळच्या त्यांच्या श्रमामुळें आज सर्व इंग्लंड देश संपत्तिमान् होऊन सौख्यसमुद्रांत पोहत आहे! असे ते दोन योद्धे कोण हें जाणण्याची जिज्ञासा आमचे वाचकांस प्राप्त झाली असेल. या दोघांचे दुसरे दोन जोडीदार मुत्सद्दी साहेब त्याच समयीं इकडे आले होते त्यांचींही नांवें कळवितों. ते मुत्सद्दी तर परम चतुर, गुणपरीक्षक आणि हुषार होते. त्यांची स्तुति जितकी करावी तितकी थोडीच. असो. प्रथम जे योद्धे सांगितले ते कोण ह्मणाल तर, जनरल लेक साहेब आणि दुसरे जनरल वेलस्ली साहेब. यांपैकीं

---

१ सन १७९७ त अर्थर वेलस्ली यांस तेहतिसावे पलटणचे कर्नलची पदवी देऊन विलायत सरकारानें हिंदुस्थानांत पाठविलें. ज्या वेळीं ही स्वारी हिंदुस्थानांत आली त्या वेळीं हिंदुस्थानांत इंग्लिशांची अनिष्ट स्थिति होती; कारण त्या वेळचे गव्हरनर जनरल सर जान शोअर जे पुढें विख्यात मुत्सद्दी होऊन लार्ड टेनमौथ किताब मिळविते झाले. त्यांची बुद्धि स्वस्थता राखण्याकडे विशेष होती. त्यांत कितीही नुकसान व मानहानी झाली तरी चिंता नाहीं असा त्यांचा मनोदय होता! पण अशा तऱ्हेचें वर्तन हा ते वेळीं अपायकारक झालें. कारण त्यांच्या पूर्वीं बदललेले गव्हरनर जनरल यांनीं हैसूरचा मान हीन केला होता. (टिपूस इंग्लिश लोक वाघ ह्मणत असत.

पहिल्या साहेबांनीं दिल्ली, आग्रा, आलीघर, लासवारी येथें मोठाल्या लढाया मारल्या. ह्या लेक साहेबांच्या सर्व लढाया हिंदुस्थानच्या इतिहासांत फार शान वर्णन केल्या आहेत. पुढें भरतपुरचा अतिशय मजबूत किल्लाही यांनींच घेतला. तो घेण्याचें कारण असें कीं, तेथील राजा होळकरास अनुकूल होता. शेवटीं तर होळकरास या साहेबांनीं सर्व हिंदुस्थानभर पिटाळलें! याप्रमाणें शिंदे आणि भोसले तसेच

कारण ते त्याच्या आचरणास फार भीत असत. तो इंग्लिशांस भारी तुच्छ मानीत असे. तो इंग्रेजांचा वध तर मौजेदाखल करी. इंग्रेजांस व्यापारी कसबावरून तो 'वाणगट' ह्मणून ह्मणत असे.) या वाघासारखा इंग्लिशांचा द्वेष्टा कोणीच नव्हता. युरोपियनास जणु मारून टाकतो आहे, असा एक वाघाचा पुतळा त्यानें करून ठेविला होता. नेपोलियन बोनापार्टनें इंग्लिशांस घालवून देण्यास मदत करूं ह्मणून मिसर देशांतून त्यास पत्र सुद्धां पाठविलें होतें. असो. असा जबर शत्रु नाहींसा करण्यास इंग्लिशांस थोडे श्रम पडले असें नाहीं. त्याचें शहर श्रीरंगपट्टण घेण्याचें यश लार्ड हारीस साहेबांस आलें. व टिपूचे नाशाचें सर्व यश वर सांगितलेल माजी गवरनर जनरल लार्ड कार्नवालीस यांस आलें. या युद्धांत हे कर्नल वेलस्ली शेवटचे प्रसंगीं होते ह्मणून त्यांसही सर जान शोअरची थंड राज्यपद्धति आवडेना; कारण त्यांस ठाऊक होतें कीं, ही वेळ स्वस्थ बसण्याची नसून आणीबाणीची आहे. वेलस्ली साहेबांचे मनोदयाप्रमाणें गोष्ट घडून येण्यासाठीं सन १७९८ त सर जान शोअरच्या जागीं मार्किस वेलस्ली यांची गवरनर जनरलचे जागीं नेमणूक दैवानें करविली. यांसच लार्ड मॉर्निंगटन असें म्हणत असत. हे वरील आर्थर वेलस्लीचे ज्येष्ठ बंधु होत. हे मोठे हुषार असून विद्वान् आणि कवि होते. व त्याचप्रमाणें सरकारी [illegible] कामांत दक्ष होते. ईश्वरानें हा सर्व योगायोग एकदांचा जमून आणला! पुढें सन १७९९ त टिपू अजिबात नाहींसा करण्याचें यश यांनींच मिळविलें!

तिसरे होळकर यांस आपल्या सेनेच्या बलाविषयीं जो गर्व झाला होता तो समूळ नाहींसा करून तसेच ते मदोन्मत्त आळशी अनीतिप्रवर्तक झाले होते त्याबद्दल त्यांस यथायोग्य शासन केलें ! दुसरे **वेलस्ली** साहेब यांविषयीं तर दोन शब्द आह्मीं पूर्वीं लिहिलेच आहेत. **लेक** साहेब जसे या देशांतून लार्डाची पदवी मिळवून उत्साहानें परत गेले तसेच **वेलस्ली** साहेबही पुष्कळ नांवालौकिकास चढून स्वदेशीं गेले. श्रीरंगपट्टणाजवळ यांचे नांवचा एक पूल बांधला आहे. त्याचें कारण हें कीं, श्रीरंगपट्टण शहर घेण्याचे वेळीं कर्नल **बेयर्द** साहेबांस यांनीं पुष्कळ मदत केली होती. व **टिपूचें** राज्य काबीज केल्यावर तेथें सर्व प्रकारची स्वस्थता राखण्यास हे साहेबच उपयोगी पडले; मूळ त्यांचे अभ्युदयास प्रारंभ येथूनच झाला. म्हैसूर व हैदराबाद इकडील प्रांतांतूनच हे **लेक** साहेबांचे मदतीस गेले. हिंदुस्थानांत असतां आंसई, आरगांव, अहमदनगर येथें यांनीं मोठाले जय मिळविले. नंतर पुढें युरोपांत गेल्यावर यांनीं जी शिपाईगिरी गाजविली तशी तर कोणीच गाजविली नसेल ! असो. या दोघां साहेबांनीं शिंदे, होळकर आणि भोंसले यांशीं लढाया करून आपल्यास

---

१ हे दोघे बंधु वेलस्ली सन १८०५ मध्यें विलायतेंत निघून गेले. तेथें वडील बंधूनें मोठाल्या सरकारी हुद्दयाच्या कामगिऱ्या बजावून लौकिक मिळविला. धाकटे बंधु जे आर्थर वेलस्ली यांनीं नेपोलियन बोनापार्टेशीं युद्ध करून त्याचा अगदींच अपजय केला. सर्व इंग्लंडास या याच्या यशामुळें आनंद होऊन त्यांचा फारच आदर सत्कार झाला. सरकारानेंही त्यांस मोठाल्या देणग्या व पदव्या दिल्या. शेवटीं वेलिंगटनचे ड्यूक अशी पदवी देऊन दरसाल दोन हजार

पाहिजे तसें त्यांस वळविलें. दुसरे साहेब **टिपू**चे मुलखांतून गुजराथेंत गेले हें मागें सांगितलेंच आहे. पहिले **लेक** साहेब पूर्वीं अयोध्या प्रांतांत होते तेथून शिंद्याचे सेनेवर प्रथम त्यांस पाठविलें. त्यांच्या बरोबरचे लष्करी लोकही इतके निपुण व हुशार होते कीं, त्यांनीं मनांत येईल तेथें जय मिळावा !

आतां त्या वेळीं दुसरे मुत्सदी दोघे साहेब येथें जे होते त्यांजविषयीं मात्र कांहीं कळविणें राहिलें आहे. पहिला शिंद्याचे दरबारीं वकील झाला होता तो व दुसरा भोंसल्याचे दरबारीं वकील होता तो. शिंदे व होळकर या दोघांशीं लढाया करून जें तह करण्याचें काम राहिलें होतें तें पहिल्यानें शेवटास नेलें. तसेंच पेशव्यांस नेमणूक ठरवून ब्रह्मवर्ती पाठविलें त्यांत पण पहिलाच होता. आतां हे आमच्या वाचकांस सहजच आठवेल, तें कोणतें ह्मणाल तर सर जान् **मालकम्** व दुसरे मुत्सदी ह्मटले तर **एल्फिन्स्टन्** साहेब. हीं दोन्ही नांवें इकडील आबालवृद्धांस माहीत आहेतच. या दोघांनीं एतद्देशीय लोकांशीं फारच

---

पाउन्डांची नेमणूक करून दिली. सन १८५२ मध्यें हे मृत्यु पावले तेव्हां मोठ्या सन्मानानें यांचें सेंटपालचे देवळांत शव नेऊन पुरलें ! हे बापू गोखले यांचे परम स्नेही होते. पुढें म्हणजे सन १८१७ त जर ते हिंदुस्थानांत असते तर पेशवाई डगमगण्याची भीति नव्हती !

हे परत गेले तरी सर जान मालकम आणि एल्फिन्स्टन हे मुत्सद्दी साहेब इकडे बहुत दिवस राहिलेच होते. पुढें पेशव्यांशीं युद्ध झालें ते वेळीं तर हे दोघे मुत्सद्दी प्रमुख होते. यांच्याप्रमाणें थोर मनाचे पुरुष आतां फारसे इंग्लंडाहून इकडे येत नाहींत ही दुर्भाग्याची गोष्ट आहे.

प्रीतीचें वर्तन ठेविलें होतें, तें इतकें कीं, त्यांचा वियोग इकडील लोकांस फारच दुःसह झाला.

इंग्रेज लोक हिंदुस्थानांत आले होते, व त्यांत कंपनीकडून विशेष मोकळीकही कधींच मिळत नसे. त्या सर्व दैना यांच्या नाहींशा होऊन त्या लोकांच्या मुखावर राजतेज चमकूं लागलें! ही सर्व उलटापालट होण्यास या वरील चौघां साहेबांचा प्रताप कारण होय. आजला सर्व जगांत इंग्लंडाचा जो येवढा डंका वाजत आहे तो हिंदुस्थानाचे प्रभुत्वामुळें; व तें प्रभुत्व हातीं चढण्यास तरी या साहेबांनींच विलक्षण परिश्रम केले. सर्वांहून अधिक वर्णनीय असे प्रयत्न करण्याचें काम यांच्याच हातून शेवटास गेलें, ह्मणून त्यांस आह्मी आपल्या या चिमकुल्या पुस्तकांत थोडेसें स्थल दिलें आहे; त्याबद्दल वाचक आनंद पावतील अशी आशा करितों.

वसईच्या तहानंतर **बाजीराव**साहेबांस इंग्लिश लोकांनीं पुण्याचे गादीवर नेऊन बसविलें. पुढें त्यांनीं जी वागणूक सुरू केली तिचा प्रकार नुकता प्रतिनिधीचे बंडाचे प्रकरणांत थोडासा निवेदन केला आहे. त्याहून विशेष कांहीं येथें सांगणें आहे; तें असें:—लहान मोठ्या सरदारांच्या जहागिरी जप्त करून आपली थैली भरण्याकडे यांणीं बकध्यान लावलें. त्यांत जितके डाव पेंच साधतील तितके साधण्यांत यांनीं कसर केली नाहीं. **बाजीराव**साहेबांचा मूळचा कुटिल स्वभाव असून त्यांत रूपाचा सुंदरपणा, वक्तृत्व, कावेबाजपणा हे गुण त्यांस अनुकूल असे झाले. उत्कृष्ट मुत्सद्याचे डावपेंच या पेशव्यांचे ठिकाणीं होते. या गुणाचा चांगल्या कामांत उपयोग झाला असता तर त्याच्या पूर्वजांहून त्याची कीर्ति अधिक उज्ज्वल झाली

असती. पण तसें कांहींच न होतां 'अग्नीचा उपयोग घरें जाळणें,' 'पाण्याचा उपयोग माणसें बुडविणें' यासारखें झालें. **बाजीरावाचा** देखणेपणा, मोहक भाषण, इत्यादीचें वर्णन मराठ्यांच्या बखरींत यथास्थित केलें आहे. असो. त्यांनीं कुटिलवृत्तीचे प्रयोग कसकसे केले हे यथास्थित सांगण्याचें हें स्थळ नाहीं; तरी **माधवराव** रास्त्यांची जहागीर जप्त कशी केली, प्रतिनिधीचे प्रांत आपल्याकडे कसे घेतले, तें वर सांगण्यांत आलेंच आहे. याखेरीज पटवर्धनांची जहागीर तोंडांत टाकण्याचा विचार केला. तें असें कीं, जनरल **वेलस्ली** साहेबांबरोबर पटवर्धन आपल्या सेनेसहित लढाईस जात असतां त्यांस गुपचिप तिकडे न जाण्याची मसलत दिली. यांत दोन हेतु सिद्धीस नेले; एक असा कीं, पटवर्धनांस इंग्लिशांबरोबर जाऊं दिलें नाहीं ही गोष्ट इंग्लिशांचे शत्रु शिंदे यांनीं ऐकून सुप्रसन्न व्हावें; दुसरा असा कीं, इंग्लिशांस पटवर्धन अनुकूल नाहींत असें दाखवून त्यांचे विचारें पटवर्धनांची जहागीर घशांत टाकावी! असें वर्तन हाताखालचे मंडळींशीं चालू ठेऊन, वळावलेल्या इंग्लिशांचा आंतून द्वेष करणें सिद्धीस कसें जाईल! राज्यसंबंधी मसलतींत कोणाचाच विचार यांस मान्य नसे, व कोणावर विश्वासही हे ठेवीत नसत, त्यामुळें सर्व कामें यांस स्वतः वहिवाटावीं लागत अगत. **खंडेराव** रास्त्यानें यांस आपत्तिकाळींही अंतर दिलें नाहीं, असें असून माणकेश्वराशीं त्यांचा कांहीं वाद झाला येवढ्यावरूनच त्यांची जहागीर जप्त केली! बहुत सेवा केलेले असें जुने आश्रित यांची हेलना आरंभिली! व त्यांस अन्नास मोताद केलें.

वसईचा तह होऊन त्यावर सही झाली नाहीं तोंच **बाळोजी कुंजर** आणि **नारायणराव** वैद्य या उभयतांस शिंदे आणि भोंसले यांजकडे पाठविलें. त्यांत उघड दाखविण्यांत असें दाखविलें कीं, इंग्लिशांचा व आमचा तह झाला तो प्रकार कळविण्यासाठीं त्यांस तिकडे पाठविलें. पण खरा उद्देश असा होता कीं, आमच्यावर अतिशय त्रिकट प्रसंग आल्यामुळें तह करणें प्राप्त झालें. आतां तुह्मी येऊन इंग्लिशांस आमच्या राज्यांतून घालवून द्या. आरंभींच हा इकडे असा उद्योग करून त्यांचें युद्ध चालू होईल असें केलें, परंतु त्या युद्धांत शिंदे आणि भोंसले अपजय पावून इंग्रेजांशीं तह करते झाले. हा सुमार पाहून **बाजीराव**साहेबांनीं स्वतः आपला खजिना भरण्यास प्रारंभ केला ! पांच कोटी रुपये शिलक झाल्यावर वर सांगितल्याप्रमाणें फौज पाठविण्याविषयीं आपले लोकांस ताकीद दिली. सन १८१४ त **त्रिंबकजी**चे द्वारें शिंदे आणि भोंसले यांशीं इंग्लिशांस घालवून देण्याविषयीं गुप्त तह करविले. हा त्रिंबकजी डेंगळा पूर्वी बाजीराव साहेब सन १८०२ मध्यें महाडास पळून गेले, ते वेळीं जासुदगिरीचें काम करीत होता. पुढें कर्नाटकचा सुभा सांगून त्यास फारच वाढविलें, तें इतकें कीं, प्रत्येक मसलतींत त्याचें अनुकूल मत पडल्यावांचून मसलतच शेवटास जात नसे ! पुढें **गंगाधरशास्त्री** पटवर्धन गायकवाड सरकाराकडून वकिली करण्याकरितां **बाजीराव**साहेबांकडे आले असतां त्यांस श्रीपंढरपुर येथें मारेकऱ्यांनीं ठार मारिलें. तो ठार मारण्याचा आरोप **त्रिंबकजी**वर आल्यामुळें त्यास प्रथम इंग्रेजांनीं पकडून ठा-

त्याच्या किल्ल्यांत टाकिलें, तेथून **त्रिंबकजी** वेष पालटून पळाला तो संगमनेराकडे गेला. संगमनेराजवळ निंबगांवजाळी ह्मणून जें गांव आहे तेंच **त्रिंबकजी**चें मूळ गांव होय. पळून गेल्यावर संगमनेर आणि सिन्नर या महालांतील भिल्ल जमवून खानदेशांत जाऊन राहिला. खानदेशांतील पहाडांत पुष्कळ दिवस **त्रिंबकजी** फिरत होता, पण शेवटीं इंग्रजांनीं पुनः त्यास पकडून जन्मभर चुनारगडांत (चांडाळगडांत) नेऊन टाकिलें. ही गोष्ट सन १८१७ त झाली.

**बाजीरावा**चे कारकिर्दीत राज्य बेबंद होऊन कोणी कोणाचें ऐकेनासें झालें. होळकराचे दंग्यांत खानदेशासारखा मोठा समृद्ध देश उजाड पडून तेथील संपत्ति विलयास गेली. पुढें पेंढारही फार मातलें. पेंढाऱ्यांचे पारपत्यासाठीं इंग्रेजांचीं पुष्कळ पलटणें जमलीं. या सुमारास मुंबईस गवरनर **डंकीन** साहेब असून पुण्यास **एल्फिन्स्टन** साहेब रेसिडेंट होते. पुण्याचे दरबारची मसलत **एल्फिन्स्टन** साहेबांनींच चांगल्या प्रकारें पार पाडली ह्मणून त्यांसच पुढें मुंबईचे गवरनर **डंकीन** साहेबांचे मागून नेमिलें. पुण्याचे रेसिडेंटास हुकूम कलकत्याचा होता. असो. सन १८१७ त **बाजीराव** साहेब पंढरपुरास गेले ते वेळीं **गंगाधर** शास्त्री यांचा खून झाला! पुढें **बाजीराव** कृष्णातीरीं माहुलीस आले. त्या वेळीं त्रिंबकजी आंतून **बाजीरावास** फौजेची मदत करीत असे. त्याचप्रमाणें दुसरेही कित्येक सरदार इंग्रेजांचा द्वेष करीत असत; पण प्रत्यक्ष तोंड देऊन लढाईस उभा राहणारा एकटा **बापू गोखलाच** काय तो! त्यानें मात्र

बाजीरावसाहेबांनीं असा आंतून लढाईचा घाट आणून सन १८१७ सालीं कार्तिक शुद्ध ९ रोजीं लढाई दिली. ती लढाई मागील चार घटका दिवस राहतां सुरू झाली. तीं प्रहर रात्र होईपर्यंत सारखी चालू होती. पहांट होईपर्यंत दोन्हीकडील सेना सज्ज अशाच राहिल्या. मधून मधून मात्र थोडा गोळ्यांचा वर्षाव होत असे. पहांट होतांच पुनः युद्धास आरंभ झाला. या वेळीं इंग्रेजांनीं भारीच नेटावा करून पेशव्यांचे फौजेस मागें हटविलें. इंग्रेजानीं पुणें शहर आपल्या ताब्यांत घेतलें; तेथपावेतों **बापू गोखले** तोंड देऊन लढत होते. **बाजीराव साहेब** दोनप्रहर रात्रींच फौजेचें लटांबर घेऊन सासवडास निघून गेले होते, व कांहीं पायदळ आणि तोफखानाही त्याचरात्रीं रवाना केला होता. पुणें शहर इंग्रजांचे हातीं गेल्यावर **बापू गोखले** आपले स्वार घेऊन सासवडास निघून गेले.

२३. इंग्रेजांनीं पुणें घेतल्यावर तेथील बंदोबस्त करून पेशव्यांचा पाठलाग करण्याचें आरंभिलें. पेशव्यांच्या फौजेच्या टोळ्या वेगवेगळ्या चालत असतां दक्षिणेस निरानदीच्या पुलावर इंग्रेजांच्या मागें लागलेल्या फौजेची व यांची दृष्टादृष्ट झाली. निरेच्या पुलावर येतांच **रामचंद्रपंत** सुभेदार यांजबरोबर **बापू** गोखल्यांनीं निवडक आपली अर्धी सेना देऊन इंग्रेजांवर पाठविलें. त्या वेळीं सुभेदार यांचे हातास छरे लागले. पुढें सालण्याच्या घाटाजवळ सुभेदाराची व इंग्रेजांची लढाई लढानशी झाली. अखेर देऊर येथें इंग्रजांचे फौजेनें तळ दिला. त्यांचें पासून तीन कोसांचे अंतरानें **बापू गोखले** यांनीं मुक्काम केला.

**बाजीराव** साहेबांचा व त्यांचे सरदारांचा असा वि-

चार ठरला कीं, सर्व पायदळ, तोफखाना वगैरे स्वारीसुद्धां पुढें रवाना करावें, तें इतकें लांब पाठवावें कीं, इंग्रेजांचे फौजेचें व याचें अंतर निदान वीस पंचविस कोस राहील. याप्रमाणें बुणगे व हत्ती पुढें रवाना केल्यावर **बापू गोखले** व **निपाणकर** यांनीं आपल्या फौजा इंग्रजांचे तोंडावर किंवा बाजूस चालवून नेहमीं लढत असावें. **रामचंद्रपंत** सुभेदार यांणीं **बापू गोखल्यांचे** निम्मे स्वार घेऊन त्यांनीं व विंचुरकरांनीं इंग्रेजांचे पिछाडीस राहून मागील भागास व बाजूस लढाई देत चालावें. या बेताप्रमाणें पेशव्यांचें लष्कर चालूं लागलें. नित्यशः कांहीं चकमक झडत जाऊन इंग्रेजांचे फौजेच्या तीन कोस अंतरानें गोखल्यांनीं आपला तळ द्यावा. या शिवाय नित्य असा क्रम चालला कीं, रात्रीं तळावर गेल्यावर जेवणखाण करणें असल्यास करून सर्व रात्रभर सेना सज्ज ठेवावी. इंग्रेज छापा घालतील ह्मणून प्रत्येक रात्रीं एकेजागीं न राहतां तीन चार ठिकाणें बदलावीं. याप्रमाणें रात्र निघून गेल्यावर सूर्योदय झाल्याबरोबर मार्गस्थ व्हावें. मार्गांत इंग्रेजांचे फौजेवर गोळे टाकावे, त्यांच्या लैनीवर बाण मारावे, व त्यांच्या सेनेसभोंवतीं घिरट्या घालाव्या. याशिवाय केव्हां केव्हां इंग्रेजांचे पिछाडीवर हल्ला करावा, आणि तिकडून इंग्रेजांनीं उठावणी केली तर तात्काळ पुढें धांवत जाऊन इंग्रेजांचे लोक कापून काढावेत. अशाप्रकारें श्रीमंतांची स्वारी पंढरपुरापर्यंत जाऊन सिद्धटेकाकडून जुनराकडे वळली. पंढरपुरानजीक सामना झाला, त्यांत सुभेदार यांस तोफेचे छरे लागले. या मार्गांत इंग्रेजांचे फौजेस मनस्वी त्रास झाला; त्यांस पांच सहा कोस मजल चालण्यास

अडीच तीन प्रहर दिवस निघून जाई. यासाठीं दोन किंवा तीन दिवस त्यांनीं वाट चालावी आणि एक दिवस विश्रांतीसाठीं मुक्काम करावा असा परिपाठ ठेविला.

२४. पूर्वी सांगितलेंच आहे कीं, **बाजीराव**साहेब सर्व लटांवरसुद्धां पुढें चालत असत. ते जुनराहून ब्राह्मणवाड्याकडे जाऊन **बापूगोखले** यांस तिकडे बोलावून घेतलें; त्यावरून **बापूगोखले** ब्राह्मणवाड्यास आपली सर्व फौज घेऊन गेले. तेथें पोंचल्यावर **बापूगोखल्यां**चें थोरलें कुटुंब जें निवर्तल्याबद्दल मागें आह्मीं सांगितलें आहे, त्यांचा मुलगा **गोविंदराव बाबा** यास क्षयाची भावना होऊन या समयीं अतिव्याप्ति झाल्यामुळें देहावसान झालें. यांचें वय अठरा एकोणीस वर्षांचें होतें. **गोविंदराव बाबाची स्त्री राधाबाई** ही ओंकाराची कन्या या समयीं पंधरा वर्षांची असून ती फारच रूपसंपन्न, सुलक्षणी आणि पतिव्रता अशी होती. आपल्या पतीची अशी अवस्था पाहून तिनें सहगमन करण्याचा निश्चय केला. हा आपला नेम तिनें श्वशुरादि सर्व आप्तांस मोठ्या विनयानें कळवून सिद्धता करण्याविषयीं त्यांची प्रार्थना केली. तिची बाल्यावस्था पाहून सर्वांस फारच वाईट वाटलें. तिनें सती जाऊं नये ह्मणून **बापूं**नीं व **बाजीराव**साहेबांनीं तिला पुष्कळ सांगितलें, परंतु त्या साध्वीचें मन इहलोकच्या सौख्यापासून पराङ्मुख होऊन परलोकच्या साधनाकडे गुंतलें. सर्व मो-

---

१. पतिमरणानंतर परपुरुषास मुख दाखवावयाचें नाहीं किंवा परपुरुषाचें मुख अवलोकनच करावयाचें नाहीं! अशा प्रकारच्या स्त्रियांच्या निग्रहावरून आमच्या या देशांत सती जाण्याची चाल पडून गेली असेल असें वाटतें. सती जाण्याचें कृत्य धारिष्ठाचें असून

हपाशाचा परित्याग केल्यामुळें कोणाचेंच सांगणें रुचेनासें झालें. याप्रकारें तिचा फारच आग्रह पाहून त्या तशा दुःखांत सर्वांनीं असा बेत केला कीं, तिचें ह्मणणें थोडेंसें लांबणीवर टाकिलें ह्मणजे पोरबुद्धीचा हा नाद सुटून जाईल. यावरून तिला **बापू गोखले** यांनीं सांगितलें कीं, 'आपण ब्राह्मण ज्ञातींतील पडलों, तर सती जाणें तें कर्मशास्त्र विधियुक्त झालें पाहिजे. शास्त्रार्थाचे ग्रंथ तर स्वारीबरोबर आणिले नाहींत, तस्मात् जुन्नरास कारकून पाठवून शास्त्राचे ग्रंथ आणवून नंतर विधिपूर्वक अस्थिसमागमें तुला मार्गस्थ करूं.' ही आज्ञा ऐकून त्या सुशीलेनें उत्तर केलें कीं, 'अस्थींबरोबर सहगमन करणें शास्त्रसंमतच असेल तर ग्रंथ येतांच माझी रवानगी करून द्यावी, आणि तसें कराल ह्मणून मला अभिवचन द्यावें.' **बापूं**नीं सांगितलें कीं, 'उद्यां ग्रंथ आले ह्मणजे परवां तिसरे दिवशीं तुझी रवानगी करूं.' मुलीनें वडिलांची आज्ञा प्रमाण मानून 'फार उत्तम आहे, प्रेतदहन करावें' असें ह्मणाली.

**बाजीराव**साहेबांचे स्वारींत शास्त्रार्थाचे ग्रंथ किंवा शास्त्री नसतील ही गोष्ट मोठे आश्चर्याची समजली पाहिजे. कारण यांचे बरोबर सर्व कांहीं असायाचें. यांची मिजाज किती होती हें सर्वांस ठाऊक आहेच. फार मिजाजी कोणी झाला तर त्यास **बाजीराव**साहेबांचे नांवानें हाक मारीत असतात हें सर्वांस माहीत असेलच. 'हा एक बाजीरावसाहेबांचा बेटाच आहे,' 'तुह्मी तर काय, बाजीरावाचे नातूच दिसतां' अशा बोलण्यांतील ह्मणी या त्यांच्या मिजाजीव-

---

स्त्रीच्या आंगीं मनोनिग्रह आणि पतिप्रेम असल्यावांचून तें घडावयाचें नाहीं.

ळनच पडून गेल्या आहेत. हें एक असो. दुसरें असें कीं, **बाजीराव**साहेब शास्त्राचे व ब्रह्मकर्माचे किती चहाते होते हें येथें नव्यानें सांगावयास पाहिजे असें नाहीं. स्वारी-बरोबर शास्त्री, पंडित, तसेच सर्व ग्रंथ होतेच; पण मुलीचें मन पालटावें ह्मणून ही मसलत केली होती. असो. ती पतिव्रता साध्वी अल्प समजुतीची नसून दीर्घदृष्टी होती. तिनें असें केलें कीं, तीन दिवस पर्यंत एकेच जागीं अन्न-पाण्यावांचून डोळे लावून बसली. आपले पति शिवभक्त होते ह्मणून (ते नित्य पार्थिव पूजीत असत) **राधाबाई** नेत्र झांकून शिवाची प्रतिमा मनांत आणून ध्यानस्थ बसली! या तीन दिवसांत तिनें अगदीं हालचाल देखील केली नाहीं! जणू काय देहापासून प्राण निराळेच! फक्त देहमात्र येथें असून प्राण पतीसमागमें भ्रमण करावयास गेले.

तिसरे दिवशीं प्रातःकाळीं **बाजीराव**साहेब आणि **बापू** गोखले हे संकेताप्रमाणें **राधाबाई**पाशीं जाऊन तिचें मन वळविण्याविषयीं प्रयत्न करूं लागले, पण सर्व व्यर्थ! पेशव्यांनीं तर तिला सांगितलें कीं, 'तुला अलंकार पुष्कळ देऊन मोठी जहागीरही देऊं. तूं सती जाण्याचा आग्रह सोड.' तिनें पेशव्यांस उत्तर दिलें कीं, 'माझे अलंकार आणि जहा-गीर पुढें गेली आहे; त्याचा उपभोग घेण्यास माझी सत्वर रवा-नगी केल्यास मी आपली उपकारी होईन.' त्यावर **बाजीराव**-साहेब तर निरुत्तर झाले! पण **बापू** साहेबांनीं मात्र तिचें मन फिरविण्याची खटपट केली. **बापू** साहेबांस मोठ्या न-म्रतेनें ती ह्मणाली कीं, 'आपण एकवचनी, एकपत्नी वीर; आपण एक वेळ युद्धांत पुढें पाऊल टाकिलें तर तें मागें न घेण्याविषयीं सर्वथा आपला नेम. केवळ **श्रीराम**-

चंद्राप्रमाणें आपलें वर्तन, तस्मात् मी आपली स्नुषा असून सत्कर्म आचरण करण्याविषयीं एक वेळ जो निग्रह केला तो मागें फिरविला तर आपले कुळास दूषण लागणार नाहीं काय? यासाठीं केलेला वेत सोडणें उचित नाहीं! आपण एकवचनी असें ब्रीद वाळगलें आहे, त्या अर्थी तिसरे दिवशीं मार्गस्थ करण्याविषयीं आपण दिलेलें अभिवचन प्रांजळपणें शेवटास न्यावें!'

असें तिचें निश्चयाचें बोलणें ऐकून सर्वांसच अति विस्मय आणि खेद वाटला. तिची बाल्यावस्था, शहाणपण आणि सुंदरपणा पाहून सर्वजण दुःखडोहीं बुडून गेले! आतां सिद्धता करणें चुकत नाहीं असें समजून मंडप वगैरे घालून तयारी झाल्याचें तिला कळविलें. राधाबाईनें तें ऐकतांच मोठ्या आनंदानें उठून लागलेंच शुभ्र पातळ परिधान करून कपाळीं कुंकवाचा मळवट भरला. नंतर सर्व अलंकार काढून ब्राह्मणांस व सुवासिनी बायकांस त्यांचा धर्म केला. आणखीही द्रव्य श्वशुरापासून घेऊन ब्राह्मणांस वांटलें. नंतर हातीं पंचारती घेऊन घरांतील सर्व वडील मंडळीस नमस्कार करून, 'झाले अपराधांची क्षमा करावी' अशी प्रार्थना करिती झाली!

हा सर्व प्रकार पाहून मंडळी तटस्थ झाली! कोणाच्या तोंडांतून शब्द निघेना! गहिंवर दाटून येऊन सर्वांचे नेत्र पाण्यानें भरून गेले!! ती सर्वांचा निरोप घेत असतां ह्मणूं लागली कीं, 'मी आतां पतिसेवा करण्यास गमन करितें. मजवर लोभ असूं द्यावा.' हें तिचें बोलणें ऐकून सर्वत्रांस दुःखाच्या उकळया येऊं लागल्या. ती साध्वी हातीं आरती घेऊन मंडपाजवळ आली, नंतर मंडपाचे

ची लढाई इंग्रेज आणि पेशवे यांजमध्यें झाली होती, तिचा अभिप्राय **ग्रांटडफ**साहेबांनीं आपल्या पुस्तकांत काय दिला आहे तो आह्मी काढून पाहिला; तेव्हां तर त्या लेखाची असत्यता पूर्णत्वानें आह्मांस भासली! वडगांवचे लढाईविषयीं आह्मांस जी माहिती आहे ती अशी कीं, इंग्रेज लोक **राघोबादादास** घेऊन बोरघांट चढून वर आले ही बातमी **नानाफडणविसांस** कळल्यावर त्यांनीं सर्व सरदारांचे मतानें लढाई देण्याचा बेत करून मार्गांत पन्नास हजार लोकांनिशी इंग्रेजांकडील लोकांस तळेगांवाजवळ अडविलें. पेशव्यांकडील फौजेंत सेनापति खुद्द **महादजी** शिंदे हे असून त्यांनीं इंग्रेजांची त्या प्रसंगीं अशी खोड मोडली कीं, त्यांस पळतां पळतां पुरेवाट केली! **इष्टुर फांकडा** मारला गेल्यावर इंग्रेजांनीं आपल्या तोफा वगैरे जड सामान सर्व तळेगांव येथील तळ्यांत बुडवून माघारे तडक मुंबईचा रस्ता धरिला! इंग्रेजांनीं रात्रीं आंधारांत बारा वाजतां पळ काढला, पण शिंद्यांच्या लोकांनीं त्यांस गांठून खूप चोप दिला; आणि आपणास पाहिजे तसा तह करून घेतला. त्या तहांत **राघोबा** शिंद्याचे स्वाधीन झाले. भडोच किल्ला व रोकड ऐवज शिंद्यास मिळाला! वृद्ध गृहस्थांचे तोंडून तर असें ऐकिलें आहे कीं, वडगांवचे लढाई सारखी दुर्दशा इंग्रेज लोकांची तर कधींच उडाली नसेल. पण मराठ्यांच्या बखरींत ग्रंथकारानें जो मजकूर लिहिला आहे तो अगदींच उडवाउडवीचा असून आपल्या देशबंधूंचें उणें झांकून नेण्यासाठीं लिहिला आहे हें कोणाही विचारी पुरुषास वाटल्यावांचून राहणार नाहीं.

दुसरे दिवशीं राजेवाडीहून निघून सर्व सेना जेजुरीस

गेली, आणि तेथें मुक्काम केला. या वेळीं पेशव्यांजवळ उत्तम प्रकारचा बंदोबस्त होता. त्या मुक्कामीं **बाजीराव-साहेब पेशवे, बापू गोखले** आणि **निपाणकर** यांनीं असा विचार केला कीं, पुण्याहून निघते वेळीं पायदळ पलटणी वगैरे फौज वेगळी काढून मागें ठेविली आहे, व आपलेबरोबर फक्त स्वार आहेत, यासाठीं मागें ठेविलेलीं पायदळ पलटणें निपाणी मुक्कामीं बोलावून घेऊन सर्व फौज एकत्र करावी आणि एक जबरदस्त लढाई इंग्रेजांशीं देऊन त्यांचा पराजय करून टाकावा. तोंपर्यंत हल्लीं जी आघाडीस फौज चालत आहे ती स्वारीसमागमें चालवावी; तसेंच **विंचुरकर** आणि **रामचंद्रपंत** सुभेदार हे इंग्लिश फौजेच्या पृष्ठभागीं चालतात तें त्यांनीं अग्रभागीं असावें; पण निपाणीस दाखल होतांच **विंचुरकरां**नीं येथें येऊन मिळावें. या बेताप्रमाणें पेशव्यांची फौज चालू झाली. सर्व स्वारी साळप्याचे घाटानें उतरून पाडळीस मुक्काम करिती झाली. इकडे **विंचुरकर** जेजुरी येथेंच इंग्लिश फौजेचे आघाडीवर राहिले. कोरेगांव येथें जी इंग्लिशांची थोडी फौज शिलक राहिली होती, तिला एल्फिन्स्टन साहेब आपल्या सेनेसहित जाऊन मिळाले, व सर्व मिळून कोरेगांवींच ते राहिले. यामुळें विंचुरकरांसही तेथेंच राहणें भाग पडलें.

२६. इकडे कर्नाटकांत मद्रास येथें कांहीं इंग्लिशांचीं पलटणें होतीं त्यांनीं पेशव्यांची फौज पाडळीवर उतरली होती हा शोध ठेवून त्यांजवर छापा घालण्याचा मनसुबा केला. कांहीं पलटणें व स्वार मिळून चार हजार सेना एकदम निघून दीडप्रहर दिवसाचे सुमारास पेशव्यांचे तळा-

वर येऊन उतरली. देउरगांव येथें पेशव्यांचे कांहीं स्वार छबिन्यांत होते ते इंग्लिश फौजेनें पाहून त्यांच्या पाठोपाठ ते घोडे टाकीत चालले. इतकी जलदी करण्याचें कारण असें कीं, पेशव्यांस छाप्याची बातमी समजण्याचे पूर्वींच अचूक जाऊन आपण हल्ला करावा, अशी त्यांची इच्छा होती. अशा उत्कट आशेनें इंग्लिश लोक पाडळीवर जाऊन उतरले; तों ते जाऊन पोंचण्याचे पूर्वींच पेशवे प्रातःकाळीं कूच करून निघून गेले होते. याप्रमाणें इंग्लिशांचा हा बेत तर फसला. आपल्यावर छापा येत होता तो चुकून आलेल्या फौजेचा मुक्काम आज पाडळीवर आहे ही गोष्ट पेशव्यांस बातमीदारांनीं तात्काळ समजावली. पेशवे दररोज प्रातःकाळीं भोजनाचा बेत उरकून पंधरा कोसांची मजल मारीत असत. ही छाप्याची बातमी ऐकून श्रीमंत हुषारीनें चालत असत. वरील नवीन कर्नाटकांतून आलेली फौज श्रीमंतांच्या मागोमाग चालू झाली. यामुळें श्रीमंतांस जेवणास देखील फुरसत मिळेना. मार्गांत चालण्याचे श्रम विशेष पडून विश्रांति तर अगदींच नाहीं असें झालें. जेथें विश्रांति घेण्यास उतरावें तेथें पाठीवर इंग्लिशांची सेना आहेच!

**विंचुरकर** आणि **सुभेदार** हे येऊन मिळाले नाहींत, व पायदळ येणार होतें तेंही आलें नाहीं ह्मणून निपाणी येथें लढाई करण्याचा जो बेत ठरला होता तो निष्फळ झाला. कर्नाटकाची बारी उतरून गेल्यावर **विंचुरकर** आणि **रामचंद्रपंत सुभेदार** हे फौजेसुद्धां श्रीमंतांस येऊन मिळाले. पुढें जमखिंडीची बारी उतरून पेशव्यांची सर्व फौज आलीकडेस आली. त्यांचे मागें इंग्लिशांची

फौज होतीच. त्यांचे स्वार दोन दोन कोसपर्यंत आपलीं पलटणें सोडून पेशव्यांचे फौजेचा पाठलाग करीत. हा त्रास पाहून **बापू गोखले** यांनीं असा संकेत केला कीं, बारी उतरतांना शत्रूवर हल्ला करावा, यासाठीं **बापू गोखले, विंचुरकर, निपाणकर** आणि **सुभेदार** यांनीं एके ठिकाणीं मुक्काम करून श्रीमंतांची सडी स्वारी मात्र मिरजेजवळ उगार गांवीं मुक्कामास गेली. इंग्रेज बारीखालींच राहिले.

कोरेगांवीं **एल्फिन्स्टन** साहेब लष्कर सुद्धां होते. (हे **एल्फिन्स्टन** साहेब कोण याविषयीं कोणत्याही वाचकांस भ्रांति पडेल असें वाटत नाहीं. मुंबई येथील 'टौनहालां'त या **एल्फिन्स्टन** साहेबांचा पुतळा शुभ्र संगमरवरी दगडाचा जो आहे तो बहुतेकांनीं पाहिलाच असेल.) असो. त्यांसही पेशव्याकडील सर्व घटवटना समजली. उगारगांवीं श्रीमंतांची सडी स्वारी आहे, ह्मणून छापा घालण्याकरितां त्वरेनें जाऊन दाखल झाले. पण **एल्फिन्स्टन** साहेब उगार गांवीं दाखल होण्यापूर्वींच **बाजीराव**साहेबांची स्वारी तेथून निघून गेली होती; **बाजीराव**साहेब साताऱ्याकडे चालते होऊन इंग्रेजांचें लष्कर आमच्यामागें लागलें आहे, असा निरोप **बापू गोखले** आणि **निपाणकर** यांस कळविला. हें ऐकून **बापू गोखले** **बाजीराव**साहेबांस मिळण्यासाठीं, मागील इंग्रेजांची फौज बारीखालीं होती तिची आस्था सोडून सत्वर जे निघाले तों त्यांची व इंग्रेजांचे फौजेची मिरजेजवळ साळगांवीं गांठ पडली. त्या समयीं **बापू गोखले** यांनीं स्वतांची फौज घेऊन इंग्लिश फौजेवर हल्ला केला; आणि त्या फौजेची नासाडी अतोनात करून टाकली. **निपाण-**

कर मागें राहिले होते ते या समयीं तेथें आणवून त्यांस बापूंनीं शत्रूवर चाल करण्यास सांगितलें. 'शत्रूचे स्वार तेथें नसून फक्त पलटणी मात्र आहेत, त्या अर्थीं ही वेळ हल्ला करण्यास फारच उत्तम आहे, अतएव ही संधि दवडूं नये,' असें जरी बापू गोखल्यांनीं सांगितलें तरी निपाणकरांनीं तें न ऐकून शत्रूची फौज सोडून ते दोन तीन कोसांपलीकडे जाऊन उतरले.

सातारकर महाराजांस बाजीरावसाहेबांनीं पूर्वींच वासोटा किल्ल्यावरून आपल्या बरोबर घेतलें होतें. ते महाराज आपल्या परिवारासुद्धां पेशव्यांचे गोटांत असत. बाजीरावसाहेब साताऱ्यास मुक्कामास गेले, इतक्यांत शत्रूची फौज कोरेगांवावर आली. मग साल्प्याच्या घाटानें उतरून अडचणींतून पार निघून जावें ह्मणून श्रीमंत वसंतपंचमीस अकूलण येथें निघून गेले. श्रीमंत सत्वर निघून गेले हें फार चांगलें झालें; कारण ती जागा पराकाष्ठेची बिकट असून डोंगराळ अरण्य; नांदगिरी किल्ला उजवा राहून डावे बाजूस चंदनवंदन किल्याचा पहाड; मधून रस्ता एक कोस रुंदीचा; तीन कोसपर्यंत अशा अडचणींत बाजीरावसाहेबांस अडवून गांठावें ह्मणून इंग्रेजांनीं मसलत केली होती. ती मसलत गोखले यांस समजून त्यांनीं नांदगिरी किल्ल्यानजीक इंग्रेजांचे फौजेवर हल्ला केला. यामुळें इंग्रेजांस लढाईकडे गुंतवून बाजीरावसाहेब तर पार निघून गेले. देउर गांवीं अडीच प्रहर दिवसास इंग्रेजांनीं मुक्काम केला. निपाणकर शत्रूचा शह सोडून नांदगिरी किल्ल्याचा डोंगर डावा टाकून किन्हईचे खिंडीनें पार निघन गेले! गोपाळराव पटवर्धन जम-

खिंडीकर आणि **बापू गोखले** तेथेंच राहिले होते. त्यांचा मनोदय पुढें जाण्याचा होता, परंतु देउर गांवीं शत्रु होते ह्मणून पार जाण्यास हिंय्या चालेना. तरी पुढें जाण्याचा इलाज करून इंग्लिश लष्कर उजवें घेऊन चंदनवंदन किल्ल्याचे बाजूनें चालते झाले. इतक्यांत गोऱ्या स्वारांनीं **बापू गोखले** व **जमखिंडीकर** यांजवर धांवा केला; **गोखले** व **पटवर्धन** यांच्या लोकांनीं हा अडचणींतील हल्ला पाहून घाबरले आणि ज्यास जिकडे मार्ग सांपडेल तिकडे पळून जाऊन चंदनवंदनच्या पहाडावरून ते सर्व वाघुलीकडे उतरले. **बापू गोखले** यांजजवळ पंचवीस स्वार आणि **जमखिंडीकर** यांजपाशीं दहाच स्वार असून ते अढळ उभे राहिले. या प्रसंगीं **बापू गोखले** हे इंग्लिश लोकांचे हातीं जिवंत सांपडावयाचे, त्यांची व शत्रूची सारी दोनशें हातांची तफावत! पण **बापू गोखले** जे इंग्लिशांचे शत्रु ते हेच असें त्यांतून कोणाकाही माहित नवतें; यामुळें आणि तोफेपुढें येण्यास इंग्रेजांकडील कोणीच माणूस धजेना यामुळें वचले! असो. **बापू गोखले** तेथून निघून दुसऱ्या घांटानें उतरून दुसरे दिवशीं अकूलण येथें **श्रीमंतांची** स्वारी होती तिला जाऊन मिळाले. त्या दिवशीं वसंतपंचमी होती ह्मणून सणाचा मोठा थाट करून **श्रीमंतांनीं** रंग केला!!

२७. इंग्रेजांची फौज मागें न येतां सालप्याचा घाट उतरून निरा नदीवर तिनें मुक्काम केला. **श्रीमंतांची** स्वारी अकूलण येथें असतांच त्यांस **त्रिंबकजी डेंगळे** हे दोनशें स्वारांनिशीं येऊन मिळाले. तसेंच पांचशें पेंढारीही येऊन मिळाले. पुढें **विंचुरकर** आणि **सुभेदार**

हे शत्रूचे अग्रभागीं तोंडावर ठेवून खाशा स्वारीबरोबर **बापू गोखले** आणि **निपाणकर** हे फौजेसुद्धां असून ते कूचदरकूच सोलापुरापर्यंत जाऊन तेथें दोन तीन दिवस मुक्काम केला.

या चरित्राची पूर्णता होण्याकरतां येथें **बाजीराव**साहेब पेशवे यांची कांहीं विशेष हकीकत सांगितली पाहिजे. नुकतें वर जें त्यांच्या स्वभावाचें वर्णन केलें आहे त्यावरून मार्मिक वाचकांचें ध्यानांत **रावबाजीचे** गुणदोष येऊन चुकतीलच. असो. "**औरंगजेब** कपटी व दुर्व्यसनी होता ह्मणूनच त्याचें राज्य गेलें ह्मणून मालकम साहेब ह्मणतात, पण **बाजीराव**साहेब त्याजपेक्षां शंभरपट घातकी व कपटी होता." त्यास कोणाचा विश्वास ह्मणून येतच नसे. पदरच्या बहुतेक सरदारांच्या त्यानें जहागिरी नाहींशा करून टाकल्या होत्या. कोणावर कांहीं कोणावर कांहीं असे दोष काढून सर्वच सरदारांच्या जहागिरी जप्त कराव्या अशी त्याची फार वासना होती! यामुळें सर्व सरदार व योद्धे त्यास पाण्यांत पाहत होते. आणीबाणीचे प्रसंगीं **रावबाजी**स पदरच्या मंडळींनीं सोडून दिलें. एक **बापू गोखले** मात्र शेवटपर्यंत उपयोगी पडले. असो. **बाजीराव**साहेब यांनीं नवीन फौज पुष्कळ जमविली. त्या वेळीं जे शहाणे सरदार होते ते ह्मणाले कीं, 'तुह्मी **गोविंदराव बापू काळे** बारामतीस आहेत त्यांची या कामांत मसलत घ्या. कारण **सखाराम बापू, नानाफडनवीस** इत्यादि मुत्सद्दी मंडळीपैकीं काळेच कायते एकटे हल्लीं हयात आहेत.' या सरदारांच्या सूचनेवरून **बाजीराव**साहेबांनीं **गोविंदराव बापू काळे**

यांसी मोठ्या इतमामानें पुण्यांत बोलाविलें. काळे हे पुण्यांत आल्यावर ते आपल्या नदीकांठच्या वाड्यांत राहिले. काळे पुण्यांत आले आहेत ही गोष्ट बेटावर **एलिफन्स्टन्** साहेबांस कळली. त्यामुळें ते फार चिंतेंत पडले; कारण ते साहेब जुन्या मुत्सद्दी मंडळास फार भीत असत. असो. **बाजीराव**साहेबांस त्यांनीं कळविलें कीं, 'काळे हे तुमच्या विरुद्ध व तुमच्या बापाविरुद्ध ज्या मसलती झाल्या त्यांपैकीं असून तुह्मी त्यांस पुण्यास कसें येऊं दिलें?' हें बडेसाहेयांचें बोलणें **बाजीरावां**स खरें वाटलें आणि त्यांनीं तीन दिवसपर्यंत काळ्यांची गांठ घेतली नाहीं! शेवटीं 'काळे हे बारामतीस जाण्यास निघाले ह्मणून त्यांस एकदांचें वाड्यांत बोलावणें पाठविलें. काळे हे भेटीस आल्यावर **बाजीराव** साहेबांनीं त्यांस इंग्रेजांविषयींची मसलत विचारली. काळे यानीं सांगितलें कीं, 'तुह्मी तूर्त लढाई करूं नये. कारण इंग्रेजांशीं गांठ आहे हें पक्कें समजा. तुह्मास कोणीच सरदार अनुकूळ नाहींत, तुह्मास इंग्रेजांविषयीं बाहेरची बातमी नाहीं. तुमचा तंग तोबरा ठिकाणावर नाहीं. **टिपू** एवढा जबरदस्त योद्धा असूनही त्याचा पिछा पुरवून इंग्रेजांनीं त्याचा शेवट कसा केला? **टिपूच्या** लढाईंत मी इंग्रेजांबरोबर होतों त्या वेळींच त्यांचा पराक्रम पाहिला. ते मुशाफर असून त्यांचे नेट व उत्साह व कवाईत व दारूगोळ्या वगैरे जाम कांहीं अघटीत आहे. तळेगांवावर जेव्हां **दादा**साहेबांस घेऊन इंग्रेज आले तेव्हां त्यांस परत घालविण्यास **नाना फडनविसां**स केवढी तयार करावी लागली! इंग्रेज आल्याची बातमी **नाना** देवपूजा करीत असतां त्यांस कळली. ती ऐकल्याबरोबर **नाना**चे



काळजानें ठाव सोडिला, आणि हातांतील अभिषेकपात्र एकदम खालीं पडलें. असो. ह्या गत गोष्टी आहेत, त्या वेळेपेक्षां हल्लीं तर इंग्रेज दसपट बळवान झाले आहेत. सवाई **माधवरावा**चे जन्माचे सालीं इंग्रेजांनीं ठाणें आणि साष्टी प्रांत नाना फडनविसांपासून घेतला, व रामाजी महादेव बिवलकर यांचा मुलगा आनंदराव सुभेदार कल्याणकर पळून पुण्यास आला तो महाल परत कोणाच्यानेंच घेववला नाहीं! यासाठीं तुह्मी तूर्त इंग्रेजांशीं तह करून घ्या. नागपुरकर, होळकर इत्यादि सरदारांचें ऐक्य करा. तसेंच निजाम जर अनुकूळ होईल तर त्यास साह्य घ्या. कवाइती पलटणें तयार करा. मग जर मसलत सिद्धीस न गेली तर मला विचारा. पण या सर्व तयारीस दहा बारा वर्षें लागतील. शिंद्याची फौज व गंगाजळी तुमची आहे ती फौज व तो पैसा आपलेजवळ करा. इतकें करून मग इंग्रेजांशीं लढण्याचा घाट घाला; तोंपर्यंत उतावळी करूं नका.' इतकें सांगून **गोविंदराव कृष्ण** काळे हे बारामतीस निघून गेले. पुढें मातक्यान **बापू गोखल्यां**ची व **बाजीराव**साहेबांची गांठ पडली. तेव्हां काळे यांनीं सांगितलेली मसलत **बाजीराव**साहेबांनीं गोखल्यांजवळ सांगितली. तें ऐकून **बापू गोखले** ह्मणाले कीं, 'इंग्रेजांची बिशाद काय?' असें बोलणें झाल्यावर **बाजीराव**साहेब काय! त्यांस भोळ्या सांबाचा अवतार ह्मणून लोक ह्मणत असत! त्याजवळ शहाणा मंत्री कोणीच नवता. चिंतोपंत देशमुख व सदाशिव माणकेश्वर मेल्यावर सर्व घोटाळा झाला होता. त्या समयीं पेशवाई नष्ट होण्यास **बापू गोखले**च कारण झाले

असें कित्येकांचें मत आहे. **बापू गोखले** यांची उतावळीची मसलत झाली नसती तर आजला पुण्याचें राज्य कायम असतें. ग्वाल्हेर, इंदूर, वडोदें, हैदराबाद इत्यादि ठिकाणचीं जशीं राज्यें आहेत तसेंच पुण्याचेंही असतें, परंतु विचाराअंतीं असें दिसतें कीं, या अपेशाला वांटेकरी **बापूं**पेक्षां **बाजीराव** अधिक आहेत. **बाजीराव**साहेब होता त्यापेक्षां थोडा जरी अधिक शहाणा राजा असता तर ही गोष्ट घडून येतीना. पण बाजीराव केवळ पळपुट्या, बायक्या, बंदुकीच्या बारास भिणारा, अभद्र कपाळाचा, असा पडला! पत्रिका पहाणें, अनुष्ठानें करणें हे नाद त्यास फार ! ते ब्रह्मवर्ती गेल्यावर देखील सुटले नाहींत ! **बाजीरावां**स वाटत होतें कीं, इंग्रेज खडकीवर आहेत तेथून गेले ह्मणजे झालें!! **बापू गोखले** शूर मात्र खरे; त्यांस मुत्सद्दीपणा नवता ही गोष्ट पुढेंही सांगण्यांत येईलच. त्यांस इंग्रेजांचे बळाचा व कवाईतीचा अटोका तशीच देशांतील बातमी नवती असें दिसतें. पण ते शूरत्वाविषयीं प्रसिद्ध आणि केवळ स्वामिभक्तीस्तव रणांत पडले ह्मणून त्यांची कीर्ति चिरकाळ राहील. **बापू गोखले** प्रथम जेव्हां पुण्यास आले तेव्हां सवाई **माधवराव** गादीवर असून राज्यसूत्रें **नाना फडणविसां**च्या स्वाधीन होतीं. त्या वेळीं **बापूं**चे हातानें कितीक शूरत्वाचीं कामें झालीं. कितुरकरांचें बंड, काटक लोकांचें बंड, सचीवांचें बंड, रामोशांचें बंड अशीं तर कित्येक बंडें त्यांनीं मोडून टाकलीं. त्यांत गोखल्यांचा पराक्रम व **नाना फडणविसां**चा योजकपणा हे दोन्ही गुण एकदम प्रकट झाले. सारांश **बापू गोखल्यां**सारखा सेनापति

लागलें ! **बापू गोखले** यांचा मृत्यु तीच पेशव्यांचे राज्याची समाप्ति ! नानाफडनविसाचा मृत्यु झाला तेव्हां पेशवाईंतील चातुर्य आणि शहाणपण लयास गेलें असें सर्व म्हणूं लागले, तसेंच **बापूचे** मृत्यूबरोबर ब्राह्मण लोकांतील शौर्य नष्ट झालें असें सर्व ह्मणूं लागले.

**हरीभाऊ देशमुख** हे गोखल्यांचे फडनवीस होते. ते सांगत कीं, मी गाइलगडची लढाई पाहिली व दुसऱ्याही पुष्कळ लढाया पाहिल्या; पण लढाईंत कोणताच शिपाई घाबरल्यावांचून राहील असें नाहीं. युद्धाची वार्ता ऐकण्यास चांगली, पण प्रत्यक्ष युद्ध पाहणें अत्यंत भयकारक होय; असें असतांही लढाईची बातमी ऐकतांच आनंदानें नाचत जाणारे दोन शिपाई पाहिले[१]. एक **बापू गोखला** व दुसरा **परशुराम भाऊ पटवर्धन.** या दोघांनीं लढाईची बातमी ऐकतांच त्यांचे बाहु स्फुरण पावत असत ! आंगांतील आंगरख्याचे बंद तुटत असत ! जमिनींतून गोळ्या उसळत असल्या आणि तसेंच चहूंकडून गोळ्यांचा वर्षाव सारखा होत असला तरी हे दोघे पुरुष तेथें जाऊन छाती करून उभे राहत. घोडा गोळी लागून जरी पडला तरी तेथेंच दुसरा घोडा आणवून त्याजवर स्वार होत, पण दोन पावलेंही मागें घेत नसत ! !

---

१ पेशव्यांजवळ शिपाई म्हणविणारे बहुत होते; परंतु लढाईची वेळ आली म्हणजे सर्वांच्या तोंडचीं पाणीं पळत असत. जसें लग्नास आनंदानें जावें तसें लढाईंत जाणारे शूर पुरुष ब्राह्मणांत दोन; परशुराम भाऊ व बापू गोखले. शेवटल्या बाजीरावाचे कारकीर्दीत हीं नांवें दोन आहेत.

लो० हि० संग्रहित ऐतिहासिक गोष्ट ८.

**बापू गोखले** हे शूर मोठे, त्यावद्दल कोणास शंका नवती ह्मणूनच **बाजीराव** साहेब त्यांचे नादानें चालत; पण **बापूंस** राजकारस्थानाची मसलत नवती. कारण इंग्रेजांचे विरुद्ध मसलतींत **महादजी** शिंद्या[1] सारखे थकले तेथें आपण कसें करावें, या गोष्टीचा विचार नाहीं. इंग्रेज पराक्रमी, त्यांतून शिंदे होळकर हे रुसलेले; गायकवाड तर इंग्रेजांकडे मिळालेला! अशा स्थितींत लढाई द्यावी किंवा न द्यावी, याचा पुरता विचार केला नाहीं असें वाटतें.

**बापू गोखले** हे स्वतः तरवारबहादर शिपाई होते; पण इंग्लिश जनरल मध्यें जसें युद्धकौशल्य परिपूर्ण असतें तसें यांचे ठिकाणीं नवतें असें कित्येक ह्मणतात. पण तसा संप्रदायच इकडे त्या वेळीं नवता. इंग्लिश जनरल सारीं पलटणें आपले पुढें लोटून आपण केवळ हुकूम करण्यास मागें राहतात, तसें **बापू गोखले** हे कधींच करीत नसत; ते स्वतः सेनेंत घुसून तरवार चालवीत असत; ही गोष्ट यांचे निपुणतेस कमी होती असें कित्येकांचें ह्मणणें आहे!! या व्यवस्थेमुळें फौज बेबंद होत असे असें ते ह्मणतात.

**बापू गोखले** हे एकपत्नी एकवचनी असत. आपल्या मंडळींतून कोणीच परद्वार करतां उपयोगी नाहीं अशी यांची जरब असे. ते या कामीं फारच सोवळे असत. **विठोबा** कोंडितकर गुरव हा त्यांचे घरीं भजनांत वाजवीत असे ह्मणून त्यानेंही कधीं कसबिणीच्या घरीं वाजविण्यासाठीं जाऊं नये अशी ताकीद असे. त्या **विठोबा** गुरवानें हुकमाप्रमाणें मरेतोंपर्यंत स्त्रीचे मागें ह्मणून वाद्य वाजविलेंच नाहीं. **विठोबाचीं** मुलें **मन्याबा** गुरव आणि **बाळकृष्ण** गुरव हे देखील नाचबैठकींत कधींच जात नसत. श्रीरामचंद्राप्रमाणें एकवचनी, एकपत्नी, एकबाणी असे **बापू गोखले** असत.

**बापू गोखले** यांस भजनाची प्रीति असे. ते रोज पायांत चाळ बांधून सद्भावपूर्वक देवाचें भजन करीत अशी त्यांची चाल होती. **ठाकुरदास** बोवांचा अनुग्रह **बापूंनीं** घेतला होता ह्मणून ही भजनाची चाल त्यांच्या पासूनच उचलली होती. भजनाचे वेळीं गुरवानें वाजवावें व यांनीं देवापुढें नाचावें असा क्रम होता. **ठाकुरदास** बोवा हे कनोजे द्विवेदी (दुबे) ब्राह्मण. यांची नातवंडं हल्लीं सातार प्रांतीं तारगांवीं असून त्यांसही अद्याप पर्यंत सातारचे महाराजानीं दिलेलें १००० रु० चें उत्पन्न चालू आहे.

१ महादर्जीस काशी घेतां येईना. त्यांचे पदरीं फराशीस सरदार होता तो ह्मणत असे कीं, पेशव्यांनीं मुंबई घ्यावी, टिपूनें मद्रास घ्यावी, ह्मणजे आह्मी काशी घेतों. एरवीं काशी घेतां येणार नाहीं. ही मसलत शिंद्यानें पुण्यास आणली होती, पण ती सिद्धीस जाण्याचे पूर्वींच महादर्जी शिंदे मृत्यु पावले.

महादर्जीशिंदे यांची नजर इंग्रेजांवर फार होती. ते नाना फडणविसाशीं मसलत घाटीत होते कीं, हिंदुस्थानांत आपणास मुख्य शत्रु आतां इंग्रेज आहेत. दुसरा कोणी अटकेपर्यंत नाहीं. याकरितां इंग्रेजांचे तीन ठिकाणीं असलेले ठाण्यांपैकीं कर्नाटकाच्या बंदोबस्ताचें टिपु सुलतानास सांगावें, तुह्मी मुंबई संभाळावी व मी आणि सेना साहेब नागपुरकर भोसले मिळून बंगाला घेतों; पण ही इंग्रेजांस काढण्याची मसलत शिंदे जबरदस्त होतील या भितीनें नानास पसंत न वाटून त्याणें टिपूवर स्वारी करण्याकारितां इंग्रेजांस मदत देण्याचें कबूल केलें व इंग्रेजांचा स्नेह संपादन केला. पुढें शिंदे मेल्यावर सर्वच घोटाळा झाला.

लो० हि० संग्रहित ऐतिहासिक गोष्टी ४३.

**ठाकुरदास** हे उत्कृष्ट कीर्तन करणारे, मोठे वक्ते असत. तसेंच ते निस्पृही असत ह्मणूनच श्रीमंत त्यांस फार मानीत असत. बापूंस लढाईचे वेळीं ते उपदेश करीत असत ह्मणून ह्मणतात. हे बोवा कीर्तन फारच चांगलें करीत असत ह्मणून सातार प्रांतांत व कोल्हापूर प्रांतांत यांची फारच वडेजाव वाढली होती. असो. **बापू गोखले** मरण पावल्यावर कांहीं वर्षांनीं साताऱ्यास महाराजांचे वाड्यांत कांहीं उत्साह होता त्या निमित्तानें छत्रपतींचे येथें पाहुणे मंडळी पुष्कळ जमली होती; कुरुंदवाडकर, सांगलीकर, जमखिंडीकर, मिरजकर, कागवाडकर इत्यादि पटवर्धन मंडळी आणि सचीवपंत, कऱ्हाडचे पंतप्रतिनिधि, निपाणकर, बाळाजीपंत नातू अशी दुसरीही मंडळी जमली होती. उत्सवांत **ठाकूरदास** बोवांचे कीर्तनांत सर्व मुत्सद्दीमंडळ व सरदारमंडळ अटोकाट बसलें असून **बुवासाहेब** महाराज हे मुख्यस्थानीं विराजमान झाले होते. अशा समयीं कथा ऐन रंगांत आली असून बोवांचे वक्तृत्वानें श्रोते मंडळी दंग होऊन राहिली होती, इतक्यांत **गोपाळराव** जमखिंडीकरांनीं बोवांस उद्देशून ह्मटलें कीं, '**बापू गोखल्यां**वर आपला वरदहस्त होता तरी त्यांचा निर्वंश होऊन मागें नांव घेण्यास त्यांचें कोणीच उरलें नाहीं!' ही उक्ति ऐकून बोवांस वाईट वाटलें, पण तें सहन करून **बुवासाहेब** महाराजांस उद्देशून ह्मणाले कीं, 'याचें उत्तर देऊं कीं काय?' महाराजांनीं उत्तर देण्याचें सुचविल्यावर ह्मणाले:—
'स्वामिकार्ये गते प्राणे अंते तिष्टति माधवः ॥ **बापू गोखले** स्वामीकार्यार्थ रणांत पडले ह्मणून ते परलोकीं अक्षयी आनंदांत निमग्न आहेत, पण जे दगाबाजी करून परत

[फे]ब्रुवारीचे १९ वे तारखेस **बापू गोखले** स्वर्गस्थ झाले. [स]न १८४२ त **बापू** गोखल्यांचें कुटुंब **यमुनाबाई** ह्या [ब्र]ह्मावर्ती मरण पावल्या.

२८. पेशव्यांचा पाठलाग करीत असतां एक **अन्या**[बा] घाटे यास मांडींत पिस्तुलाची गोळी लागली होती. [दु]सरे **विठ्ठलपंत** ताल्या पुणेकर यांस हाताचे कोपऱ्यावर आणि उजवे कानावर तरवारीचे वार लागले असून छातीं[तू]न पिस्तुलाची गोळी पार गेली होती. हे दोघे इंग्लिशांचे भीतीनें अर्ध कोशपर्यंत खरडत खरडत जाऊन प्राण वांचविते झाले. **भगवंतराव** दमने यांचा तोफेचा गोळा लागून एक पाय उडाला; त्यांस ३०० रुपये पेनशन होतें. त्याचप्रमाणें **गोविंदराव** कोकरे मेले. त्यांचा मुलगा **पर्वतराव** यास आठशें रुपये पेनशन होतें. किकलिकर बाबर यासही पेनशन होतें. गोखल्यांचे शिलेदार कांहीं ब्रह्मावर्तास जाऊन श्रीमंतांजवळ राहिले. पुण्यास जे आले त्यांस इंग्रज सरकारानें गांव पेनशनें दिलीं. भगवंतराव निगडे अष्ट्यास जखमी झाले. वरील शिलेदारांची अशी स्थिति झाल्यावर **बापूचा** रामबाण घोडा जो बरोबर होता तो उधळून **बाजीराव** साहेबांचे पळांत आला. तो **बापू गोखल्यां**ची स्त्री **यमुनाबाई** यांनीं पाहिला, तो रक्तानें भरला होता.

सातारकर महाराज अष्टी येथें इंग्लिशांचे हस्तगत झाल्याचें आह्मी वर सांगितलें आहे. त्यांस ग्रांट साहेब बरोबर देऊन साताऱ्यास रवाना केलें. त्यांशीं एप्रिल महिन्यांत इंग्लिशांनीं तह करून त्यांस साताराचे गादीवर बसविलें. अष्टीस पोंचण्याचे पूर्वीच **नरसू** काकडे व

**खंडूजी** शिंदे यांजबरोबर **एल्फिन्स्टन** साहेबांकडे निरोप पाठविला होता कीं, आमची कांहीं तरी सोय लावावी ! त्यावरून महाराजांस कांहीं मुलुख स्वतंत्र तोडून दिला. कप्तान ग्रांट डफ यांस सातान्यास पाठविलें होतें त्यांसच तेथें रेसिडेंट केलें. अष्टी येथील छाप्यांत नागुजीराव घाटगे झुंझाराव बुधमलवडीचे देशमुख हे सांपडले. महाराज मागें फिरले पण ते मागें फिरेनात. ते ह्मणाले, 'आमचे सतकुळींत असें झालें नाहीं.' **नागोजीरावा**ची फार विनयानें साहेबानें समजूत करून शेवटीं त्यांस मागें फिरविलें. हा सर्व कारभार आटोपल्यावर **बाजीराव**साहेबांस पकडण्याचें काम त्यांनीं पुनः चालू केलें.

**बाजीराव**साहेबांजवळ फौज नाहीं. फौज जी काय होती ती इंग्रेजांचीं पलटणें ! **फोर्ड** साहेबानें आयतेवेळीं **मोरदीक्षित** यांजपाशीं असा जबाब दिला कीं, 'एल्फिन्स्टन साहेब व आह्मी एका बादशाहाची रयत, आह्मी त्यांच्याशीं लढणार नाहीं'!' हें ऐकून **बाजीराव** सासव-

१ बाजीरावास होळकरानें पुण्याहून पळविला तो जनरल वसली यांणीं परत आणिला. तेव्हांपासून इंग्रेजांची फौज पांच हजार दापोलीस येऊन तीवर कर्नल फोर्ड ह्मणून सरदार असे. त्यास पोट साहेब असेंही ह्मणत. ही फौज ठेविल्यावर बाजीराव फार माजून त्याणें सरदार व पागा वगैरे सर्व बरतर्फ केल्या. तोफखाने व हुजूरपागा वगैरे सर्व बाळोजी कुंजर दिवाण यांचे कारकीर्दीत बुडाले. पुढें इंग्रेजाशीं युद्धाचा प्रसंग आला तेव्हां फोर्ड साहेब यांजकडील वकील मोरदीक्षित नाना मराठे वसईकर हे असत, त्यांस ताकीद केली कीं, 'फोर्ड साहेबांस एल्फिन्स्टन साहेबांशीं लढावयास बोलवावा.' त्याप्रमाणें त्यांणी त्यांस बलाविलें; परंतु साहेबांनीं उद्यां, परवा, ह्मणतां ह्मणतां पंधरा दिवस लोटले. तेव्हां श्रीमंतांस राग येऊन ते मोरदीक्षितास रागें

ग्रास पळाले. तेथून खटावास गेले. सारांश शेवटीं पळतां पळतां थकले आणि **मालकम** साहेबांस शरण गेले. अष्टें येथेंच **यमुनाबाईनें** घोडा रक्तानें भरलेला पाहिला; तरी **बापू गोखले** मरण पावल्याची खातरी त्यांची होईना. बाई **बाजीराव** साहेबांचे लष्कराबरोबर तीन मुक्काम होती, नंतर वडुतास अभ्यंकरांचे घरीं आपले माहेरीं आली. पटवर्धन, निपाणकर हे फौजेंत कोणी शहाणा नाहीं ह्मणून मागें उलटून आपले संस्थानांत शिरले. **बाजीराव**साहेब वराडाकडे गेले. नंतर तेथून अशीरगडाकडे गेले. अशीरगडाखालीं **मालकम**साहेबांची टोळी आढळली. मालकम साहेबानें **बाजीराव**साहेबांस नोटिस दिली कीं, "बारा तासांत बारा माणसांसह आमचे गोटांत यावें; नाहीं तर लढाई चालू होईल." इतक्यांत **रामचंद्रपंत** सुभेदार तेथें येऊन पोंचले. त्यांस श्रीमंतांनीं **मालकम**साहेबांकडे जाण्यास सांगितलें. सुभेदार प्रथम साहेबांकडे जाऊन नंतर **बाजीराव**साहेबही राज्याचा

---

भरले. त्यावरून मोरदीक्षित साहेबांकडे जाऊन बसले. तेव्हां साहेब म्हणाले कीं, 'नाना, तुम्हास आमची रीतभात ठाऊक नाहीं; तुमचे आह्मी चाकर खरे, परंतु एल्फिन्स्टनसाहेब व आम्ही एका बादशहाची रयत. आम्ही अपसांत लढलों तर आमचा बादशाहा आम्हास आमचे मुलखांत जाऊं देणार नाहीं, आणि आम्हीं तुमच्याकरितां म्हणजे परकीय लोकांकरितां स्वदेशीय लोकांशीं वैर केलें तर जातीबाहेर पडूं ! याकरितां आमची आशा तुह्मी धरूं नये. आह्मी अद्याप एल्फिन्स्टन साहेबांकडे मदतीस गेलों नाहीं, हीच तुमची मुरवत ठेवली; परंतु जर कारण पडेल तर आम्ही तिकडे जाऊं.' हें ऐकून नाना चक्क झाले आणि त्याच दिवशीं लढाईत पुढें हल्ल्यांत गेले ते ठार झाले.

लो. हि. संग्रहित ऐतिहासिक गोष्टी २७

वेदावा लिहून देण्यास साहेबांकडे गेले. मग कप्तान **लोह** यांस बरोबर देऊन **बाजीराव**साहेबांस प्रथम मथुरेस रवाना केलें. ही गोष्ट सन १८१८ जुलई महिन्याचे तिसरे तारखेस घडली. **अमृतराव** साहेबांस ज्याप्रमाणें कंपनी सरकारांतून आठ लक्ष रुपयांची नेमणूक दरसाल पोंचत होती त्याचप्रमाणें **मालकम** साहेबांनीं **बाजीराव** साहेबांस देण्याचें ठरविलें. आणि कानपुरानजीक भागीरथीचे कांठीं बिठुरास (ब्रह्मावर्ती) राहण्याची योजना केली. श्रीमंतांबरोबरचे सरदार व जहागिरदार यांस आपआपल्या ठिकाणीं साहेबांनीं रवाना केलें.

दक्षिणेंत सर्व सत्ता इंग्रेजांचे हातीं आली. **आप्पासाहेब** नागपूरकर यांस कैद केलें. दक्षिणेंतील जहागिरदार जे इंग्रेजांस वश होते त्यांच्या जहागिरी कायम ठेवून पूर्वापार चालत आलेलीं इनामें, वर्षासनें, वेतनें, चालू ठेवून प्रजेस संतुष्ट केलें. त्या वेळचे गवरनर जनरल **हेस्टिंग्स** साहेब त्यांचेसमान स्वभावाचे **एल्फिन्स्टन** साहेब या उभयतांनीं पूर्वीच्या रीतिरिवाजास अनुसरून व इकडील लोकांस सुखकारक होईल असा इंग्रेजी राज्याचा पाया घातला. तसेंच इकडील लोकांनीं विद्यामृत पान करावें ह्मणून मोठ्या खर्चानें शास्त्राध्ययनाची पुण्यास पाठशाळा घातली.

**बापू गोखले** अष्टें येथें मरण पावले, पण **यमुनाबाई**जवळ जीं माणसें होतीं तीं बाईस सांगत कीं, '**बापू गोखले** जिवंत आहेत!' बाईपाशीं एक ब्रह्मचारी होता तो तर असें सांगे कीं, '**बापू गोखले** मला काल भेटले. आज भेटले!' असें सांगे. ती गोष्ट **यमुना**-

बाईस सत्य वाटे. आणि ह्मणूनच त्यांनीं **बापू गो-खल्याची** क्रिया कधींच केली नाहीं. **बापू** लढाईंत पडलेले मीं पाहिले असें बाईपाशीं कोणीच सांगेना. यावरून बाईस शंका येऊन ती मोठ्या विवंचनेंत असे. ह्मणून वेदशास्त्रसंपन्न **निळकंठशास्त्री थत्ते** व **राघवाचार्य** या उभयतांस या गोष्टीचा शास्त्रार्थ विचारला. त्यावरून त्यांनीं ग्रंथ पाहून शास्त्रार्थ असा सांगितला कीं, 'कलियुगांत मनुष्याचे आयुष्याची मर्यादा शंभर वर्षें आहे; याचे तीन भाग. प्रथमचे तेहतीस वर्षांचे आंत पुरुषाचा ठिकाण नाहींसा झाला तर त्याचे स्त्रीनें छत्तीस वर्षेंपर्यंत सौभाग्यपणानें त्याची मार्गप्रतीक्षा करावी. ती मुदत होऊन भ्रतार न आला तर वपन करावें. दुसरा भाग तेहेतीस वर्षांपासून सासष्ट वर्षेंपर्यंत; या वयांत पुरुष नाहींसा झाला तर त्याची मार्गप्रतीक्षा चोवीस वर्षें करून नंतर वपन करावें. सासष्ट वर्षांपुढील वयाचा भ्रतार नष्ट झाला तर त्याच्या स्त्रीनें बारा वर्षेंपर्यंत सौभाग्यपणानें राहून नंतर वपन करावें.' या शास्त्राधारानें चोवीस वर्षें-पर्यंत सुवासिनीचा वेष बाळगण्याचा यमुनाबाईनें निश्चय केला. बाई त्या मुदतीचे आंतच ह्मणजे सन १८४२त ब्रह्मवर्तीं मृत्यु पावल्या; पुढें त्यांची व **बापू साहेबांची** क्रिया **बाबाजीपंत** गोखले यांचे पुत्र **रामचंद्रपंत** यांनीं ब्रह्मवर्तास केली.

**बाजीराव**साहेबांची व **मालकम** साहेबांची भेट अशीरगडाजवळ पांढरकवड्यावर झाली होती. त्या वेळीं श्रीमंतांनीं साहेबांस असें सांगितलें कीं, '**बापू गोखले** हे इमानी सरदार ळढाईंत पडले, त्यांजला संतति नाहीं

यांसाठीं त्यांचे कुटुंबास दत्त पुत्र देऊन **बापूच्या** नांवची जहागीर त्यांचे नांवें चालवावी, व त्यांजबरोबर जे सरदार शिलेदार खराब झाले त्यांचें चालवावें.' तें बाजीराव साहेबांचें बोलणें **मालकम** साहेबांनीं मान्य करून जहागीर चालू होण्याविषयीं चकदी देऊन **बाबा** पाछापुरकर व दाजीबा खांडेकर यांस एल्‌फिन्स्टन साहेबांकडे पुण्यास पाठविलें. **यमुनाबाई** वडुथास माहेरीं होत्या; पण त्यांचे वतीं **वासुदेवपंत** मामा मराठे हे पुण्यास साहेबांकडे जात येत असत. त्यांस **एल्‌फिन्स्टन** साहेबांनीं '**मालकम** साहेबांनीं लिहिल्याप्रमाणें दत्त पुत्र घेऊन आमचेकडे बोलण्यास पाठवावें, ह्मणजे जहागीर देण्याचें करूं' असें सांगितलें. पण बाईंनीं दत्तक घेण्याचें नाकारलें आणि आपलेच नांवानें जातीचा सरंजाम २७ हजारांचा होता तो चालू करविला. व शिवाय किरोली गांव देसाई यांजकडून गोखल्यांनीं २९ हजारांस विकत घेतला होता, तोही चालविला.

**बापू गोखले** पुण्यास आल्यावर त्यांनीं काळेबावरांत वाडा बांधला होता व ते रामभक्त व हनुमानभक्त असत ह्मणून राममंदिराचें काम सुरू केलें होतें, पण त्यांच्या हातानें तें पुरें झालें नाहीं. **यमुनाबाई** वडुथाहून निघून सासवडास आल्या. तेथें आल्यावर राममंदिराचें काम पुरें करविलें आणि त्याचे स्वास्थ्याकरितां दरसाल पांच हजारांची नेमणूक करून दिली. किरोली गांव तीन हजारांचा, व मोरोबा फडणीसांच्या बागेचें उत्पन्न पांचशांचें, एकूण पस्तीसशें रुपये तोडून दिले; व शिवाय पंधराशें खासगीकडचे बाई देत असत. या राममंदिरांतील कारभार **वि-**



ठ्ठल चिंतामण पुणेकरच पहात असत. मलीकवाडा या गांवचें उत्पन्न कर्नाटक प्रांतांतील विद्यार्थ्यांचे अन्नसत्राकडे लावून दिलें. बाईनें दत्तक घेऊन त्याचे नांवानें जहागीर चालावी अशी **एल्‌फिन्स्तन** साहेबांची फार इच्छा होती, आणि ती गोष्ट दोन चार वेळ कित्येकांजवळ ते बोलले, परंतु बाईचे मर्जीस तें येईना! कांहीं दिवसांनीं बाई ब्रह्मावर्तास गेल्या व तेथेंच गत झाल्याचें वर कळविलेंच आहे.

सन १८४२ मध्यें **यमुनाबाई** स्वर्गस्थ झाल्या, यांच्या मागें राममंदिराची व्यवस्था काय झाली ती सांगतों. किरोली गांव देवाकडे होता तो छत्रपतींनीं तहाहयात ठरवून जप्त केला. बाग इंग्रेजांनीं घेतली; ती हल्लीं शेट पदमजी यांजकडे आहे. असो. बाई मयत झाल्यावर **महादाजीपंत** ह्मणून एक गृहस्थ कोंकणांतून येऊन त्यांनीं बाईचा वारस मी असें सर्टिफिकेट १८४८ मध्यें जान वालटर हंटर जज्ज यांजकडून मिळविलें, आणि त्यांच्या कर्जासाठीं गोखल्यांचा वाडा व राममंदीर जप्त झालें. वाडा तर कर्जावारी विकला गेलाच, पण मंदीर विकूं नये ह्मणून पुजारी **रघुनाथभट** आपटे, कारकून **रामचंद्रपंत** भिडे आणि पुराणीक **कृष्णंभट** गोखले या तिघांनीं सरकारांत अर्ज्या वगैरे करून सन १८५० सालीं जप्ती दूर करविली. देवालय मोडकळीस आलें होतें ह्मणून त्याचा दुसरा मजला विकून आळीकर मंडळींनीं एकमजली देवालय चांगलें नीटनेटकें केलें. पुढें चरितार्थास नाहीं ह्मणून पुजारी उठून गेले. तेव्हां देवाल्याची व्यवस्था आळीकर मंडळी तर्फेच होत होती. कांहीं वर्षांपूर्वी विष्णुभट तरडे यानें आपली वहिवाट चालू केली. या

तरड्यांनीं अकरा मारुतींची स्थापना केली आहे. आतां मात्र रा० ब० नारायण भिकाजी जोगळेकर व रा० रा० पांडुरंग परशराम देशमुख यांजकडे देवालयाची व्यवस्था असून त्यांनीं पुष्कळ सुधारणा केली आहे व करणार आहेत. **बापू गोखल्यांचें** नांव काय तें इतकेंच मात्र उरलें आहे. असो. किरोली गांव ज्या वेळीं जप्त झाला तेव्हां कांहीं वर्षें त्यांणीं तें उत्पन्न सोडविण्याची खटपट केली, परंतु निर्फळ झाली. पुढें **विठ्ठलपंत** पुणेकर येथून निघून शितोळे यांजबरोबर ते शिंद्यांचे लष्करांत १८५५ सालीं गेले. त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव **रावजी विठ्ठल** यांस दिवाण सर राव राजे **दिनकरराव** यांनीं तेथें ह्मणजे लष्करांत चाकरी दिली. असो. **विठ्ठलपंतास** पेनशन देण्याविषयीं पुष्कळ साहेब लोकांचा अभिप्राय होता, पण अष्टे येथील लढाई होऊन पुष्कळ वर्षांनीं पेनशनाविषयीं अर्जी झाली ह्मणून ती मंजूर झाली नाहीं.

**तुकाराम** महाराजांनीं एके अभंगांत देवास असें ह्मटलें आहे कीं, 'देशील तर देवा असा सत्पुत्र दे कीं, ज्याचा तिहीं लोकांत झेंडा लागेल! नाहीं तर मुळींच वंशवृक्ष खुंटला तर फार चांगलें!' याचप्रमाणें **बापू गोखल्यां**विषयीं झालें. त्यांस एक पुत्र झाला होता, पण तो गत होऊन त्याची स्त्री सती गेल्याचें आह्मी मागें लिहिलें आहे. त्याजवर त्यांस संतति झाली नाहीं. आपल्या मागें आपलें नांव बुडूं नये ह्मणून पुत्र होऊन वंश चालावा, व पुत्राखेरीज मोक्षप्राप्ति नाहीं असें शास्त्रसंमत आहे; ह्मणून पुत्र न झाला तर पुरुषास शेवटीं औदासिन्य येतें. हा नियम वरील पुरुषास लागू नाहीं. पेशव्यांचा लौकिक जोंपर्यंत

आमच्या देशांत गाजत राहील तोंपर्यंत वरील पुरुषाचाही विसर आह्मास पडणार नाहीं. खर्ड्याच्या लढाईपासून तों तहत अष्टयाचे लढाईपर्यंत गोखले हें नांव या महाराष्ट्र देशांत गाजून गेलें होतें. त्यांतून विशेषतः पुणें शहरीं दोन तपें जें खड्ग झळकत होतें त्याच्या धारकाचें नांव बुडण्याची भीति ती कशाला? ज्याच्या पराक्रमाची सीमा नाहीं व जो सदां सत्यप्रतिज्ञ आणि यथान्याय चालणारा त्याचें नांव काळरूपी महासागरांत बुडण्याचें भय नाहीं. त्यांस पुत्ररूपी वल्ह्यानें तें काय तारायाचें आहे! स्वामिकार्ये गते प्राणे अंते तिष्ठति माधवः ॥ असें वचन आहे तस्मात् ज्याचा मृत्यु रणांगणीं झाला आहे त्या पुरुषास मोक्षसुख लाभण्याचा संदेह तो कोणता? त्यास पुत्र होऊन तरी अधिक तें काय होणार? असो. अशा थोर पुरुषाचा महिमा कोठपर्यंत वर्णन करावा? त्यानें आपलें नांव चिरस्थायी करून आमचे देशास अक्षय्य भूषण आणिलें, इतकी गोष्ट खरी.

आशिया खंडांतील राज्यपद्धतीपेक्षां युरोपखंडांतील सुधारलेली राज्यपद्धति उत्कृष्ट असें वारंवार आह्मी ह्मणतों यांतील तथ्य पाहूं गेलें तर इतकेंच आहे कीं, तिकडील राष्ट्रांत खरे दोष असतील ते कोणाचेही असल्यास ते उघडपणें बोलण्यास व लिहिण्यास प्रत्यवाय नाहीं. फार तर काय पण सरकारचे देखील दोष उघड केल्यास सरकार मोठ्या खुषीनें ते पत्करतें. इंग्लंडची राज्यरीती आह्मास जी आवडते ती इतक्याच साठीं. असें असून आमच्या राज्यकर्त्यांचा हा प्रांजळपणा कोणास न समजून इंग्लिशांचे शत्रु **बापू गोखले** यांचें

वर्णन कसें करावें! अशा वेड्या समजुतीनें आह्मास कोणी नांवें ठेवतील तर त्याबद्दल आह्मी काडीचीसुद्धां भीति न धरतां इतिहास लिहिणें तर तो जितका सत्य असेल तितका उत्कृष्ट, असें समजून हें चरित्र शेवटास नेलें. इंग्लिश लोकांत तर प्रत्यक्ष आपल्या शत्रूची खरी स्तुति करणारे शेकडों लोक आढळतील! ही गोष्ट मानवी प्राण्यास फारच भूषणदायक असून तिकडील लोकांच्या थोरपणाचें हें लक्षण होय. इंग्लंडचे इतिहासकारांत असा मोकळ्या मनानें व प्रांजळबुद्धीनें जो लिहिणारा असेल त्यालाच मान फार आहे. असो. याच थोर नीतीस अनुसरून **मालकम** साहेब आणि **एल्फिन्स्तन** साहेब यांनीं **बापू गोखले** यांचा सद्वंशवृक्ष वाढवावा अशी इच्छा केली होती.

आमच्या राष्ट्रांत जे थोर थोर आणि प्रतापी पुरुष होऊन गेले आहेत, त्यांचें यश वर्णन करण्यास आह्मास अखंड जागा असून युरोपांतील किंवा अमेरिकेंतील राष्ट्रांकडे पाहण्याची जरूर नाहीं. यावरून तिकडील सर्वमान्य होऊन गेलेल्या पुरुषांचा आह्मी अवमान करितों असें बिलकुल नाहीं; पण तिकडील देशस्थिति, रीतरिवाज आमचेपेक्षां फारच भिन्न असल्यानें इकडील पुरुषांचे वर्तनाचा ठसा जितका लवकर वाचकांचे मनावर उठेल तितका लवकर तिकडील पुरुषांचा उठणार नाहीं. तसेंच प्रत्यक्ष पूर्वजांचे गुण आणि पराक्रम ऐकून आह्मास जी वीरश्री वाटते आणि स्फुरण येतें तें परदेशीय पुरुषांविषयीं ऐकून तितकी येणार नाहीं.

आतां या स्थळीं स्वतःविषयीं कांहीं लिहिणें राहिलें आहे तें लिहून आमच्या प्रिय वाचकांची येथें रजा घेतों.

थोरांचीं चरित्रें गाण्यास थोरच पुरुष पाहिजेत. जसें पांडवांचे यश वर्णन करण्यास व्यासावांचून दुसऱ्याची बुद्धि झाली नाहीं. श्रीरामचंद्राचें यशवर्णन वाल्मिकीच्यांच हातानें शेवटास गेलें, नाहीं तर असें सुंदर कार्य दुसऱ्याकडून तडीस गेलें नसतें. सारांश थोर मनाचे पुरुषावांचून थोरांचा महिमा कळायाचा नाहीं. याप्रमाणें या थोर पुरुषाचा ह्मणजे या चरित्रांतील नायकाचा महिमा कळण्यापुरती या ग्रंथकारास बुद्धि नाहीं. तो या न्यूनतेबद्दल फार खजील आहे. त्याच्या हातानें हें काम चांगलेंसें पार पडण्याची तर त्याला आशाच नाहीं. पण फक्त या चरित्रांतील नायकाचीं दोन अक्षरें उपलब्ध व्हावीत एवढ्याच हेतूनें त्यानें लहान तोंडीं मोठा घांस घेतला आहे. यांत चुका होण्याचा तर जाणूनबुजून संभव आहेच तर त्याबद्दल रसिक आणि मर्मज्ञ वाचक क्षमा करतील आणि त्यांचे आवडीचा कांहीं गुणलेश यांत असल्यास तो प्रीतीनें ग्रहण करतील अशी आशा आहे.

समाप्त.

# परिशिष्टें.

## प्रकरण १.

गोखले यांचा तैनात जावता. सलास अशरमैयातैन अलफ १८१३ इ०.

| | |
|---|---|
| जातीस चिरंजीवसुद्धां ३००० स्वार .... | ९६०००० |
| गाडदी २५०० .... .... .... | ३०२५०० |
| तोफा नग ५ .... .... .... | ३२५०० |
| सरंजाम. | १३२०००० |

१. नवलगुंद सरदेसकत व मामले तोरगल.
२. गदक देखील देसकत.
३. डंबळ.
४. लोखडी वगैरे गांव.
५. इंडी.
६. परगणें अलमेलें.
७. कसबे मलवडी व बुध.
८. अळूर.
९. संमतकलकिरे.
१०. मोजे कुमसी सातळगांव.
११. जकात नाका पाटस.
१२. कसबे ह्मसवड.
१३. परगणें कडेवाळित्.
१४. परगणें शेवली.

१. इनाम पत्रांत इनाम तिजाईसुद्धां लिहिलें नाहीं

सर्वत्र सरकारांत दोन साला आड जाऊन तिसरे सालीं गांवचा आकार सरकारांत घ्यावयाचा.

२. सरंजामास महाल व गांवचा अम्मल वगैरे लावून दिला आहे. त्यांत दुमाले गांव व जमिनी व देवस्थानें वर्षासनें वगैरे वजा दिल्या आहेत त्याप्रमाणें चालवावें. चालवण्यास दिक्कत आढळेल तर तो प्रकार हुजूर आणवून समजावून आज्ञा होईल त्याप्रमाणें करीत जावें.

३. नागो श्रीनिवास यांचे नांवें खर्च लिहिला आहे त्यास यासुद्धां इनामपत्रें पहावीं, त्या पत्रांत पुत्रपौत्रादि असल्यास चालवावें. नसल्यास जमिनी जप्त करून आकार हुजूर पावता करावा.

४. परगणें अलमेलेंपैकीं भट ब्राह्मणाकडे जमिनी आहेत त्यांचे नांवनिशीत हल्लीं कोण, व पुत्रपौत्रादि चालण्याच्या कोणत्या आहेत, याची चौकशी करून झाडा आणून सरदेशमुखीसुद्धां दुमाला लिहित जावें. त्यांचीं पत्रें यादी नसल्यास सरदेशमुखीचा वसूल घ्यावा.

## प्रकरण २.

वंशावळींत जे पुरुष पराक्रमानें उदयास आले नाहींत त्यांचा वंश सोडून बाकीच्यांची मात्र हकीकत लिहिली आहे.

## हकीकत.

१. गणेश बल्लाळ हे पेशवे सरकारचे फडावर कारकून होते.

१. धोंडो बल्लाळ यांजला प्रथम कोकणपट्टींत बेरड व रामोशी यांचे बंडाचे बंदोबस्तास नेमलें. नंतर बदामी वगैरे किल्ले हे हस्तगत करण्याकरितां श्री० सवाई माधवराव साहेब पेशवे यांचे कारकीर्दींत श्री० परशराम भाऊ पटवर्धन यांजबराबर सरदारीची नेमणूक करून पाठविलें. पुढें ज्यास्ती फौजेची नेमणूक करून कर्नाटक प्रांतीं बंदोबस्ताकरितां ठेविलें. सावनूर बंकापूर व कोल्हापुरचें राजमंडळ यांत झालेले खटले यांचा बंदोबस्त यांजकडून करविला. टिपू सुलतानाचे पदरचा सरदार धोंडजी वाघ बिघडून पेशवे सरकारचा मुलूख कर्नाटक प्रांत यांत येऊन दंगा करूं लागला त्याचे बंदोबस्ताचे कामांत यांचे मदतीस श्री० चिंतामणराव आपासाहेब पटवर्धन यांस दिलें होतें. पुष्कळ दिवस तो खटला चालून अखेर हालिहाल्याळानजीक मोठी लढाई होऊन त्यांत धोंडो बल्लाळ हे व त्यांचे पुतणे आपासाहेब, बापूसाहेब गोखले यांचे वडील बंधु हे पडले. बापूसाहेब गोखले व आपासाहेब पटवर्धन यांस जखमा लागल्या.

१. बापूसाहेब गोखले यांणीं वसली साहेब इंग्रज सर-

कारचा आश्रय करून धोंडजी वाघ याचा पराभव करून त्यास ठार मारिलें, नंतर कांहीं दिवस तिकडेसच राहून होळकर यांणीं श्री० बाजीरावसाहेब पेशवे यांजबराबर पुणें मुक्कामी लढाई केल्यावर बाजीराव साहेब वसईस गेले. पुढें बापूसाहेब यांजला पुणें येथें बोलावून आणून सरदारीची नेमणूक फौजेसुद्धां करून दिली, त्या खर्चाकरितां व सरदारीबद्दल मिळोन चौदा लक्षांचा मुलूख दिल्यानंतर मेहेरबान जनरल वसली साहेब यांजबराबर शिंदे व होळकर यांचे बंदोबस्ताकरितां दिले. तो बंदोबस्त झाल्यावर साहेब बहादूर यांजबराबर परत आल्यावर प्रतिनिधि व सुरापुरकर बेरड राजे व रामोशी व भिल या लोकांचा दंगा व कर्नाटक प्रांतीं किल्ल्यांचे बखेडे मोडून टाकण्याचा बंदोबस्त यांजकडून करविला.

शके १७३९ चे सालीं बाजीराव साहेब पेशवे व इंग्रज सरकारची लढाई पुणें मुक्कामीं झाली त्यांत मुख्यत्वें करून हे होते. कोरेगांवास जी मोठी लढाई इंग्रज सरकाराशीं झाली ती यांणीं दिली. त्या उपरांत श्रीमंत बाजीराव पेशवे यांबरोबर असून पंढरपुरानजीक गोपाळ अष्टे येथें लढाई मेहेरबान एल्फिन्स्टन साहेब बहादूर यांजबरोबर होऊन त्यांत बापू साहेब पडले.

१. रामाजीपंत हे मिरजकर पटवर्धन यांचे पदरीं खासगीचे कामावर होते. त्यांचे पुत्र विसाजीपंत वगैरे पांच बंधु त्यांचेच पदरीं होते.

१. नंतर यांपैकीं विसाजीपंत व भास्करपंत यांस धोंडो बल्लाळ गोखले यांणीं आपले जवळ बोलावून घेऊन ठेविलें. धोंडजी वाघ याचे लढाईंत बरोबर असून शेवट धोंडजी

वाघ याचा पराभव होऊन तो मरेपर्यंत बापूसाहेब यांज-बरोबर होते. तसेंच त्यांजबरोबर असून बाजीराव साहेब यांणीं बापूसाहेब यांजला कर्नाटक प्रांतांतून बोलावून आणिवलें ते समयीं हे उभयतांही बरोबर होते. बापूसाहेब यांचे सरदारकीचे नेमणुकींत या उभयतांचाही नेमणुकीचा ठराव करून दिला. पुढें वसली साहेब यांजबरोबर शिंदे व होळकर यांचे बं-दोबस्ताकरितां होते. तिकडून परत आल्यावर प्रतिनिधींचे किल्ले व त्यांचा व सुरापूरकर बेरड व भील व रामोशी यांच्या बंडाचा बंदोबस्त बापूसाहेब हे श्रीमंतांजवळ राहून यांचे हातून करविला. त्या बंदोबस्ताचे कामांत ज्या ल-ढाया वगैरे झाल्या त्या यांणीं केल्या. नंतर श्रीमंत बाजी-रावसाहेब यांणीं व विसाजीपंत यांणीं सदर्हु केलेलीं कामें पाहून यांची सरदारकीची नेमणूक स्वतंत्रपणें फौजेसुद्धां करून दिली. त्यांत दुसरे चार बंधूंसुद्धां नेमणुकीचा ठराव झाला. पुढें इंग्रज सरकारच्या व पेशवे सरकारच्या ल-ढाया पुणें व कोरेगांव व गोपाळ अष्टें वगैरे ठिकाणीं झा-ल्या. त्या लढायांत विसाजीपंत व भास्करराव हे बरोबर असून कामें केलीं. अशीरगडपर्यंत हे श्रीमंत यांजबरोबर होते. पुढें श्रीमंत यांणीं मेहेरबान मालकम साहेब हिं-दुस्थानचे कमिशनर यांची भेट घेऊन त्यांचे ताब्यांत गेल्या-वर परत जाण्याविषयीं यांजला निरोप झाला. पुण्यास आल्या-वर मेहेरबान अलपिष्टण साहेब यांणीं विसाजीपंत यांची व त्रि-वर्ग बंधु व पुतणे यांच्या नेमणुका स्वार व पायदळ मि-ळोन एकंदर १०१८०० रुपयांची नक्त नेमणूक करून दिली. दोन वर्षें याप्रमाणें चालून पुढें स्वार व पायदळ हा खर्च कमी करून सर्व खासे मिळोन जातीची नेमणूक

पस्तीस हजार रुपयांचें सरंजामी गांव दिले. ते विसाजीपंत मरेपर्यंत चालले. पुढें सरकारानें भास्करपंत व दिनकरपंत व नारोपंत व पुतणे पुरुषोत्तम सखाराम यांस मिळून १०००० रुपये पेनशन ठरवून दिलें. भास्करपंत हे सरकारचा अम्मल झाल्यावर बंदोबस्ताचे कामांत उपयोगी पडले सबब बक्षीस देऊन अलपिष्टन साहेब विलायतेस जातेसमयीं एक हजार रुपये पेनशन ज्यास्त करून दिलें.

सखारामपंत हे सातपुड्यांत भिलांचे वंदोबस्ताकरितां पेशवे सरकारांनीं नेमिले होते त्या कामांत पडले. सदर्हुप्रमाणें इतिहास आहे.

## कोणते पुरुष कधीं मृत झाले त्याचा तपशील.

१. धोंडोपंत व अप्पा साहेब हे उभयतां धोंडजी वाघ यांजबरोबर झालेले लढाईत पडले. शक मित्ती ध्यानांत नाहीं. १८०१.

१. बापू साहेब, गोपाळ अष्टें येथें लढाईत पडले. शके १७३९ माघ शुद्ध १९ सन १८१७.

१. विसाजीपंत शके १७४३ भाद्रपद वद्य ६ सन १८२१ रोजीं पुणें येथें मरण पावले.

१. भास्करपंत सन १८३९ तारीख ८ जून सन १८६० रोजीं पुणें येथें मरण पावले.

१. सखारामपंत, सातपुड्यांत भिल लोकांचें वंड मोडण्याचे कामांत शके १७२९ सालीं पडले.

१. दिनकरपंत शके १७४९ कार्तिक वद्य ११ स मिरज येथें मरण पावले.

## प्रकरण ३.

यादी बापूजी गणेश गोखले हे सरकार श्रीमंत पेशवे यांजकडील सरदार यांची वंशवृद्धि होण्यांत येऊन त्यांचें यथास्थित चालावें असें श्रीमंतांचे लक्षांत येऊन त्यांची स्त्री यमुनाबाई यांणीं दत्तकपुत्र घेऊन त्याचें नांव धोंडो बापूजी ठेवावें अशी आज्ञा झाली होती. पुढें श्रीमंतांची व जनरल सर जान मालकम साहेब बहादूर यांची भेट सन १८१८ इसवीचे सालीं झाल्यावर मोहोचे मुक्कामीं गोखले यांची जहागीर कंपनी सरकारांतून चालवावी येविषयीं श्रीमंतांचे आज्ञेप्रमाणें जनरल साहेब यांचे बोलण्यांत आलें त्याजवरून जनरल साहेब यांणीं मान्य करून धोंडो बापूजी यांचे नांवाचीं वस्त्रें अलंकार कंपनी सरकारांतून दिले, व त्यांचे जहागिरीचा बंदोबस्त होण्याबद्दल एल्फिन्स्टन साहेब बहादर यांचे नांवें पुण्यास पत्रें देऊन गोखले यांजकडील स्वार वगैरे सुद्धां त्यांजकडील सरदार यांची रवानगी पुण्यास करावी असें जनरल साहेब यांचे सांगण्यांत आलें. त्याबरहुकूम स्वार वगैरे सरंजामसहित सरदार यांची रवानगी झाली. ते समयीं सरदार यांसही जनरल साहेब यांणीं वस्त्रें देऊन निरोप दिला. त्याप्रमाणें धोंडो बापूजींचें दत्तविधान व्हावयाचें तें यथाविधि होऊन त्यांचा बंदोबस्त कंपनी सरकारांतून करून देऊन चालविलें पाहिजे. जनरल सर जान मालकम साहेब गवरनर हे सरकार दौलत मदार कंपनी सरकारचे मुकत्यार उमराव होते. त्यांची नेकनामी सर्वत्र जाहिर आहे, त्यांणीं पेशजी महूचे

१० गोखले यांजविषयीं श्रीमंतांचा निरोप मनांत आणून

मान्य केलें आहे त्या पक्षीं सुप्रेनल गवरमेंट यांची उत्तम सत्कीर्ति व नेक अवसाफ दुनियेत प्रसिद्ध तेथून गोखले यांजवर मेहेरबानगी अवश्य होण्यांत आली पाहिजे येविषयीं मेस्तर इरवीन जिमे दप्तर कमिशनर यांचे दसकतानिशी याद रा० रामचंद्रपंत सुभेदार यांणीं ब्रह्मवर्ताहून पाठविली, ती पेशजी सरकारांत दिली आहे तीं बजाबावा बसली साहेब बहादूर यांजवळ गोखले यांणीं लढाईचें काम पडलें तेथें चाकरी बजावीत आले त्याजवरून साहेब बहुत खुशी होऊन दोस्तीचें पत्र करून दिलें आहे तें पाहण्यांत येऊन साहेबीं मेहेरबानगी करून सदर्हु लिहिल्याप्रमाणें सरंजामाचा बंदोबस्त करून देऊन पुत्र घेण्याचा हुकूम झाला पाहिजे.

सदर्हुप्रमाणें याद राईट हनराबल जान आरल आफ् क्लेर साहेब गवरनर जनरल जंजिरे मुंबई यांजकडे देणार त्याची नकल असे. मित्ती भाद्रपद वद्य २ गुरुवार शके १७९३ सन १२४१.

# प्रकरण ४.

जाहिरनामा सरकार दौलत मदार कंपनी इंग्रज बहादूर सुमासमान अशरमयातैन व अलफ.—तमाम लोकांनीं जाहिरनामा समजून त्याप्रमाणें वर्तणूक करावी याजकरितां लिहिलें जातें जे, बाजीरावसाहेब राज्यावर आल्या दिवसापासून नानाप्रकारचे बंड व बखेडे होत होते. राज्यांत व मुलखांत कधींही हुकमत चालली नाहीं. पुढें होळकर यांचा दंगा झाला, ते राज्य सोडून पळून वसईस जाऊन खंडेराव रास्ते यांचे मदतीनें गुजराण करून राहिले. नंतर कंपनी सरकारची दोस्ती केली, त्याजवरून कंपनी सरकारची फौज येऊन बाजीरावसाहेब यांस गादीवर बसवून तमाम बंडें व बखेडे होते ते मोडून मुलखांत बाजीरावसाहेब यांचा हुकूम चालू करून दिला. पहिल्या दंग्यामुळें व पुढें दुष्काळ पडला त्याणें मुलूख बहुत उद्ध्वस्त झाला होता तो कंपनी सरकारचे भरंवशावर अबाद झाला. बाजीरावसाहेब याणीं मामलती मक्त्यांनीं लाविल्या. ते मक्तेदार रयतेपासून ज्यास्ती ऐवज घेत गेले तत्रापि बहुत आबादी झाली. ज्या मुलखाचा ऐवज जमा झाला त्यावरून बाजीरावसाहेब यांणीं दौलतीचा खर्च व ऐपआराम करून खजिना बहुत जमा केला. मराठे सरदार यांजवर बाजीरावसाहेब यांचा दाब बहुत दिवसांपासून नवता तो लागू करावा असें कंपनी सरकारांतून कबूल केलें नवतें. वाजवी असेल तें चालतें करून घ्यावें अशी कंपनी सरकारची खायश होती. त्याजवरून गाइकवाड यांजकडील जाबसाल ठरावयाकरितां गायकवाड यांणीं आपले कारभारी गंगाधरशास्त्री यांस

कंपनी सरकारचे बहादरीवर पुण्यास पाठविलें, ते येऊन बहुतेक जाबसाल लवकर उलगडेलसें झालें होतें. त्यांत बाजीराव साहेब यांची किफायत बहुत होती. इतक्यांत गंगाधरशास्त्री यांस बाजीराव साहेब यांचे कारभारी यांणीं पंढरपूर क्षेत्रांत मारिलें. त्या वेळेस तमाम रयत व यात्रेकरू वगैरे सर्व ह्मणत होते कीं, शास्त्री यांस त्रिंबकजीनें बाजीरावसाहेब यांचे हुकुमाशिवाय मारिलें नाहीं. असें असतां बाजीरावसाहेब दोस्त मोठे दौलतदार असें करवितील हा गुमान मनांत न आणितां ज्या त्रिंबकजीनें मारिलें त्यास हवालीं करून घ्यावा असा कंपनी सरकारचा विचार होऊन त्रिंबकजीस हवाली करावा असें बोलणें पडलें तेव्हांच हवालीं करावा तो न केला याजकरितां कंपनी सरकारची फौज बहुत जमा झाली. नंतर त्रिंबकजीस हवालीं केलें, त्या समयीं कंपनी सरकारचा खर्च बहुत झाला. तो दोस्तीवर नजर देऊन न मागतां त्रिंबकजीस हवाली करून घेतला आणि पहिली दोस्ती चालत होती त्याप्रमाणें कायम ठेविली. नंतर बाजीरावसाहेब यांणीं बाहेरचे सरदारांस पत्रें पाठवून त्यांची फौज तयार करावी अशी तजवीज केली व आपले राज्यांत बंडे उभीं करून बंडाचे कुमकेकरितां आपली फौज तयार करून कंपनी सरकाराशीं लढाई पडावी आणि नुकसान व्हावें अशी तजवीज करूं लागले. त्याजकरून बखेडा मोडावा याजकरितां कंपनी सरकारची फौज तयार होऊन पुण्यास आली आणि बाजीरावसाहेब यांस शहराभोंवती तंबी केली ते वेळेस बाजीरावसाहेब हातीं सांपडले होते ते व मुलखाचा बंदोबस्त करावयाजोगी कंपनी सरकारची फौज बहुत तयार होती, परंतु तहनामा

झाल्यापासून हरवक्त बाजीरावसाहेब यांचें बोलणें पडत होतें. जें आह्मास राज्य प्राप्त झालें व आह्मी ऐषआराम करितों हें सर्व देणें कंपनी सरकारचें आहे. आमच्या शुकर गुल्जरा कंपनी सरकारचे भरंशावर होत आहे असे तऱ्हेनें बहुत बोलत होते. याजकरितां गादी कायम ठेवून पुढें त्यांचे हातून फिसाद न व्हावी याजकरितां वसईचा तहनामा कायम ठेवून नवा तहनामा झाला. ५ हजार स्वार व ३ हजार पायदळ मदतीस देत जावें असा बाजीरावसाहेबांचा पहिलाच करार होता ती फौज कंपनी सरकारांतून ठेवावी असें होऊन फौजेचे खर्चास मुलूख लावून दिला तेव्हांपासून दोस्ती पहिल्याप्रमाणेंच चालली. नंतर पेंढारी चोहोंकडे रयतेस उपद्रव दरसाल करितात त्यांत बाजीरावसाहेब यांचे मुलखास बहुतच उपद्रव होतो याजकरितां पेंढारी यांचा बंदोवस्त झाल्यानें आमची किफायत बहुत आहे याजकरितां आह्मीही फौजेस सामील होतों असें खातरजमेनें बोलून त्या बहाण्यानें कंपनी सरकारचे आश्रयावर जो खजिना जमा केला होता तो ऐवज बाहेर सरदारांस पाठवून त्यांस बिघडविलें, व आपली फौज तयार केली. कंपनी सरकारची फौज जवळ होती ती दूर जावी याजकरितां २ हजार स्वार कंपनी सरकारचे फौजेबरोबर देऊन फौज दूर गेली अशी संधी पाहून एकाएकीं कांहीं कारण व जावसालाची तक्रार नसतां फौज तयार करून चालून येऊन कंपनी सरकारचे फौजेशीं लढाई केली, व कोणत्याही मुलखांत चाल नाहीं तशी चाल करून इंग्रजी वकिलांचे बंगले व छावण्यांची जागा लुटून जाळली, व कंपनी सरकारची रयत व वाटसरु मैन्याचा भरंवसा धरून

येत होते त्यांस धरून कैद केलें, व कितीएक लुटले, व दोन इंग्रजी सरदार मुंबईहून येत होते त्यांस तळेगांवाजवळ चोराचेंही पारिपत्य करीत नाहींत त्या तऱ्हेनें मारिलें. ते अद्यापि चाकरीवर आहेत त्याजवरून बाजीरावसाहेब यांचे हुकुमाशिवाय मारिलें नाहीं असा निश्चय होतो, व ज्या त्रिंबकजीनें गंगाधर शास्त्री यांस मारिलें त्यास जवळ आणून कारभारांत वागवूं लागले. त्याजवरून बाजीरावसाहेब यांचे हुकुमाशिवाय मारिलें नाहीं असें पहिल्यापासून लोक बोलत होते तो मुद्दा शाबीत करून घेतला, व पेंढारी बोलावून मुलूख लुटावा अशी तजवीज करूं लागले. या तऱ्हेचे दौलतदारीचे संप्रदाय सोडून वर्तणूक करून कंपनी सरकारास बुडवावें असें केलें. त्याजवरून कंपनी सरकारांतून निश्चय झाला. जे बाजीरावसाहेब या राज्याचे उपयोगी नाहींत. याजकारितां यांस बिलकुल राज्यांतून काढून कंपनी सरकारांतून मुलूख व किल्ले काबीज करून अम्मल करावा अशी तजवीज होऊन एक सडी फौज बाजीरावसाहेब यांचे मागें रवाना करून एक फौज किल्ले घ्यावयाकारितां जात आहे, व दुसरी एक फौज अहमदनगराजवळ येऊन पोंहोंचली आहे, एक मोठी फौज खानदेशांत आली आहे, व जनरल मनरो साहेब कर्नाटकाचा बंदोबस्त करीत आहेत, व मुंबईकडून फौज येऊन कोंकणचे किल्ले घेऊन त्या प्रांताचा बंदोबस्त करीत आहेत. आतां थोडे दिवसांत बाजीरावसाहेब यांचा ठिकाण नाहींसा होऊन महाराज छत्रपती सातारकर बाजीरावसाहेब यांचे कैदेंत आहेत त्यांस सोडवून घेऊन मोकळे करून त्यांचे व त्यांचे मंडळीचे शानशोकीकारितां कांहीं राज्य त्याकडे चालेल अशी तजवीज

कंपनी सरकाराकडून होऊन साताराचे किल्ल्यावर महाराजांचा झेंडा कायम करून त्यांचे तर्फेचे लोक होते त्यांची खातरी केली आहे. त्यास जो मुलूख महाराज यांजकडे होईल त्यांत न्याय इनसाफ व हुकमत व अम्मल ते करतील. कंपनी सरकारांत मुलूख राहिले तेथें कंपनी सरकारचा अम्मल होईल, परंतु कोणाचे वतनास व इनामास व वर्षासनास व देवस्थानाचे खर्चास व खैरातीस व कोणाचे ज्ञातीचे धर्मास खलेल न होतां वाजवी असेल तसें सुरळीत चालेल, व वाजीरावसाहेब मक्तेदारास मामलती देत होते तें तहकूब होऊन कमावीसदार यांजकडे मामलती सांगून जो वाजवी ऐवज असेल त्याची उगवणी होईल. कोणावर जुलूम ज्यास्ती कांहींएक होणार नाहीं येविषयीं कोणीही अंदेशा घेऊं नये. बाजीराव साहेब यांजकडे जे चाकरीस असतील त्यांणीं चाकरी सोडून आजपासून दोन महिन्यांत आपले घरीं यावें. जे कोणी न येतील त्यांचीं वतनें जप्त होऊन खराबी झाल्याशिवाय राहणार नाहीं. जमीनदार यांणीं आपआपले परगण्यांतील जे कोणी बाजीरावसाहेब यांजकडेस चाकरीस असतील त्यांची याद नांवनिशीवार तूर्त समजवावी. चाकरी सोडून जसजसे घरीं येतील ते वेळेस समजावीत जावें. बाजीराव साहेब यांची कुमक करूं नये, व त्यांजकडे वसूल एकंदर देऊं नये. न दिल्यास साल मजकुरीं मुलखास उपद्रव लागला आहे त्याची दर्याप्ती होऊन सूट मिळेल, बाजीराव साहेब यांजकडे वसूल दिल्यास तो ऐवज मजुरा न देतां दरोबस्त घेतला जाईल, व जमीनदार कुमक करतील, व ऐवज न देतील तर त्यांचीं वतनें व जमिनी त्यांजकडे चालणार नाहींत, व लष्कर-

वाले व हरएक जे कोणी मुलूख लुटतील व वाटा मारितील ते जिवानिशीं गेल्याखेरीज राहणार नाहींत. तारीख ११ माहे फेब्रुवारी सन १८१८ इसवी मुसलमानी चंद्र रा. ख.

**बमाजी बेहुकूम एल्फिन्स्तन साहेब बहादूर**

## प्रकरण ५.

Bapoojee Ganesh Gokhley joined me with the body of Maharatha Troops under his command in the Month of March 1803, when I was on my march to Poona with the British Troops to restore the Peshwa to the exercise of the powers of His Highness's Government. This service having been effected by the arrival of His Highness at Poona, Bapoojee Ganesh Gokhley accompanied the British Army on its march from Poona, in the month of June following to oppose the confederacy by the Northern Maratha Chiefs then joining against the British Government and their Allies Rao Pundit Pu[illegible]an and the Nizam. He served during the war which ensued with the utmost zeal and fidelity and in a manner perfectly satisfactory to me. His Troops were engaged with the enemy repeatedly and always conducted themselves well, and Gokhley particularly distinguished himself and then in a late action against a formidable band of free booters who had assembled upon the frontiers of the Peshwas' Territories and cut off the supplies of the city of Poona. I have given him this paper in testimony of my uniform approbation of his conduct and

of his Troops. I request that any British Officers and others to whom this paper may at any time be shown will consider Bapoojee Ganesh Gokhley as the friend the British Government.

*Poona 6th March 1804.*

(*Sd.*) AURTHER WELLESLLY